**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७८१

निर्णय दिनांक ०१-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अरुण सखाराम गोऱ्हे,<br>रा. कोपरगाव, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक,<br>अंबड जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा,<br>पोलीस आयुक्त, नाशिक | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०१.११.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. महेश आत्माराम पाटील, सहायक पोलीस निरीक्षक, जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, अंबड पोलीस स्टेशन, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस आयुक्त, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. अरुण सखाराम गोऱ्हे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०३.१२.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील, अपिलार्थीने त्यांना संबंधित

प्राधिकरणाने खोटी माहिती पुरविली म्हणून राज्य माहिती आयोगाकडे केलेले असून त्यामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २७.१.२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,अंबड पोलीस स्टेशन नाशिक यांच्याकडे - "इंद्राक्षी ग्राफीक्स, अंबड-W-२२५ एम्. आय.डी.सी. मधील आरोपी संजय व सुधीर शामकांत गवांदे हे सापडत नाही त्याची कारणे व त्याचे भाऊ सुनिल याने लिहून दिलेले कॉम्प्रमाईस पत्राची प्रती." ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये पोलीस आयुक्त, नाशिक यांच्याकडे दि. १४.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे, हे कळण्यास मार्ग नाही. कारण अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील सुनावणी संदर्भात कोणत्याही आदेशाच्या प्रती जोडलेल्या नाहीत तसेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील कोणत्या अपिलाच्या विरुध्द अथवा कोणत्या निर्णया विरुध्द केले आहे, याचा उल्लेखही या कागदपत्रांमध्ये नाही, यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनवणी घेतली नाही. या दोन्ही अधिकाऱ्यांचे या प्रकरणातील वर्तन आक्षेपार्ह असून, त्यांनी आपल्या अशा प्रकारच्या वर्तनाद्वारे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रती त्यांच्या मनातील अनादर स्पष्ट केला आहे, असे

आयोगाचे मत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे उपस्थित असलेल्या सहा.पोलीस निरीक्षक यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये उपस्थित केलेली घटना सन २००२ मध्ये घडली असून अपिलार्थीने मूळ अर्जात नमूद केलेल्या कॉम्प्रमाईज पत्राच्या प्रतीसंदर्भातील अभिलेखे त्यांच्या कार्यालयात जतन करण्याचा कालावधी पोलीस मॅन्युअलमध्ये नमूद असून अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे त्यांच्या कार्यालयाकडून नष्ट केली गेली असण्याची शक्यता आहे व सदर कागदपत्रे त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमधील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी घेतलेल्या निर्णयासंदर्भात कारणे अपेक्षित असल्याचे दिसून येते, तथापि अशी कारणे विचारण्याची तरतुद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. अधिनियमामधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेली 'माहिती' या शब्दाची व्याख्या पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयासंदर्भात कारणे विचारता येत नाहीत, हे स्पष्ट होते. किंबहुना माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना कारणे अथवा खुलासा विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी ती अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया मूलतः या कायद्यामध्ये अभिप्रेत नाही, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी पहिल्या मुद्याची माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय ठरत नाही, उर्वरित माहितीबाबत संबंधित अभिलेखे जतन करण्याचा कालावधी संपल्यामुळे सदर अभिलेख संबंधित पोलीस स्टेशनकडून नष्ट केले गेले असल्याची शक्यता आहे, असे जन माहिती अधिकारी आयोगास सांगत आहेत. तथापि त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केलेला नाही.

आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास दाखविलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे दोन्ही पक्षकारांमध्ये कॉम्प्रमाईज झाल्याचे दिसून येते. परंतु प्रत्यक्षतः कॉम्प्रमाईजची प्रत संबंधित पोलीस ठाण्यात उपलब्ध नाही, त्यामुळे या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस, आता ती नष्ट केली असल्याच्या शक्यतेमुळे मिळण्याची शक्यता कमी आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे जी माहिती मागितली आहे, ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे, तथापि ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाशी संपर्क साधल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.या सर्व घटनाक्रमाचे अवलोकन करता या प्रकरणी जन माहिती अधिकारी  यांच्यावर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कोणतीही कार्यवाही न करुन, अभिलेखे नष्ट केल्याचा योग्य तो पुरावा जतन न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन त्याद्वारे स्वतःला माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब पोलीस आयुक्त, नाशिक यांना जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस आयुक्त  यांनी या प्रकरणी अधिनियमातील कलम १९(६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या बेफिकीर वृत्तीची सचिव (गृह) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचविण्यात येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) संबंधित जन माहिती अधिकारी  यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य

प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस पोलीस आयुक्त, नाशिक यांच्याकडे करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **(वि.बा.बोरगे)**

**दिनांकः ०१.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण सखाराम गोऱ्हे, द्वारा. श्री. झेरॉक्स, गुरुद्वारा रोड, कोपरगाव, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन अंबड, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस आयुक्त, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. सचिव (गृह),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७८२

निर्णय दिनांक ०१-११-२००८

१ श्री. रघुनाथ दामोदर खैरनार : अपिलार्थी
रा. कोपरगाव, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
संगमनेर, जि.अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
संगमनेर, जि.अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०१.११.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. अरविंद बाबुराव सुर्यवंशी, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर जि. अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. रघुनाथ दामोदर खैरनार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २८.१२.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने एकूण १० मुद्यांवर आपले म्हणणे सादर केले असून त्यांनी, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. १३.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जावर सत्य माहिती अपेक्षिली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपिलार्थीने मूळात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ नुसार केलेला अर्ज दाखल केलेला नाही. सदर अर्ज त्यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध नाही तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे कलम १९(१) नुसार केलेले प्रथम अपील देखील त्यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध नाही. कार्यकारी अभियंता यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत तसेच त्यांनी उपरोक्त मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज दाखल केल्याबाबत, संबंधितांच्या आयोगासमोर पोचपावतीचा पुरावा सादर केलेला नाही. सदर वस्तुस्थिती पाहता, असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सशुल्क उपलब्ध करुन द्यावी. तसेच आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांवरही त्यांना माहिती द्यावी. त्याचप्रमाणे वर उल्लेखिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज पोहोचला नसल्याने ते अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरवू शकले नाहीत व जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज दिल्याचा पुरावा अपिलार्थी यांनी आयोगास सादर केलेला नाही, तसेच आज जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये उपस्थित केलेल्या रजेबाबत व वेतनाविषयीच्या सर्व मुद्यांवर अंतिम निर्णय झाला असून, अपिलार्थीस आवश्यक

त्या रकमेचे प्रदान करण्यात येऊन त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या रजेसंदर्भात आदेश निर्गमित झाले आहेत, हे पाहता, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शासन करावे, ही मागणी आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत सशुल्क पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक: ०१.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रघुनाथ दामोदर खैरनार,३५३, गणेश चौक, कोपरगाव ता. कोपरगाव जि.अहमदनगर- ४२३६०१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७८३

निर्णय दिनांक  ०१-११-२००८

१ श्री. रघुनाथ दामोदर खैरनार : अपिलार्थी
रा. कोपरगाव, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०१.११.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रघुनाथ दामोदर खैरनार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. दत्तात्रय लक्ष्मण खेडकर, जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सतीश मधुकरराव चिखलीकर, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २८.१२.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील, अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती खोटी, असमाधानकारक व दिशाभूल करणारी अशी वाटल्याने आयोगाकडे केलेले आहे. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या, विविध विभागात ते कार्यरत असताना, त्यांनी घेतलेल्या रजा मंजूरीबाबत व थकित वेतनाबाबत अपेक्षित कार्यवाही न झाल्याने, केल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली वैयक्तिक कैफियत मांडली असून मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. ११.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांच्याकडे एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितली आहे. या १३ मुद्यांपैकी जन माहिती अधिकारी यांच्याशी फक्त तीन मुद्दे संबंधित असून त्यांचे क्रमांक ४,५ व ६ आहेत. उर्वरित मुद्यांची माहिती ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुसऱ्या विभागाशी संबंधित आहे. अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस अपेक्षित माहिती पुरविली आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील सादर करताना प्रपत्र- 'अ 'ची प्रत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांच्याकडे दिल्याचे दर्शविले आहे. तथापि सदर अर्ज कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाकडे अपिलार्थीकडून प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीने याच मुद्यावर शासनाकडून माहिती मागितली होती. शासनाकडून सदर अर्ज दि. २०.६.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्या अर्जास अनुसरुन जन माहिती

अधिकारी यांनी त्यांच्याशी संबंधित अपिलार्थीस एकूण तीन मुद्यांवर माहिती पुरविली होती. सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन, त्यासंबंधीचे आदेश दि. १५.४.२००८ रोजी पारित केले, या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले असून त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केल्याचे आढळून येत नाही.त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी तीन मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी प्रत्यक्ष संबंधित असल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दि. १३.७.२००७ रोजी दिल्याचे सांगितले. सुनावणी चालू असताना अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित झाले व त्यांनी आपल्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ वर भर देऊन, संबंधित मस्टरची सत्यप्रत त्यांना अपेक्षित असल्याचे आयोगासमोर सांगितले, तथापि सदर मस्टर जन माहिती अधिकारी यांच्या अंतर्गत असलेल्या उपविभागात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व सदर मस्टर उपलब्ध नसल्याचे त्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण (मॅट) यांचे न्यायालयात शपथपत्राद्वारे सादर केल्याचे आयोगास अवगत केले. सदर शपथपत्राची प्रत अपिलार्थीस मिळाल्यास अपिलार्थीचा कार्यभाग साध्य होऊ शकेल, असे अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात त्यांनी मॅटकडे सादर केलेल्या शपथपत्राची एक प्रत साक्षांकित करुन पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच संबंधित मस्टर जर गहाळ झाले असेल तर ज्या कर्मचाऱ्यांच्या हातून गहाळ झाले असेल, त्या कर्मचाऱ्यावर नियमानुसार

प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला असल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ शी संबंधित, वरील निर्णयामध्ये संदर्भित केलेली माहिती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक: ०१.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रघुनाथ दामोदर खैरनार,३५३, गणेश चौक, कोपरगाव ता. कोपरगाव जि.अहमदनगर- ४२३६०१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४.  निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७८४

निर्णय दिनांक  ०१-११-२००८

१ श्री. सत्यनारायण गिरधारीलाल सारडा, : अपिलार्थी
रा.शेवगाव, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
शेवगाव, जि.अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा,
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०१.११.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. बाबुराव केरबा आदमाने, जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शेवगाव जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुरेश गोपाळराव देशपांडे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सा.बां. रो.ह.यो.(कार्य) विभाग,अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. सत्यनारायण गिरीधारीलाल सारडा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), हे गैरहजर आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम रो.ह.यो.(कार्य) विभाग, अहमदनगर यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, या अपिलाची सुनावणी मुख्य माहिती आयुक्त यांनी अहमदनगर येथे दि. २३.९.२००८ रोजी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय स्वतंत्रपणे दिला आहे. या प्रकरणातील मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडील लेखी आदेश अद्यापि त्यांना प्राप्त व्हावयाचे आहेत. त्यांनी अपिलार्थीने कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांना उद्देशून लिहिलेले दि. २०.९.२००८ रोजीचे पत्र आयोगास दाखविले. सदर पत्रामध्ये अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली असून याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.अशा परिस्थितीत अपिलार्थीचे अपील खारीज करण्यावाचून गत्यंतर नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः ०१.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सत्यनारायण गिरीधारीलाल सारडा, खंडोबानगर, शेवगाव ता.शेवगाव जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,शेवगाव जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम रो.ह.यो.(कार्य)

विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७८५

निर्णय दिनांक ०१-११-२००८

१ श्री. आशिष उत्तमचंद बोरा, : अपिलार्थी
रा. कर्जत, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय,
कर्जत, जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी कर्जतउपविभाग,
कर्जत जि.अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०१.११.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. आशिष उत्तमचंद बोरा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. पी. जी. कोल्हे, जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उप विभागीय अधिकारी कार्यालय, कर्जत जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कर्जत उपविभाग, कर्जत जि. अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार दि. २५.२.२००८ रोजी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते

की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दि. २९.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४-ब च्या माहितीवर आधारित, काही माहिती मागितली होती. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून रु.८०/- इतके शुल्क आकारुन दि. २७.११.२००७ रोजी पुरविली आहे. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २१.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, अपिलार्थीस निश्चित कोणत्या मुद्यावर माहिती अपूर्ण वाटते, ते अपिलार्थीने त्यांना कळवावे. तसेच " प्रत्येक शासकीय कार्यालयात माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांची स्वतंत्रपणे नेमणूक करणेत आलेली आहे. त्यासाठी आपणास आवश्यक असलेली माहिती आपण संबंधित माहिती अधिकारी यांचेकडेस अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी."

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे या प्रकरणी आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः निर्णय देणे आयोगास आवश्यक वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या अपिलावर त्यांनी संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत त्यावर निर्णय घ्यावा व त्यानंतर सात दिवसांच्या आत आपले आदेश पारित करावेत. अपिलार्थीचे या निर्णयाने समाधान न झाल्यास ते राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन निर्णय घ्यावा व त्यानंतर सात दिवसांचे आत आपले लेखी आदेश पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांकः ०१.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आशिष उत्तमचंद बोरा, एस.टी.स्टॅण्ड कॉर्नर, मु.पो.ता.कर्जत, जि.अहमदनगर-४१४४०२.

२. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, कर्जत जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कर्जत उपविभाग,कर्जत जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७८६

निर्णय दिनांक ०१-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मनोज मारुती कर्डिले,<br>रा. ता. जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य दुकाने निरीक्षक,<br>अहमदनगर<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक कामगार आयुक्त,<br>अहमदनगर. | : | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: सरकारी कामगार अधिकारी,
कामगार आयुक्त कार्यालय,
अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०१.११.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. भगवान नहानू जाधव, जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा सहा. कामगार आयुक्त, अहमदनगर जि. अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. मनोज मारुती कर्डिले (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार दि. ३०.११.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या

विचाराधीन आहे. सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर मुदतीत आदेश न दिल्याने, केल्याचे दिसून येते. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २३.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.१.२००२ ते २३.८.२००७ या कालावधीशी संबंधित संस्थांच्या नोंदणीविषयी एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली, तथापि, ही माहिती विसंगत व अपूरी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. २६.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दि. २२.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याचदिवशी आपले आदेश पारित केले आहेत.जन अपिलीय अधिकारी यांच्या या कथित निर्णयाचे अवलोकन केले असता, ते अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्यातील चर्चेचे इतिवृत्त असल्याचे दिसून येते. यामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीबाबत कोणताही निर्णय दिला नाही, तसेच या इतिवृत्तांतात अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ बाबत पुर्ण समाधान झाल्याचे अपिलार्थी यांनी म्हटले आहे. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ बाबत जन अपिलीय अधिकारी यांनी दुकान निरीक्षक श्री. आर.एस.मोरे यांना अपिलार्थीच्या प्रथम अर्जातील मुद्दा क्र. ३ बाबत आवश्यक ती कार्यवाही करुन ३ दिवसांच्या आत अहवाल सादर करण्याचे सूचित केले आहे. यानंतर संबंधित जागेची दुकान निरीक्षक यांनी तपासणी केली. तथापि संबंधित दुकान निरीक्षक यांनी अपिलार्थीस तीन दिवसांचे आत माहिती न देता त्यांनी दि. २२.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील झालेल्या चर्चेमध्ये ठरल्याप्रमाणे या संदर्भातील आपला अहवाल अपिलार्थीस अंतिमतः दि. २७.११.२००७

रोजीच्या पत्रान्वये पाठविला. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना दिलेल्या मुदतीत अहवाल न पाठविल्याने अपिलार्थीने वर उल्लेखिल्याप्रमाणे द्वितीय अपील आयोगास सादर केल्याचे दिसून येते.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी, त्यांना मुद्देनिहाय माहिती पुरविली नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील, निर्णय देताना दोन्ही बाजूचे म्हणणे नोंदवून घेऊन, त्यावर आपला ठोस निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.९.२००७ रोजी अपिलार्थीस दिलेला प्रतिसाद व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता उपरोक्त प्रकरणातील संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस प्रथमतः अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द होत आहे, अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे येथे सिध्द होत आहे. सबब कामगार आयुक्त,मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पुरविण्यासंदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देसूद माहिती पुरवली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देय आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण मुद्देनिहाय माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस, कामगार आयुक्त,मुंबई यांच्याकडे करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांकः ०१.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मनोज मारुती कर्डिले, ५६२८, शेरकर गल्ली, सर्जेपुरा, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, सहा.कामगार आयुक्त कार्यालय,अहमदनगर जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, अहमदनगर जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई-३४ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७८७

निर्णय दिनांक ०१-११-२००८

१ सौ. सुमन अशोक भुसारी, : अपिलार्थी
रा. सोनई ता. नेवासा जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक निबंधक सहकारी संस्था,
अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था
अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,
अहमदनगर जि.अहमदनगर.

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०१.११.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सौ. सुमन अशोक भुसारी यांचे प्रतिनिधी, श्री. अशोक श्रीहरी भुसारी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. प्रशांत शामराव सोनवणे, जन माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,अहमदनगर जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. महेशकुमार गंगाधर गायकवाड,सहायक निबंधक सहकारी संस्था, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर जि. अहमदनगर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार दि. २४.०७.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी नाकारले असून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी कायदेशीर व सनदशीर मार्गाने न करता त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती फेटाळून लावण्यात आली व त्यांचे म्हणणे समजून न घेता, त्याची शहानिशा न करता त्यांचा प्रथम अपील अर्ज फेटाळून लावून माहिती देण्याचे नाकारले, या कारणाने केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दि २५.१.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे महाराष्ट्र सहकारी सोसायटी अधिनियम १९६० मधील कलम १०१ अन्वये करावयाच्या कार्यवाहीबाबत दि. १.१.२००६ ते ३०.१२.२००६ या कालावधीशी संबंधित श्री. रावसाहेब पटवर्धन नागरी सह.पतसंस्था मर्या. या संस्थेशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.३.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.३.२००७ व ९.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १३.४.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी वेळोवेळी संधी देऊन देखील अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात सुनावणीसाठी हजर झाले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचा अपील निर्णय व अपिलार्थी यांचा मूळ माहितीचा अर्ज यांचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे रावसाहेब

पटवर्धन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित या त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागितली असून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय घेताना त्रयस्थ पक्षाची बाजू विचारात घेतलेली नाही. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार व अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी अन्वये उपरोक्त प्रकरणी त्रयस्थ पक्षास त्यांची बाजू मांडण्याची संधी देऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देणे योग्य राहील, असे या टप्प्यावर आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ९.३.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, त्रयस्थ पक्षासह सर्वांना त्यांचे म्हणणे मांडण्याची योग्य ती संधी देऊन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत योग्य तो निर्णय घ्यावा. सदर निर्णय अपिलार्थीस मान्य नसल्यास ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ९.३.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम ११ मधील तरतुद विचारात घेऊन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत आपला निर्णय घ्यावा.

**अहमदनगर**
**दिनांकः ०१.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुमन अशोक भुसारी, मु.पो.सोनई ता. नेवासा, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था अहमदनगर जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अहमदनगर जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७८८

निर्णय दिनांक ०१-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संदीप रामदास पालवे,<br>रा. मजले चिंचोली ता.जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मजले चिंचोली<br>ता. जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,अहमदनगर. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०१.११.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. संदीप रामदास पालवे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुधाकर किसनराव बोर्डे, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मजले चिंचोली ता.जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सिध्दार्थ बाबुराव आजवेलकर, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, अहमदनगर जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार दि. १८.०२.२००८ रोजी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील, अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही

माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने, केल्याचे म्हटले आहे व या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना रु. १०००/- नुकसान भरपाई मिळावी, अशी आयोगास विनंती केली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २५.१०.२००७ रोजी त्यांचे कार्यक्षेत्राशी संबंधित २००५-०६ व २००६-०७ या कालावधीतील एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितली होती. या माहितीमध्ये "१)ग्रामसभेच्या मासिक मिटींग व ग्रामसभेच्या इतिवृत्तांतांच्या सदस्यांच्या सहीसह प्रती २) दारिद्रयरेषेची यादी, ३) तंटामुक्त समितीची यादीची झेराक्स व दलीतवस्ती सुधार योजनेखाली मंजूर केलेली रक्कम" या माहितीचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या विहित तरतुदीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर उपस्थित जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी या दोन व्यक्ती सुनावणी झाल्याचे कबूल करतात, तथापि ही सुनावणी झाल्यासंदर्भात ते कोणताही ठोस पुरावा आयोगासमोर सादर करु शकत नाहीत. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले असल्याचे ते आज सुनावणीमध्ये आयोगास अवगत करुन देत आहेत. एवढे सर्व जरी असले तरी सुनावणीच्या दिनांकापर्यंत अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली कोणतीही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, हे सत्य शेवटी उरत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी दि. २५.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, असे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांची तब्येत बरोबर नसल्याने सुनावणीसाठी पुढील तारीख मिळावी. जन माहिती अधिकारी यांची ही विनंती फेटाळून लावण्यात येत आहे. त्यांनी आपला लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही जनहितार्थ मागितलेली नसून त्यांचे स्वतःचे हित ग्राम पंचायत व इतर कार्यालयाकडून पूर्ण न झाल्याने ते माहितीच्या अधिकाराचा वापर करीत आहेत व या संदर्भात लेखी पुरावा ते पुढील तारखेला सादर करीत आहेत. जन माहिती अधिकारी यांची ही विनंती देखील आयोग फेटाळून लावत आहे, कारण अपिलार्थीने मूलतः मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असून ती अधिनियमातील कलम ३ नुसार त्यांना प्राप्त होणे हा त्यांचा हक्क आहे. **अर्जदाराने कोणत्याही हेतूने जरी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक स्वरुपाची माहिती मागविली असली तरीही, अर्जदाराचा माहिती प्राप्त करुन घेण्यामागे कोणता हेतू आहे, याची तपासणी अथवा यावर भाष्य न करता जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराच्या माहिती अर्जावर अधिनियमातील विहीत तरतुदीमध्ये निर्णय देणे भाग आहे किंबहुना अधिनियमातील कलम ७(१) ची तरतुद हीच बाब अधिक स्पष्ट करत आहे.**

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती देण्यास निश्चितपणे टाळाटाळ केली असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन सिध्द होत असून आजच्या सुनावणीच्या दिवशी देखील जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतूपुरःस्सर टाळत असल्याचे त्यांच्या युक्तिवादावरुन निःसंशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी आयोगासमोर, देखिल त्यांनी, अपिलार्थीस ते कधी माहिती देऊ शकतील या प्रश्नावर कोणतेही सरळ उत्तर न देऊन, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आश्वासन आयोगास दिले नाही. अपिलार्थीस त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अजा्रद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होता तीस दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस माहिती देण्याच्या भूमिकेबद्दल आयोग साशंक असल्यसाने या आदेशाचे जन माहिती अधिकारी हे आदेशातील विहित मुदतीत पालन करतील याची दक्षता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदनगर यांनी घ्यावी, अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे,

वरील सर्व घटनाक्रम व दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद लक्षात घेता, अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी. जन माहिती अधिकारी ही माहिती अपिलार्थीस ३० दिवसांच्या आत देतील, याची गट विकास अधिकारी, पं.स.अहमदनगर यांनी व्यक्तिशः खात्री करावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळल्याने त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः ०१.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संदीप रामदास पालवे,रा. मजले चिंचोली ता.जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मजले चिंचोली ता.जि.अहमदनगर. यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदनगर जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७८९

निर्णय दिनांक ०१-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय शिवाजी डापसे,<br>वंजारगल्ली, अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>अन्न धान्य वितरण अधिकारी,<br>अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>अहमदनगर. | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०१.११.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. संजय शिवाजी डापसे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. धर्मा लक्ष्मण आरु, जन माहिती अधिकारी तथा अन्न धान्य वितरण अधिकारी,अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. जी. आर.खरात, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार दि. १०.०३.२००८ रोजी केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही, त्यांनी जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे प्रथम अपील करुनही जन अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीत अपील निकाली काढले नाही व अपिलार्थीस जाणूनबुजून संगनमताने माहिती देण्यास कसुर केला आहे,असे नमूद करुन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती व शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.९.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वस्त धान्य दुकान क्र. १६ व ४३ या दुकानांमार्फत ए.पी.एल. धान्य वाटप मे,जून, जुलै व ऑगस्ट मध्ये ज्या कार्डधारकांना केले, त्यांची नावे,कार्ड क्रमांक व पत्ते अशी माहिती मागितली आहे. ही माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.१.२००८ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश त्यांच्याकडील दि. २३.१.२००८ रोजीच्या पत्रान्वये पारित केले आहेत. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगासमोर सांगितले.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर अंदाजे तीन आठवडयापूर्वीच रुजू झाले असून, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यकालाशी संबंधित नव्हती, तरीही त्यांनी विशेष प्रयत्न करुन अपिलार्थीस दि. ३१.१०.२००८ रोजी माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता या माहितीतील मजकुरावरुन निश्चित असा कोणातही बोध होत नाही. या माहितीमध्ये संबंधित कार्डधारकांची नावे व पत्ते लिहिलेले नाहीत. तसेच एका रकान्यामध्ये केवळ काही आकडे टाकले असून त्यामध्ये आकडयांचे/रकमांचे परिमाण त्यांनी लिहिल्याचे आढळून येत नाही. या रकान्यामधील काही आकडे हे कार्ड क्रमांकाचे असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. त्यांच्याकडे सर्व रेशन कार्डधारकांचे कार्ड नंबर, नावे व पत्ते असल्याचे देखील त्यांनी आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असून ती अपिलार्थीस देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांना पूर्वी काही अडचण होती, असे आयोगास वाटत नाही. तथापि अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी का माहिती उपलब्ध करुन दिली नाही, याची कारणे उपस्थित जन माहिती अधिकारी यांना माहिती नाहीत. अपिलार्थीने, मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ नुसार देय ठरते, सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद अथवा कोणतीही माहिती न देऊन माहिती अधिकार अधिनियमाविषयी अनादर व आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, याची आयोगास खात्री पटली आहे. उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोठेही अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही गांभीर्याने केली नसल्याचे निरीक्षण खुद्द जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २३.१.२००८ रोजीच्या निकालपत्रात नोंदविलेले आहे, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब सचिव (महसूल) यांच्याकडे संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर, त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी.

३) सचिव (महसूल) यांच्याकडे, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे संदर्भात दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य

प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः ०१.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय शिवाजी डापसे, वंजारगल्ली, घ.नं.१४८३, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा अन्न धान्य वितरण अधिकारी, अहमदनगर. यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७९०

निर्णय दिनांक ०१-११-२००८

१ श्री. प्रमोद भाऊसाहेब खैरे, : अपिलार्थी
संगमनेर, जि. अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वरिष्ठ अधिव्याख्याता,
सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला,
विज्ञान महाविद्यालय,संगमनेर,
जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला,
विज्ञान महाविद्यालय,संगमनेर,
जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०१.११.२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. प्रमोद भाऊसाहेब खैरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान

महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार दि. १७.०१.२००८ रोजी केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या एकूण तीन मुद्यांपैकी दोन मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे कबूल केले आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या कायद्याच्या (Statute) प्रतीमधील मजकुराविषयी त्यांचा आक्षेप आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे "बीनपगारी रजा कोणत्या नियमांच्या (स्टॅटयुट/परिनियम/जी.आर) आधारे करण्यात आलेल्या आहे, त्याच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या" अशी माहिती मागितली होती. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी, प्राचार्यांना ज्या अधिकाराखाली प्राध्यापकांच्या रजा बिनपगारी करता येतात, त्या अधिकाराची प्रत आयोगास सादर केली. त्यांनी आयोगासमोर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील प्रकरण VI सेक्शन 220 (8) ही तरतुद आयोगास दाखविली, सदर तरतुद खालीलप्रमाणे आहे.

" (8) The teacher shall not, without prior permission of the Competent Authority, absent himself from his duties. In the circumstances or reasons beyond his control, he shall intimate or cause to intimate to Competent Authority within five days from the first date of absence failing which the absence may be treated as leave without pay, and he shall further be liable to such disciplinary action as the Competent Authority may deem fit."

अपिलार्थीने पुणे विद्यापीठाचा कायदा (Statute) क्रमांक 424 ची प्रत आयोगास दाखविली असून त्यातील उपकलम 12 मधील उपकलम 2 मध्ये विद्यापीठाच्या विनावेतनी रजा मंजूर करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या कार्यकारी समितीला (Executive Council) असल्याचे दाखविले. थोडक्यात, अपिलार्थीस या दोन वेगवेगळया नियमावर आयोगाचे अभिप्राय हवे असल्याचे दिसून येते. विद्यापीठ कायद्यावर (Statute) कोणत्याही प्रकारचे अभिप्राय देणे अथवा त्यातील तरतुदींवर भाष्य करणे, आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. अपिलार्थीस या दोन्हीही तरतुदींमध्ये विसंगती आहे, असे वाटत असेल तर त्यांनी त्यांच्या शंकांचे निरसन अथवा तक्रारीचा निपटारा विद्यापीठाच्या तक्रार निवारण समिती (Grievence Committee)कडून अथवा सक्षम प्राधिकरणाकडून करुन घ्यावा, असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

३) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांकः ०१.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रमोद भाऊसाहेब खैरे, 'सुप्रभात', १३२ के.व्ही.च्या मागे, शंकर टाऊनशिप, साईश्रध्दा चौकाजवळ, संगमनेर, ता. संगमनेर जि.अहमदनगर -४२२ ६०५

२. जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान महाविद्यालय,संगमनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७३१

निर्णय दिनांक ०६-११-२००८

१ श्री. रणजित नामदेवराव चव्हाण, : अपिलार्थी
पिंपरखेडा ता.आष्टी जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
आष्टी, जि.बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,आष्टी जि.बीड.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः मंडळ कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
आष्टी, जि.बीड

जन अपिलीय अधिकारीः तालुका कृषि अधिकारी,
आष्टी जि.बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रणजित नामदेवराव चव्हाण (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. ज्ञानेश्वर बाबूराव व्यवहारे, जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी जि.बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, आष्टी, जि. बीड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २४.०९.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहितीसाठी आवश्यक ते शुल्क रु. ३५००/- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यानंतर देखील त्यांना उशिराने व अपूर्ण माहिती प्राप्त झाली. तसेच अपिलार्थीस कमी पृष्ठांची माहिती देऊन त्यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांनी जास्त फीची आकारणी केली आहे. या सर्व कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची मागणी त्यांनी करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उशिराने माहिती प्राप्त झाल्यामुळे त्यांनी भरलेले शुल्क रु. ३५००/- त्यांना परत करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ ते दि. १४.५.२००७ या कालावधीशी संबंधित मराठवाडा मिशन अंतर्गत त्यांच्या कार्यालयाने प्रसिध्द केलेल्या बुकलेटची मागणी केली तसेच या मिशनअंतर्गत चालू असलेल्या कामांची ठिकाणे, स्वरुप, शासनाकडून मंजूर झालेला निधी या मुद्यांवरील माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ४.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३५००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने दि. २०.६.२००७ रोजी शुल्क भरल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.७.२००७ रोजी माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस पुरवावयाची ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील प्रतिनिधीमार्फत हस्तांतरित केली असून जन माहिती अधिकारी यांच्या दि. १८.७.२००७ रोजीच्या पत्रावर अपिलार्थीच्या कुटुंबातील सदस्य सौ. रेखा रणजित चव्हाण यांची

सही असल्याचे आढळून येते. सदर सदस्य या अपिलार्थीच्या पत्नी असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले, यावरुन अपिलार्थीस दि. १८.७.२००७ रोजी माहिती मिळाल्याचे सिध्द होत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने दि. २०.६.२००७ रोजी माहितीपोटी आवश्यक ती फी भरल्यानंतर त्यांनी कार्यालयातर्फे अपिलार्थीस दि. १८.७.२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविलेली आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यास वेळ का लागला, याची विचारणा केली असता, त्यांनी असे सांगितले की, ग्राम पाणलोट समितीकडून ही माहिती प्राप्त करुन घ्यावयाची असल्याने, त्यांना वेळ लागलेला आहे. तसेच त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या १७५० इतकी असल्याचे शपथपत्राद्वारे त्यांनी आयोगास सादर केले आहे.

या प्रकरणी उपलब्ध कागदपत्रांची पहाणी करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.५.२००७ रोजी माहितीची मागणी केली होती. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ४.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस रु. ३५००/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने त्यांचे कार्यालयात दि. २०.६.२००७ रोजी भरले. सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस सदर माहिती दि. १३.६.२००७ रोजी देय होत होती. यामध्ये अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस शुल्क भरण्यासाठी कळविल्याची तारीख व प्रत्यक्ष शुल्क भरल्याची तारीख यातील फरक लक्षात घेता, या प्रकरणी अपिलार्थीस ही माहिती दि. २९.६.२००७ रोजी देय होते, असे असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.७.२००७ रोजी म्हणजेच अधिनियमातील विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिली आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ४.६.२००७ रोजी माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरण्याचे जे पत्र दिले आहे, त्यामध्ये अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या

माहितीच्या संभाव्य पृष्ठांची संख्या व माहिती देण्याचा प्रतिपृष्ठ दर, असा अधिनियमातील कलम ७(३) (क) नुसार हिशोब दिला नसल्याने सदर पत्र अवैध ठरत आहे. विहित तरतुदीत माहिती न दिल्याने, अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य माहिती देय होते. ही वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस या प्रकरणी विनामूल्य माहिती देय ठरते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क घेऊनही विलंबाने माहिती दिल्याने, आता जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीकडून जमा करुन घेतलेले माहितीपोटीचे शुल्क रक्कम रु. ३५००/-, त्यांना परत करावे लागेल.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, त्यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत किंवा त्यांनी त्यांचे म्हणणे आयोगाकडे लिखीत स्वरुपात देखील पाठविलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाली, हा त्यांचा मुद्‌दा आयोग फेटाळून लावत आहे. तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूर्वक विलंब लावल्याचे अथवा माहिती देण्यासाठी टाळल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्याचे आदेश आयोग देत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून दि. २०.६.२००७ रोजी माहितीपोटी स्वीकृत केलेले शुल्क रक्कम रु. ३५००/-(अक्षरी तीन हजार पाचशे मात्र) त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत

करावे.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांकः ०६.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रणजित नामदेवराव चव्हाण, मु.पो.पिंपरखेडा ता.आष्टी जि.बीड

२. जन माहिती अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, आष्टी,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७३२

निर्णय दिनांक ०६-११-२००८

१ श्री. रणजित नामदेवराव चव्हाण, : अपिलार्थी
मु.पो.पिंपरखेड ता.आष्टी जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,
आष्टी जि.बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,
बीड जि.बीड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रणजित नामदेवराव चव्हाण (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. प्रकाश दत्तात्रय घेवरीकर, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) आष्टी जि.बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. कुलदिप रेणूकादास धुमाळ, उपकार्यकारी अभियंता,जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, बीड जि. बीड यांचे प्रतिनिधी(यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १८.९.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे व अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी कळविले नसल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणत्याही प्रकारचा निर्णय दिला नसल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) नुसार कारवाई करावी, अशी त्यांनी आयोगास या अपील अर्जाद्वारे विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडील दि. १४.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांचे कार्यालयाशी संबंधित सन २००३ ते २००५ या कालावधीतील पिंपळगाव दाणी येथील गावतलाव क्र.४ विषयी  काही माहिती टपालाद्वारे मागविली होती. या माहितीमध्ये तलावाचे अंदाजपत्रक, मस्टररोलची सत्यप्रत, कामपूर्तता अहवाल, मजूरांना करण्यात आलेल्या धान्य वाटपाची यादी या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ४.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांनी रु. १००००/- शुल्क त्यांचे कार्यालयात भरल्यास ही माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे आश्वासित केले होते. जन माहिती अधिकारी यांचे मते अपिलार्थी हे सदर शुल्क भरण्यास आले नाहीत, तर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना  जन माहिती अधिकारी यांचे दि. ४.६.२००७ रोजीचे पत्र प्राप्त झ ाले नाही. अपिलार्थीस सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी साध्या पोस्टाने पाठविल्याबाबत त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची प्रत सादर केली. जन माहिती अधिकारी

यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. ४.७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीचे वकील ॲड. अजित देशमुख यांना दि. १६.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने रु. १०,०००/- इतक्या रकमेचा भरणा न केल्याने त्यांना माहिती प्राप्त होऊ शकत नसल्याचे कळविल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.४.२००७ रोजीचा अर्जास व दि. ४.६.२००७ रोजीच्या पत्राचा संदर्भ दिला आहे ते पत्र आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी रु.१०,०००/- शुल्क त्यांच्याकडील दि. ४.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये भरण्याचे कळविले व या संदर्भातील आवश्यक तो पुरावा देखील आयोगासमोर सादर केला तथापि, या पत्राचे अवलोकन करता, यामध्ये त्यांना अपिलार्थीस जी माहिती द्यावयाची आहे, त्या माहितीची संभाव्य पृष्ठसंख्या व प्रतिपृष्ठ दर असा हिशोब कळविला नसल्याचे दिसून येते. यामध्ये त्यांनी असे म्हटले की, अपिलार्थी हे दि. १.६.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष हजर झाले होते, त्यावेळी त्यांनी अपिलार्थी यांना रु. १०,०००/- भरण्याचे तोंडी सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने ते भरले नसल्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. या प्रकरणी या टप्प्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ७ (३) (क) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते. तसेच त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस रु.१०,०००/- भरण्याचे तोंडी सूचना केल्याचे नमूद केले आहे. अधिनियमाद्वारे आवश्यक असलेल्या फीचा हिशोब (माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या पत्रामध्ये दिला नसल्याने, जन माहिती अधिकारी यांचे दि. ४.६.२००७

रोजीचे अपिलार्थीस लिहिलेले पत्र अवैध ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती, माहिती पुरविण्याचा विहित कालावधी व्यपगत झाल्याने, अधिनियमातील कलम ७(६) अनुसार ही माहिती आता विनामूल्य पुरवावी लागेल. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात केलेली कृती त्यांनी अधिनियमातील तरतुदींचा अर्थ नीट न लावता आल्यामुळे झाल्याचे दिसून येते, तर जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे निर्णय न घेण्याची कृती त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाई स्पष्ट करते, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्य नोंद घ्यावी, असे येथे सूचित करण्यात येते.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही टप्प्यावर माहिती नाकारल्याचे नि:संशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कार्यवाहीचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र त्यांना कोणत्याही अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे माहितीचा अर्ज दाखल केल्यानंतर त्यावर त्यांनी सतर्कतेने व सकारात्मक धोरण ठेवून कार्यवाही करावी असे त्यांना सूचित करुन अशाप्रकारच्या प्रसंगाची पुनरावृत्ती त्यांनी टाळावी, अशी ताकीद देण्यात येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे..

**औरंगाबाद**
**दिनांकः ०६.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रणजित नामदेवराव चव्हाण, मु.पो.पिंपरखेड ता.आष्टी जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग,आष्टी जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग बीड आष्टी जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७३३

निर्णय दिनांक ०६-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी,<br>रा.सेलू, जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद,<br>सेलू, जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), सौ. चारुशीला ल. पंडित, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, सेलू जि.परभणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सौ. अनिता एस.भालेराव, नायब तहसीलदार, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २७.११.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या दि.

२०.९.२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.९.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "सन २००६ या वर्षी नगरपरिषद, सेलू मध्ये किती सर्वसाधारण व विशेष सभा झाल्या आहेत, झालेल्या सभांमध्ये घेण्यात आलेले ठराव, विषय पत्रिकेत किती विषय होते, सभेच्या मिनिटस् बुकात किती विषयांचा समावेश करण्यात आला व झालेल्या सर्व सभांच्या नोंदीच्या छायांकित प्रती" - साक्षांकित स्वरुपात व्यक्तिशः मागितल्या होत्या.. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. सदर माहिती नाकारताना जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस कोणतेही कारण दिलेले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.११.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ८.११.२००७ रोजी पारित केले. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना निकाल निर्णयापासून सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे दि. २७.११.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी या प्रकरणाची सद्यःस्थिती संबंधितांकडून समजाऊन घेतली असता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे प्रतिपादन केले की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती संपूर्ण माहिती दि. १३.१२.२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे.

अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यास लागलेल्या विलंबाची कारणे विचारली असता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नगरपरिषदेच्या अध्यक्षांच्या प्रत्यक्षतः ताब्यात होती. नगरपरिषदेच्या अध्यक्षांनी त्यांच्या ताब्यात असलेले मिनिटस् बुक, मुख्याधिकारी यांनी वेळोवेळी विनंती करुनही त्यांना वेळेत हस्तांतरित न केल्याने हा विलंब लागला आहे, या प्रकरणी त्या दोषी नाहीत. सदर प्रकरणातील घटनाक्रमाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सेलू नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांनी सर्वसाधारण सभेचे मिनिटस् बुक स्वतःच्या ताब्यात ठेवून व त्यातील माहिती जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध न करुन देऊन माहिती अधिकार अधिनियमातील मूळ तरतुदीला छेद दिला आहे. वास्तविक पाहता सदर मिनिटस् बुक मुख्याधिकारी यांच्यासारख्या जबाबदार अधिकाऱ्याच्या ताब्यात असावयास हवे, असे आयोगास वाटते. माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी ऑक्टोबर, २००५ पासून सुरु झाल्यानंतर अशाप्रकारच्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेमार्फत घेतल्या जाणाऱ्या मासिक अथवा विशेष सभांच्या मिनिटस् बुकांचा ताबा कोणाकडे असावा व इतर माहितीच्या व्यवस्थापनासंदर्भात सचिव (नगरविकास) यांनी शासनस्तरावरुन सर्व नगरपरिषदांना स्वतंत्र सूचना द्याव्यात, असे त्यांना या अधिनियमातील कलम १९(८) (क)(चार) मधील तरतुदीनुसार सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूण माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले, तथापि ही माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर सांगितले. उपरोक्त प्रकरणी खुद्द नगराध्यक्ष यांनीच त्यांच्याकडे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रदीर्घ कालासाठी ठेवून घेतली असल्याने ती अपिलार्थीस विहित मुदतीत उपलब्ध होऊ शकली नाही. ही वस्तुस्थिती पाहता संबंधित

नगराध्यक्ष स्वत: जन माहिती अधिकारी नसल्याने अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) सचिव (नगरविकास) यांनी, नगरपरिषदेकडील माहितीच्या व्यवस्थापनासंदर्भात आवश्यक सूचना त्यांच्या स्तरावरुन तात्काळ निर्गमित कराव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक: ०६.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, सेलू जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. नगराध्यक्ष, नगरपरिषद, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. सचिव (नगरविकास) मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७३४

निर्णय दिनांक ०६-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते,<br>रा.परळी वैजनाथ, जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>बीड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, बीड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री शंकर तुकाराम कावळे, जन माहिती अधिकारी तथा प्र.जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ७.६.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी

यांच्याकडे दि. २९.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही, याच प्रकरणासंबंधाने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.४.२००७ रोजी केलेले प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी फेटाळून लावले. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस केवळ जिल्हयातील बोगस कार्डांची माहिती मिळू नये म्हणून, त्यांना माहिती देण्याचे टाळले. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या प्रथम अपील अर्जावर योग्य तो निर्णय न दिल्याने संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाची कारवाई आदेशित करण्याची विनंती आयोगास केली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १.२.२००७ रोजीच्या जिल्हा पुरवठा अधिकारी यांना उद्देशून केलेल्या अर्जामध्ये बीड जिल्हयातील स्वस्त धान्य दुकानांसंदर्भात एकूण चार मुद्यांवर माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - "बीड जिल्हयातील तालुकानिहाय ए.पी.एल., बी.पी.एल,अंत्योदय,अन्नपूर्णा योजनेच्या कार्डांची संख्या, बीड जिल्हयातील २००० पासून जानेवारी, २००७ पर्यंत कमी केलेल्या बोगस कार्डांची तालुकानिहाय संख्या, जिल्हयातील स्वस्त धान्य दुकानदारांनी आपल्या दुकानाचा माल उचलण्यासाठी/व्यवहार करण्यासाठी दिलेल्या अधिकारपत्राची माहिती तालुकानिहाय दुकानदाराचे नाव, अधिकारपत्र धारकाचे नाव, केव्हापासून तारिख ही माहिती व ज्या-ज्या दुकानदारांनी तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीपासून धान्य व रॉकेल उचलले नाही, त्यांची यादी," - या मुद्यांचा समावेश होता. सदर माहिती अपिलार्थी यांनी शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत बीड जिल्हयातील सर्व तहसीलदारांना पाठवून देऊन त्यांनी अपिलार्थीस मुदतीत नियमानुसार परस्पर माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत त्यांना अपिलार्थीस दिली. तथापि या सूचनेनंतरही अपिलार्थी यांना

कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. ३.४.२००७ रोजी याच विषयाकरिता प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.४.२००७ रोजी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २१.४.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले आहे. सदर अपील अर्ज फेटाळताना त्यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती तहसीलदाराच्या पातळीवर ठेवण्यात येते, सदर माहिती अपिलार्थीस न मिळण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी जबाबदार राहू शकत नाहीत, असे अनुमान काढल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या चारही मुद्यांवरील माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. याच मुद्यावर अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात दरमहा आढावा बैठक आयोजित केली जाते. शासनाकडून प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन शासनाने बोगस कार्ड तपासणी मोहिम एकूण तीन टप्प्यामध्ये करण्याचे ठरविले असता त्यातील पहिल्या टप्प्यामध्ये बीड जिल्हयामध्ये अंदाजे ३१००० इतके बोगस कार्डधारक आढळले, दुसऱ्या टप्प्यामध्ये बोगस कार्डधारकांची संख्या अंदाजे ४५०० इतकी असल्याचे आढळले. त्यांच्या मागणीतील मुद्दा क्र. ३ शी संबंधित अधिकारपत्राच्या मुद्यावर त्यांनी असे स्पष्टीकरण दिले की, सदर अधिकारपत्राची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे, कारण ही अधिकारपत्रे जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या स्तरावर दिली जातात व त्याचबरोबर मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ शी संबंधित अहवाल तहसीलदार यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांच्याकडे नियमितपणे पाठविला जातो. जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तहसीलदारांना त्यांचे स्तरावर देण्यासंबंधी विहित मुदतीत कारवाई केलेली

आहे. तथापि संबंधित तहसीलदारांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याने अपिलार्थीस आजपावेतो माहिती मिळू शकली नाही, तथापि सदर माहिती संबंधित तहसीलदारांकडून एकत्रित करुन ती अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास ते आता तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी एकूण तीन मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर उपलब्ध असावयास हवी, तर मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती ही तहसीलदार यांच्याकडे असली पाहिजे, एवढे असूनही आज माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी १२.१०.२००५ पासून सुरु होऊनही आजही जनसामान्यांना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीकरिता प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहावे लागते, ही बाब महसूल खात्यास निश्चितपणे शोभनीय नाही, असे आयोगाचे मत आहे.

आजच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांचे सहायक श्री. सानप, अव्वल कारकुन यांनी आयोगास असे अवगत केले की, ते अपिलार्थी यांचेकडे प्रत्यक्ष माहिती घेऊन गेले असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले, यावर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी टपालाद्वारे माहिती मागितली असताना देखील संबंधित अव्वल कारकुन यांनी प्रत्यक्ष माहिती आणून दिली, माहिती ज्या दिवशी देऊ केली तो रविवारचा दिवस होता व जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण असल्याचे आढळल्याने त्यांनी ती स्वीकृत केली नाही. अपिलार्थीच्या या विधानावरुन अपिलार्थी यांना माहिती मिळविण्यामध्ये खरोखरी कितपत स्वारस्य आहे, याबाबत या टप्प्यावर आयोगाच्या मनात साशंकता निर्माण होत आहे.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यावर एक अशी गोष्ट निश्चितपणे या प्रकरणी सिध्द होत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविलेली नाही व त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्याच्या हक्कापासून कोणत्याही असमर्थनीय

कारणास्तव प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवले आहे. स्वत: जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, या सर्वांनी आपल्या अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याच्या या कृतिद्वारे स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निश्चितपणे पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांच्याकडे संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक (सर्व तहसीलदार, जिल्हा बीड) यांच्यावर उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्याने, अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सुंैचुश्रु दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

3) सचिव (महसूल) यांना, या प्रकरणातील संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक (बीड

जिल्हयातील सर्व तहसीलदार) यांच्यावर त्यांनी या प्रकरणामध्ये दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येते.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०६.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते,रा.न्यायालय, परळी ता. परळी वैजनाथ, जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. सचिव (महसूल) मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७४३

निर्णय दिनांक ०६-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. वसंत संपतराव मुंडे,<br>रा.परळी वैजनाथ, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि उपसंचालक,<br>जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय,<br>बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक कृषि अधिकारी,<br>विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय,<br>औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज ०६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. वसंत संपतराव मुंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. गुलाबराव आबासाहेब हेंडगे, जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. पोपट संदिपान शिंदे, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी, सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थी यांनी त्यांचे दि. २१.०२.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये त्यांचे आयोगाकडील विचाराधीन अपील, त्यांना आवश्यक ती माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याने, ते मागे घेत असल्याचे म्हटले आहे.

खुद्द अपिलार्थी आयोगाकडे केलेले द्वितीय अपील मागे घेत असल्याने, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील आता खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्रमांक १७४३/२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०६.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंत संपतराव मुंडे, "गौरीकुंज" मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७४४

निर्णय दिनांक ०६-११-२००८

१ श्री. पारसनंद यादव, : अपिलार्थी
रा. जालना जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
परतूर जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,
परतूर, जि.जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. विजय भगवानराव वाघ, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर जि. जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. उमेश रमाकांतराव घाटगे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर जि.जालना (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. पारसनंद यादव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १३.११.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन

माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे त्यांच्या दि.२८.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. २८.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, - "रो.ह.यो. अंतर्गत प्राप्त झालेली पतमर्यादा ज्या कामावर खर्च करण्यात आली, त्या सर्व कामांमधील दोन मस्टर (कोणत्याही कामावरील) कामनिहाय देण्यात यावे."- ही दि. १.४.२००७ ते १.७.२००७ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने दि. ४.१०.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१०.२००७ रोजी प्राप्त झाले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, मात्र याबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.१०.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पाच दिवसांच्या आत देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी कळवूनही माहिती प्राप्त न झ ाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. ३.११.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे. मात्र ही माहिती मिळाल्याची अपिलार्थीची पोचपावती ते आयोगासमोर सादर करु शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यांचे मते अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक

असलेली माहिती मिळाल्याचे दूरध्वनीवरुन आज दि. ६.११.२००८ रोजी सांगितले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या सारख्या जबाबदार अधिकाऱ्यांनी आयोगासमोर कोणत्याही पुराव्याशिवाय प्रतिपादन असे करणे हे केवळ त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीचे द्योतकच नाही तर त्यांचे मनातील माहिती अधिकार अधिनियमाचा अनादर स्पष्ट करणारे विधान आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. जन माहिती अधिकारी त्यांची अपिलार्थीस माहिती दिली व सदर माहितीची पोच अपिलार्थीने तोंडी स्वरुपात दिली आहे, हे विधान पुराव्याअभावी अमान्य करण्यात येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत न देणे, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२.१०.२००७ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीस पाच दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेशित करुनही अपिलार्थीस दि. ३.११.२००८ रोजी म्हणजे विलंबाने माहिती देणे, या जन माहिती अधिकारी यांच्या कृतीतून त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट होतो, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी उपरोक्त प्रकरणी केलेल्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, त्यामुळे उपरोक्त प्रकरणी त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस सचिव (कृषि) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ुळु दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३)सचिव (कृषि) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदार वर्तनाबाबत व त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०६.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पारसनंद यादव, संपादक- जनता करे पुकार, महात्मा गांधी रोड, देवगिरी बँकेच्या खाली, जालना जि. जालना -४३१ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७४५

निर्णय दिनांक ०६-११-२००८

१ श्री. पारसनंद यादव, : अपिलार्थी
रा. जालना, जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
भोकरदन जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी
उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय,
जालना, जि.जालना

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : तालुका कृषि अधिकारी,
भोकरदन, जि.जालना

जन अपिलीय अधिकारीः उपविभागीय कृषि अधिकारी,जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.शेख सुपडू शेख उस्मान (अनु), जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन जि. जालना यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नंदकुमार अनंतराव टाक, तंत्र अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना जि.जालना यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. पारसनंद यादव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १३.११.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये त्यांनी तालुका कृषि अधिकारी, भोकरदन यांच्याकडून त्यांना, त्यांच्या दि. २७.८.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे,

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. २७.८.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या जाणाऱ्या रोजगार हमी योजनेअंतर्गत कोणत्याही कामावरील एक मस्टरची, दि. १.१.२००७ ते ३१.६.२००७ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे एकूण रु. १५५०/- भरण्याचे सूचित केले, असे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर विधान केले. या विधानापृष्ठयर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांना लिहिलेल्या दि. २१.२.२००८ रोजीच्या पत्राची प्रत सादर केली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या कथित दि. ०१.०९.२००७ रोजीच्या पत्राची प्रत आज रोजी आयोगास पाहणीकरिता उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ४.१०.२००७ रोजी प्रथम अपील करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ४.३.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती

पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दि. १४.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रु. १५५०/- इतके शुल्क भरण्याचे ज्या कथित पत्राद्वारे सूचित केले होते, त्या पत्राची प्रत आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपलब्ध करुन देऊ शकत नाही, अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेश देण्यावाचून आयोगास गत्यंतर नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यास नकार दिला असल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

2) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०६.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पारसनंद यादव, संपादक- जनता करे पुकार, महात्मा गांधी रोड, देवगिरी बँकेच्या खाली, जालना जि. जालना -४३१ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७४६

निर्णय दिनांक    ०६-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. महंमद वसीम महंमद एकबाल सौदागर, रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, गुलजार एज्युकेशन सोसायटी मार्फत इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड जि.नांदेड. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. महंमद वसीम महंमद एकबाल सौदागर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्रीमती फरहत सुलताना, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, गुलजार एज्युकेशन सोसायटी मार्फत इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड जि.नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड जि.नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १०.४.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय

अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांनी इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेडच्या संदर्भात मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित मुदतीत दिली नाही. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झ ााल्याने त्यांनी संबंधित संस्थेच्या सचिवांकडे दि. २०.३.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपील केले असता, सदर अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. तसेच त्यांनी उपरोक्त प्रकरणी दि. २९.१.२००७ रोजी  शिक्षणाधिकारी, प्राथमिक,जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे अर्ज केला असता, त्यांनी या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारचा निर्णय न घेऊन त्यांनी संबंधित संस्थेच्या सचिवांकडे अपील करण्यास त्यांच्याकडील दि. ८.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले. शिक्षणाधिकारी (प्रा) यांच्या या सूचनेप्रमाणे वरीलप्रमाणे संस्थेच्या सचिवांकडे अपील केले असता, त्यांनी सदर अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसून, सदर माहिती त्यांना प्राप्त होण्यापासून ते आजही वंचित राहिले आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते. अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ५.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, - " इकरा ऊर्दु प्राथमिक शाळेच्या शासकिय मान्यतेच्या आदेशाची सत्यप्रत तसेच सदरील शाळेच्या सन १९९६ पासुन ते २००६ या कालावधीतील संच मान्यता आदेशाची सत्यप्रत मिळणेबाबत. सदर शाळेतील कायमस्वरुपी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी नियमाप्रमाणे वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीची सत्यप्रत तसेच शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाच्या ठरावाची सत्यप्रत व जि.प. शिक्षण विभागाकडून या कर्मचाऱ्यांच्या कायमस्वरुपी भरतीसाठी मिळालेल्या मान्यतेच्या आदेशाची सत्यप्रत " -  ही माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे मागितली होती.

उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस मिळाली नसल्याचे आज सुनावणीमध्ये अपिलार्थी सांगत आहेत.

आज रोजी सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पाठविल्यापृष्ठयर्थ अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगच्या पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ७.१.२००७ रोजी माहिती पाठविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने मागणी केलेल्या सर्व मुद्यांवरील माहिती माहितीमध्ये समाविष्ट असल्याचे दिसून येते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली होती, परंतु काही कारणास्तव सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त होऊ शकली नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस ही माहिती लागलीच व विनामूल्य देण्यास तयार आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचा प्रथम अपील अर्ज सचिव, गुलजार एज्युकेशन सोसायटी मार्फत इकरा, ऊर्दू प्राथमिक शाळा यांनी स्वीकारण्यास नकार दिला असल्याचे नमूद केले आहे. सदर अर्ज स्वीकारण्यास नकार देण्याचे कारण उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी संबंधित कालावधीमध्ये त्या मुख्यालयाच्या बाहेर गेल्या असल्याने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त होऊ शकला नाही. हा अर्ज अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाने रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता, त्यामुळे सदर अर्ज पोस्टमनने अपिलार्थीस परत केला असावा, असे त्यांनी अंतीमतः प्रतिपादन केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या

युक्तीवादात तथ्यांश असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशाप्रकारच्या प्रसंगांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने त्यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे दाखल होणाऱ्या पत्रव्यवहाराची स्वीकृती करण्यासाठी त्यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये वेगळी व्यवस्था करावी.

या प्रकरणामध्ये अपिलार्थी अथवा प्रतिवादी यांच्यापैकी कोणीही दोषी आढळून येत नसल्याने वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०६.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महंमद वसीम महंमद एकबाल सौदागर,रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, गुलजार एज्युकेशन सोसायटी मार्फत इकरा ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७४७

निर्णय दिनांक ०६-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मनिष भगवानदास अग्रवाल,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>खुलताबाद जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,<br>औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. मनिष भगवानदास अग्रवाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. मोहन गोविंदराव वडजकर, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद जि. औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मधुकर भुजंगराव देशपांडे, उपकार्यकारी अभियंता,जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २९.०५.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. २.८.२००५ रोजी दाखल केला होता. मूळात सदर अर्ज अपिलार्थी यांनी महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ अनुसार केला असल्याने व सदर अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नसल्याने अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे. (प्रसंगावशात्, उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची आज रोजी तयारी दर्शविली आहे. सदर माहिती स्वीकृत करण्यास अपिलार्थी यांनी देखील तयारी दर्शविलेली आहे, हे नमूद करण्यात येत आहे.)

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. १७४७/२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०६.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, अे-५१,नाथनगर, सिंधी कॉलनीच्या पाठीमागे, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,खुलताबाद, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७४८

निर्णय दिनांक ०६-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रामराव नारायणराव कुलकर्णी,<br>मु.पो.बर्दापूर, ता.अंबाजोगाई जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उपअधीक्षक,<br>बीड जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक,<br>बीड जि.बीड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. ०६.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रामराव नारायणराव कुलकर्णी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. ओंकार फुलसिंग चव्हाण, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, बीड(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बीड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०६.०७.२००६ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.७.२००५ रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ मधील तरतुदीन्वये केला होता. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दि. २०.७.२००५ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देखील दिला होता. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे १ वर्ष ११ महिने १० दिवस इतक्या विलंबाने केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर दि. ११.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. २२.१०.२००७ रोजी या संदर्भातील आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली असल्यामुळे, अपिलार्थीचे सदर अपील निकाली काढले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.७.२००६ रोजी द्वितीय अपील केले आहे. आज सुनावणीचे वेळी जिल्हा पोलीस उपअधीक्षक, बीड श्री.ओंकार फुलसिंग चव्हाण यांनी या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे एक शपथपत्र सादर केले असून त्याचे अवलोकन करता व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथम अर्ज महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ मधील तरतुदीनुसार केला, सदर अर्जावर निर्णय देण्याचे अधिकार राज्य माहिती आयोगास नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २२.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या प्रतिसादाचे अवलोकन करता सदर प्रतिसाद आयोगास योग्य वाटतो. सबब अपिलार्थीचे सदर अपील

फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०६.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामराव नारायणराव कुलकर्णी, मु.पो.बर्दापूर ता. अंबाजोगाई जि. बीड

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७९१

निर्णय दिनांक ०७-११-२००८

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक,
सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
नांदेड

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. अनिल गणपतराव रामोड, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ११-०९-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी त्यांनी अपर जिल्हाधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल करुनही त्यांना माहिती देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ झाली असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये नांदेड जिल्ह्यातील घाऊक व अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांसंदर्भात सन १९९० ते डिसेंबर २००६ या कालावधीशी संबंधीत माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या स्वाक्षरीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २७-१०-२००८ रोजीचे त्यांचे पत्र त्यांनी सादर केले असून या पत्रामध्ये, अपिलार्थीने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली सर्व माहिती त्यांना दिनांक १३-०९-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे व प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाल्याचे नमूद करुन अपिलार्थीस या प्रकरणी कोठलीही तक्रार राहिली नसल्याने हे प्रकरण निकाली काढण्यात यावे, अशी विनंती केली आहे. या पत्राची एक प्रत त्यांनी राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयास दिल्याचे दिसून येते. खुद्द अपिलार्थीनेच आता त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने व या प्रकरणी त्यांची काहीही तक्रार राहिली

नसल्याने त्यांचे अपील निकाली काढण्याची संबंधिताने विनंती केली आहे. ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांच्याकडून शासकीय रॉकेल वितरणाची माहिती घेतली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने विचारलेली माहिती ही संपूर्ण माहिती संबंधीत तहसीलदार त्यांच्याकडे नियमीतपणे ठेवत नसल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने अन्नधान्याची माहिती मागविल्यास तहसीलदार परत संबंधीत किरकोळ अन्नधान्य परवानाधारकास ही माहिती विचारीत असतात, त्यांची ही कृती बरोबर नाही, याबाबत तहसीलदार स्तरावर संबंधीत नियमांचे / आदेशाचे योग्य त-हेने पालन होत नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब सचिव अन्न व नागरी पुरवठा, यांना, अपिलार्थीने या प्रकरणी ज्या स्वरुपाची माहिती मागितली आहे अशा स्वरुपाची माहिती इतर अर्जदारांकडूनही मागविली जाण्याची शक्यता लक्षात घेऊन या माहितीच्या व्यवस्थापनासंदर्भात योग्य ते परिपत्रक जारी करावे असे अधिनियमातील २००५ च्या कलम १९ (८) (क) (तीन) व (चार) नुसार सुचित करण्यात येत आहे.

उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील क्रमांक १७९१/२००७, दिनांक ११-०९-२००७ हे निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक १७९१/२००७, दिनांक ११-०९-२००७ निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव (अन्न व नागरी पुरवठा) यांनी त्यांच्या विभागाकडील क्षेत्रिय कार्यालयाकडे अन्नधान्य वितरणासंबंधी आवश्यक माहिती जनसामान्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्वरीत देण्याकरीता लागणा-या माहितीच्या व्यवस्थापनासंदर्भात सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सविस्तर सूचना देणारे परिपत्रक त्वरित जारी करावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (अन्न व नागरी पुरवठा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७९२

निर्णय दिनांक ०७-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>मुख्य संपादक,<br>सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,<br>नांदेड | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, धर्माबाद,<br>जिल्हा नांदेड | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. गंगाधर शिवलिंग रामोड, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. एम. आर. ठेंग, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०३-१०-२००७ रोजीचे पत्र आयोगास सादर केले. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना एप्रिल २००७ मध्ये परस्पर अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांकडून प्राप्त झाली असल्याने त्यांची यासंदर्भात कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद करुन त्यांचे दिनांक १०-०४-२००७ रोजीचे व यापूर्वीचे सर्व अर्ज निकाली काढण्यास जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच आता त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे. अपिलार्थीने मूळात प्रथम अपिल निकाली काढण्याची विनंती केल्याने त्यांचे व्दितीय अपील आपोआप तथ्यहीन ठरत आहे.

या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील क्रमांक १७९२/२००७, दिनांक १०-०४-२००७ हे निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १७९२/२००७, दिनांक १०-०४-२००७ निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७९३

निर्णय दिनांक  ०७-११-२००८

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक,
सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, मुखेड,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. पी. के. ठाकूर, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, जिल्हा नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २०-०६-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहिती मिळण्यासाठी रितसर पोस्टाने दिनांक २०-०३-२००७ रोजी अर्ज पाठवून दिला होता. माहिती प्राप्त होण्याची विहित मुदत संपल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे नाकारले व जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय आजतागायत दिलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमान्वये त्यांच्याकडे, किती अर्जदारांनी माहिती अधिकार अधिनियमा २००२ व २००५ च्या तरतुदीनुसार माहिती मागितली त्या अर्जदारांच्या नावांची यादी, किती लोकांना माहिती पुरविण्यात आली व त्यांच्याकडून किती शुल्क वसूल करण्यात आले व वसूल करण्यात आलेल्या शुल्काच्या चलनाच्या सत्यप्रती तसेच दिनांक ०६-०९-२००५ च्या अर्जानुसार अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ नांदेडला दिनांक ०८-११-२००५ रोजी पुरविलेल्या माहितीचे शुल्क व टपालखर्च किती वसूल करण्यात आला, याची माहिती मागविली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीस संबंधीत जन माहिती अधिकारी हे हजर आहेत. त्यांनी आयोगास त्यांच्या कार्यालयाचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दिनांक १८-०८-२००८ चे पत्र सादर केले असून त्यामध्ये राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडील दिनांक १४-८-२००८ रोजीच्या सुनावणीचा संदर्भात दिलेले आहे व यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रुपये २ याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात शुल्क भरण्याची विनंती केली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यात येणारी माहिती नक्की किती पृष्ठांची आहे त्याचा त्यांनी उल्लेख केला नसल्याने हे पत्र अवैध ठरत आहे, तसेच आज रोजी विचाराधीन असलेल्या व्दितीय अपिलासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती व आयोगाकडे याच अपिलार्थीच्या अपिलावर दिनांक १४-०८-२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या संदर्भातील प्रथम अर्जाची माहिती, या दोन्ही माहितीचे विषय पूर्णत: भिन्न असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००७ च्या प्रथम अर्जास कोणत्याही प्रकारे आजतागायत पर्यंतच्या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर कोठल्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. एवढेच नव्हे तर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या आज विचाराधीन असलेल्या प्रथम अर्जाचे नीट वाचन देखील केले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे येथे सिध्द होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती दिल्याचे सांगत आहेत, तथापि अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती दिली, ती कधी दिली व अपिलार्थीस माहिती मिळाल्याची पोहोच याबाबत कोणतीही कागदपत्रे ते आयोगास दाखवू शकत नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील "माहिती" या व्याख्येशी सुसंगत असल्याचे दिसून येते. माहिती मागणे हा अपिलार्थीस अधिनियमातील कलम ३ नुसार मिळालेला हक्क असून अपिलार्थीस ती माहिती विहित मुदतीमध्ये देणे हे जन माहिती अधिकारी यांचे अधिनियमातील कलम ७ प्रमाणे कर्तव्य आहे, तथापि उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य योग्य व नीट प्रकारे पार पाडल्याचे दिसून येत नाही. त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अशा प्रकारच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे व संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०७-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७९४

निर्णय दिनांक ०७-११-२००८

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक,
सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, भोकर,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. बाबुराव माधवराव परतवाड, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. किशोर बाबुराव जक्कल, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकर, जिल्हा नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २०-११-२००६ रोजीच्या त्यांच्या प्रथम अर्जान्वये भोकर तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते लक्ष्मण देविदास उत्तरवार, परवाना क्रमांक ३२/९८ यांना शासनाकडून वितरीत केलेल्या रॉकेलची महिनेवारी रॉकेल वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रतीची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या दिनांक २०-११-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक १२-१२-२००६ रोजी प्रतिसाद देऊन या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३०४० इतके भरण्यास सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहितीचा दर यांचा उल्लेख केला असल्यामुळे ते वैध ठरत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलासंदर्भात दिनांक २९-०३-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी सर्व वैध प्रक्रिया वेळेत पूर्ण केल्या आहेत, तथापि अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरल्यामुळे त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या त्यांच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या निर्णयाशी आयोग सहमत असून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरुन प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचविण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्याची कारण म्हणजे त्यांनी आवश्यक त्या रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न

करणे, हे आढळून येत असल्याने व परिणामी अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वत:च जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे सदर अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७९५

निर्णय दिनांक ०७-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>मुख्य संपादक,<br>सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,<br>नांदेड | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिंगोली, जिल्हा हिंगोली | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, हिंगोली,<br>जिल्हा हिंगोली | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | तहसीलदार, हिंगोली |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस सौ. व्हि. आर. भालेराव, नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिंगोली, जिल्हा हिंगोली (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) ह्या हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हिंगोली, जिल्हा हिंगोली व अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २६-१०-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक ०७-०५-२००७ रोजीचा कथित प्रथम अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास सुनावणीमध्ये सांगितले, मात्र त्यांच्या या अर्जाच्या संदर्भातील कलम १९ (१) अन्वये केलेला अपील अर्ज तहसीलदार, हिंगोली यांच्याकडे प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले. आपल्या युक्तिवादामध्ये त्यांनी आयोगास असे अवगत केले की, हिंगोली जिल्ह्यामध्ये संबंधीत उपविभागीय अधिकारी हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेलेले असल्याने त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही कारवाई केलेली नाही. तहसीलदार हिंगोली यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे विनाकारवाई तसाच ठेवण्याची कृती अयोग्य असून त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीचा दिनांक १५-०६-२००७ रोजीचा कलम १९ (१) अन्वये केलेला अर्ज त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ५ दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांच्याकडे पाठवावा. उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपील निर्णय देतांना होणारा संभाव्य विलंब क्षमापित करुन

अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२००७ च्या प्रथम अपिलावर हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन तदनंतर ७ दिवसाच्या आत त्यांनी आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन तदनंतर ७ दिवसाच्या आत त्यांनी आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद

दिनांक ०७-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७९६

निर्णय दिनांक ०७-११-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>मुख्य संपादक,<br>सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,<br>नांदेड | | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, कळमनुरी, जिल्हा हिंगोली | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, कळमनुरी,<br>जिल्हा हिंगोली | | प्रतिवादी |
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | तहसीलदार, कळमनुरी, जिल्हा हिंगोली |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. हरिचंद्र आनंदा गवळी, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी, जिल्हा हिंगोली, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २६-१०-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी तहसीलदार, कळमनुरी हे जन माहिती अधिकारी असून उपविभागीय अधिकारी, हिंगोली हे जन अपिलीय अधिकारी आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आयोगास अशा स्वरुपाचे लिखीत निवेदन सादर केले आहे की, अपिलार्थीच्या अर्जाची प्रत त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने सदर अर्ज नायब तहसीलदार (पुरवठा) जे या प्रकरणी जन माहिती अधिकारी नाहीत त्यांच्याकडे केला होता. तसेच अपिलार्थीने उपरोक्त प्रकरणी दिनांक १५-०६-२००७ रोजी तहसीलदार कळमनुरी यांच्याकडे अपील केल्याचे म्हटले आहे. तथापि हा अर्ज देखील त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. या पत्रामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांच्याकडे प्रथम अपील करुन माहिती प्राप्त करुन न घेता त्यांनी सरळ आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे व ते नियमाबाह्य आहे. अर्जदारास केवळ कर्मचा-यास व कार्यालयास त्रास देऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज देणे व अपील करणे असा त्यांचा स्वभाव असल्याचे दिसून येते. अर्जदाराचा अर्ज व अपील अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस माहिती मिळाली नाही. या प्रकरणी तहसीलदार कळमनुरी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी

आता आयोगाच्या नोटीशीबरोबर प्राप्त झालेल्या अपिलार्थीच्या माहितीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन करुन अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज पोस्टाने पाठविला किंवा कसे यासंदर्भात कोणताही पुरावा सादर केलेला नाही व आज सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राह्य धरुन अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तहसीलदार, कळमनुरी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत आवश्यक ती कारवाई करावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७९७

निर्णय दिनांक ०७-११-२००८

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक,
सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, वसमत,
जिल्हा हिंगोली

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : तहसीलदार, वसमत, जिल्हा हिंगोली
जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी, वसमत, जिल्हा हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्रीमती संगेवार ए. जी. नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) ह्या हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वसमत, जिल्हा हिंगोली हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २६-१०-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने नायब तहसीलदार, वसमत, जिल्हा हिंगोली यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये ०१ एप्रिल २००० ते ३० एप्रिल २००७ या ७ वर्षातील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत काही माहिती मागविली होती. या माहितीमध्ये वसमत तालुक्याचे शासकीय गोडाऊनपाल यांना शासनाकडून शहरी व ग्रामीण भागाच्या स्वस्त धान्य दुकानदारांना वाटप करण्यासाठी दिल्या गेलेल्या गहू व तांदुळाच्या वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच रोजगार हमी योजने अंतर्गत व दारिद्र्य रेषेखालील योजनेअंतर्गत शासनाकडून दिल्या गेलेल्या गहू व तांदुळाच्या कोणकोणत्या खात्याला किती अन्नधान्य पुरविण्यात आले याचा खातेनिहाय तपशील तसेच त्या विभागाला वितरण केलेल्या गहू, तांदळाचे वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रतींची मागणी केली होती.

आज रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक ०७-०५-२००७ रोजीचा अर्ज प्राप्त झाला नसल्याचे आयोगासमोर सांगितले, तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे केलेला दिनांक १५-०६-२००७ रोजीचा अपील अर्ज त्यांना दिनांक १६-०६-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे कबूल केले. अपिलार्थीचा अपील अर्ज हा या प्रकरणी प्रथम अर्ज समजून तहसीलदार, वसमत यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०७-२००७ रोजी पत्र पाठवून त्यांना आवश्यक असलेल्या

माहितीपोटीचे शुल्क रुपये ३६१६४ इतके भरण्यास सूचित केले, तथापि अपिलार्थी यांनी सदर शुल्क भरले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. उपरोक्त प्रकरणी तहसीलदार, वसमत हे जन माहिती अधिकारी व उपविभागीय अधिकारी, वसमत हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. या प्रकरणी येथे असे आढळून येते की, अपिलार्थीने जे प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत त्या उपविभागीय अधिकारी, वसमत यांच्याकडे या प्रकरणी अधिनियमातील कलम १९ (१) नुसार अपील केलेले नाही. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांचा शुल्क भरण्याचा निर्णय त्यांना मान्य नसेल तर त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये उपविभागीय अधिकारी, वसमत, जे प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत त्यंच्याकडे प्रथम अपील करावे. त्यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य नसल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे त्याविरुध्द दाद मागू शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७९८

निर्णय दिनांक ०७-११-२००८

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, — अपिलार्थी
मुख्य संपादक,
सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उमरी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा तहसीलदार, उमरी,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. शंकर पुणाजी राठोड, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उमरी, जिल्हा नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उमरी, जिल्हा नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २४-०७-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये, त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले असून त्यांना जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यासाठी जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ करत असल्याचे नमूद केले आहे तर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या प्रथम माहितीसाठीच्या अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयामध्ये भरण्याचे सूचित केले आहे. या प्रकरणी तहसील कार्यालय, उमरी यांनी त्यांच्याकडील क्रमांक ०७/पुर-प्रशा-सिआर-उमरी या एकाच क्रमांकाने अपिलार्थीस दिनांक ०९-०५-२००७ रोजी दोन वेगवेगळी पत्रे लिहिली असून एका पत्रात अपिलार्थीस रुपये ११०५२ व दुस-या पत्रामध्ये रुपये ८०२२ इतके शुल्क भरण्याचे सूचित केले आहे. या दोन्ही पत्रांचा संदर्भ एकच आहे. या दोन्ही पत्रांचे अवलोकन केले असता अपिलार्थीस द्यावयाची माहिती निश्‍चित किती पृष्ठांची आहे याची मूळात जन अपिलीय अधिकारी यांच्या मनात खात्री झाली नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीचा दिनांक २०-०३-२००७ रोजीचा अर्ज नायब तहसीलदार तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०३-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे आज सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे सर्वसाधारण

परिस्थितीत अपिलार्थीच्या या अर्जावरील निर्णय जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०४-२००७ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीस कळविणे भाग होते, तथापि त्यांनी या प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली नाही व अंतिमतः जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या या अर्जास मूळात दिनांक ०९-०५-२००७ रोजी म्हणजेच अधिनियमातील विहित मुदत व्यपगत झाल्यानंतर प्रथम प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना आता विनामूल्य माहिती द्यावी लागेल. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. अधिनियमातील कलम ३ प्रमाणे माहिती मागण्याचा अपिलार्थीस हक्क आहे व कलम ७ प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांचा निर्णय विहित मुदतीत कळविणे अनिवार्य आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी आपली जबाबदारी विहित मुदतीत पार न पाडल्यामुळे त्यांना अपिलार्थीस आता ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीशी पत्रव्यवहार तहसिलदार जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहे त्यांनीच केला असून प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांचे हे वर्तन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींशी पूर्णतः विसंगत असून त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल जिल्हाधिकारी, नांदेड यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जिल्हाधिकारी (नांदेड) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७९९

निर्णय दिनांक ०७-११-२००८

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, — अपिलार्थी
मुख्य संपादक,
सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा तहसीलदार, पूर्णा,
जिल्हा परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस सौ. अनुराधा दिगंबरराव ढालकरी, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा, जिल्हा परभणी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) ह्या हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या पत्राची सत्यप्रत आयोगास सादर केली. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०१-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या संपूर्ण माहितीच्या सत्यप्रती त्यांना प्राप्त झाल्या असल्याचे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद करुन त्यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये दिनांक ११-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

उपरोक्त पत्रावरुन अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाल्याचे सिध्द होत असल्याने व अपिलार्थीची याबाबत तक्रार नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले सदर अपील क्रमांक १७९९/२००७, दिनांक ११-०९-२००७ हे निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १७९९/२००७, दिनांक ११-०९-२००७ निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८५

निर्णय दिनांक  ११-११-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुभाष रतनसिंग महेर,<br>रा. व्दारा - श्री. पी. एम. राजपूत,<br>एन-७, सी-१ - ३७, सिडको,<br>औरंगाबाद | | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | प्रतिवादी |
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. संतोष गस्तगार, अपिलार्थी श्री. सुभाष रतनसिंग महेर यांचे वकील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. गजानन सुगदेव सुसर, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अरुण लक्ष्मणराव डुबे, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२-०५-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मागणी केलेली माहिती विहित मुदतीत न मिळाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदी-प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे शैक्षणिक वर्ष १९९२ पासून ते दिनांक ०४-०१-२००६ पर्यंतच्या कालावधीशी संबंधीत ग्रामोद्योगिक शिक्षण मंडळ संचलित एम. आय. टी. हायस्कूल, सिडको, एन-४ या शाळेच्या कार्यरत शिक्षकांची कर्मचारी सेवाज्येष्ठता सूची यादीची व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज या प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी म्हणून ज्यांची नियुक्ती केली आहे असे मुख्याध्यापक, एम. आय. टी. हायस्कूल यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक १२-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविला व

त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. तदनंतर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी मुख्याध्यापक, एम. आय. टी. हायस्कूल यांना दिनांक ०४-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्याची सूचना दिल्याचे देखील आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पत्रावरुन दिसून येत आहे. संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १६-०३-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०६-००६ रोजी आपले आदेश देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्वरीत देण्याचे सूचित केले. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर अपील निर्णयाची प्रत त्यांना प्राप्त झालेली नाही, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भात राज्य माहिती आयोगाकडे आतापर्यंत एकूण ३ वेळा सुनावणी घेण्यात आली आहे. यातील पहिली सुनावणी दिनांक १८-०७-२००७ रोजी झाली, दुसरी सुनावणी दिनांक ११-०९-२००७ रोजी व तिसरी सुनावणी दिनांक ०४-०६-२००८ रोजी झाली आहे. या प्रकरणी झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, संबंधीत शिक्षणाधिकारी यांचे खाजगी शाळेवर पूर्णतः नियंत्रण असून त्यांनी मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे उपलब्ध असावयास हवी, तथापि त्यांनी ही माहिती न देता संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडे ही माहिती असल्याचे अपिलार्थीस कळविले. आयोगाकडे झालेल्या सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशानुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०९-२००७ रोजी काही माहिती पुरविली आहे, तथापि सदर माहिती अपूर्ण असल्याचे अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले. अपिलार्थी यांच्या मते शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून त्यांनी मागितलेली माहिती शैक्षणिक वर्ष १९९२ सालापासूनची होती तर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना १९९९ पासूनची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी १९९२ ते १९९९ या कालावधीची सेवाज्येष्ठता यादीसंबंधीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील कलम १२ (१) मधील तरतुदीनुसार प्रत्येक शाळेतील संबंधीत सेवाज्येष्ठता सूची ही त्या शाळेच्या व्यवस्थापनाने तयार करावयाची असते. अपिलार्थीने ज्या संस्थेतील कर्मचा-यांच्या सेवाज्येष्ठता सूचीची यादी मागितली आहे ती माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, ती माहिती शाळेकडून प्राप्त झाल्यानुसार जशीच्या तशी अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थी यांच्या मते त्यांच्या माहितीचे २ शिक्षक या संस्थेमध्ये १९९६-९७ साली कार्यरत असतांना देखील त्यांची नांवे या संस्थेच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये समाविष्ट केलेली नाहीत. यावर जन माहिती अधिकारी यांनी देखील आयोगाचे लक्ष महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील कलम १२ (१) व (२) कडे वेधले. यामध्ये ज्येष्ठता सूची किंवा त्याच्यातील बदल याबाबत कोणी काही आक्षेप घेतला असल्यास व्यवस्थापनाकडून त्याचा विचार केला जाईल असे म्हटले आहे. जर व्यवस्थापनाचा निर्णय मान्य नसेल तर याच अधिनियमातील कलम १२ (३) नुसार सदर बाब शिक्षणाधिका-याकडे निर्णयासाठी निर्देशित करण्यात येईल असे म्हटले आहे, हे पाहता अपिलार्थीस त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर जर काही आक्षेप असतील तर महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील कलम १२ (३) च्या तरतुदीनुसार त्यांनी कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित संस्थेच्या अनुशेष रोस्टरची माहिती दिल्याचे दिसून येते तथापि सेवाजेष्ठतासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १९९२ पासून माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे संबंधित शिक्षणसंस्थेने प्रत्येक वर्षी त्यांच्या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवाजेष्ठता यादी ठेवणे हे संस्थेचे कर्तव्य आहे. मात्र संबंधित शिक्षणसंस्थेकडे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे जर प्रत्येक वर्षीची सेवाजेष्ठता यादी नसेल तर त्या संस्थेवर जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सदर संस्थेकडील उपलब्ध अभिलेख्याची विशेष प्रतिनिधीमार्फत तपासणी करुन अपिलार्थीने म्हटल्याप्रमाणे या संस्थेकडे प्रत्येक वर्षाची सेवाजेष्ठता यादी उपलब्ध आहे किंवा कसे याची हे आदेश निर्गमित होताच एका महिन्याच्या आत तपासणी करुन, जर ही माहिती संस्थेकडे उपलब्ध असेल तर ती अपिलार्थीस सदर तपासणी नंतर १५ दिवसाच्या आत

उपलब्ध करुन द्यावी, किंवा संस्थेकडे माहिती उपलब्ध नसल्यास त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावे. संस्थेवर कारवाई करण्यासंदर्भातील मुद्दयावर खालील परिच्छेदामध्ये उहापोह केला आहे.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात अधिनियमाच्या कलम २० (१) व (२) च्या तरतुदींवर वर भर दिला. यासंदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना प्रथम प्रतिसाद दिला आहे. मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कोणाकडे उपलब्ध असावयास हवी हे पाहिले असता असे दिसून येईल की, ही माहिती सर्वसाधारणतः संबंधीत शाळेच्या व्यवस्थापनाकडे उपलब्ध असणे अपेक्षित आहे. अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे संबंधित शिक्षण संस्थेवर, त्यांनी मागितलेली माहिती संस्थेकडे उपलब्ध नसल्याने शिक्षणाधिका-यानी कारवाई करावी तथापि अशी कोणतीही कारवाई शिक्षणाधिकारी करीत नाहीत यावर, या शाळेच्या कथित गैरव्यवस्थापनामुळे या शाळेची मान्यता शासनाने २००७ साली काढून घेतली, यावर मा. उच्च न्यायालयाने शासनाच्या बाजूने निर्णय दिला असून त्यावर सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती असल्याने सदर शाळा आज मान्यता प्राप्त शाळा म्हणून कार्यन्वित आहे असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले. या वस्तुस्थितीमुळे सद्यःस्थितीत संस्थेवर कारवाई करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची वाट पाहणे भाग आहे.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये मूळात अपिलार्थीने मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्याकडे नव्हतीच. त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी त्यांच्या पातळीवर संबंधीत संस्थेशी बराच पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत आहे. या शाळेवर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांचे जरी नियंत्रण असले तरीही अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे अंतीमतः सदर संस्थेकडून जी माहिती उपलब्ध आहे तीच माहिती अपिलार्थीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद उपलब्ध करुन देऊ शकतील हे उघड आहे. अपिलार्थीस अपेक्षित, अधिनियमातील कलम २० प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेवर करावयाची कारवाई ही प्रत्यक्षतः माहिती ज्या प्राधिकरणाच्या ताब्यात आहे त्यांच्यावर करणे अधिनियमामध्ये मूलतः अभिप्रेत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत संस्थेकडून माहिती घेण्याचे सूचित केले आहे. दिनांक १८-०७-२००७ च्या सुनावणीमध्ये संबंधित संस्था हे वेगळे व सक्षम प्राधिकरण असल्याचा व त्या प्राधिकरणास स्वतंत्र अधिकारिता असल्याचा मुद्दा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर मांडला होता. हा मुद्दा आयोग मान्य करीत असून या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी टाळाटाळ केल्याचे अथवा त्यांच्यापासून माहिती दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची अपिलार्थीची विनंती आयोग मान्य करत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद
दिनांक ११-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष रतनसिंग महेर, रा. व्दारा - श्री. पी. एम. राजपूत, एन-७, सी-१, ३७, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१५७४

निर्णय दिनांक ११-११-२००८

१ श्री. पुरुषोत्तम पद्माकरराव देशपांडे, अपिलार्थी
मायभाटे निवास, भानुनगर,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. विवेक चंद्रकांत नवले, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद व अपिलार्थी श्री. पुरुषोत्तम पद्माकरराव देशपांडे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १९-०५-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने माहिती अधिकारी यांनी अवाजवी शुल्क आकारणी केली असल्याने व मत्ता व दायित्व विवरणपत्र नाकारल्याने सदर अपील केले असल्याचे नमूद करुन त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद मधील सर्व उपकार्यकारी अभियंता, उप अभियंता यांचे मत्ता व दायित्व विवरणपत्र व हजेरीपुस्तकाची आपली मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९२ ते २००६ या १४ वर्षाच्या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, जन माहिती अधिकारी यांच्या विभागांतर्गत काम करणारे सर्व उप अभियंता, उप कार्यकारी अभियंता यांचे मत्ता व दायित्व यांच्या विवरणपत्राच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती सन २००३ ते २००६ या कालावधीतील रोहयोवरील मजूरी वाटपास ३ आठवडे किंवा त्यापेक्षा अधिक विलंब झालेल्या हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती व माहिती अधिकार अधिनियमान्वये सन २००४ पासून ते दिनांक १२-१२-२००६ पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जाच्या झेरॉक्स प्रती या मुद्दयावरील माहितीचा समावेश आहे. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८४,५७१ इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क अवाजवी

वाटल्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीअन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय दिनांक ०३-०२-२००७ रोजी पारीत केला. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेल्या फीची फेरगणना करुन, तदनंतर नियमानुसार सदर फी भरणा अपिलार्थीकडून करुन घेऊन माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०३-२००७ रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची फेरगणना करुन अपिलार्थीस देण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर कळवून त्यांना रुपये ९१,९१३ इतक्या रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करण्यासाठी सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले शुल्क अवाजवी वाटल्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये एकूण २ मुद्दे उपस्थित करुन, आपल्या माहितीतील हजेरीपुस्तकासंदर्भातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही एकूण १४ वर्षे इतक्या कालावधीशी संबंधीत होती. या सर्व कालावधीमध्ये उस्मानाबाद सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत एकूण ४ उपविभाग कार्यरत होते. प्रत्येक उपविभागाकडून जन माहिती अधिकारी यांना माहिती प्राप्त करुन तदनंतर ती अपिलार्थीस द्यावयास लागत होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या एकूण ४५,९५६ इतकी होते व अपिलार्थीस लागणा-या शुल्काचा सविस्तर तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या पत्रामध्ये दिला आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेली रक्कम रुपये ९१,९१३ इतकी आहे, परंतु प्रत्यक्षात हिशोब केला असता ही रक्कम रक्कम ९१,९१२ इतकी भरते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अवाजवी शुल्क आकारल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने याच अर्जामध्ये उस्मानाबाद सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व उप कार्यकारी अभियंता, उप अभियंता यांच्या मत्ता व दायित्व विवरणपत्राची मागणी केली आहे. अशा प्रकारच्या अर्जांवर आयोगाने वेळोवेळी निर्णय दिले असून, ही माहिती अपिलार्थीस त्यांना अधिनियमातील कलम ८ (त्र) अन्वये देय होऊ शकत नाही, कारण अशा प्रकारची माहिती अपिलार्थीस उघड केल्याने संबंधितांच्या खाजगी बाबीत अगंतूक हस्तक्षेप होईल असे आयोगास वाटते, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देय होणार नाही, तसेच या माहितीने अपिलार्थी नेमके कोणते सार्वजनिक हित साध्य करणार आहेत हे आयोगास अवगत करुन देण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर हजर नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये रोहयो कामावरील हजेरी पत्रकाच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ते शुल्क भरण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवितांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (क) च्या मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कोणत्याही शुल्काचा संपूर्ण तपशील व हिशोब द्यावयाचा असतो तो जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०५-०१-२००७ च्या पत्रामध्ये नाही. अपिलार्थीस कळविण्यात येणा-या शुल्काचा हिशोब कळवितांना त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होणार नाही. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ व्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली मुद्‌दा क्रमांक २ व ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. पुरुषोत्तम पद्माकरराव देशपांडे, मायभाटे निवास, भानुनगर, उस्मानाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७३९

निर्णय दिनांक ११-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मोहंमद अन्वरुल्लाखान बरकतउल्लाखान,<br>९-४-४५५, कय्युम प्लॉट्स,<br>नांदेड | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,<br>विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहंमद अन्वरुल्लाखान बरकतउल्लाखान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. राजेंद्र नवनीतदास जरीवाल, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. हेमंत संपतराव पगारे, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २९-०३-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने हे अपील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३० दिवसात माहिती प्राप्त न झाल्याने केले असून, त्यांनी या प्रकरणी दिनांक १८-०१-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असून, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीसाठी त्यांना बोलाविले नाही व त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात कोणतेही आदेश पारीत केले नाहीत, असे नमूद केले आहे. तसेच या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, एक महिन्याच्या आत सुनावणी घेऊन आदेश पारीत करण्याऐवजी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक २५-०१-२००७ रोजी कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प विभाग, नांदेड यांना लिहिलेल्या पत्राची प्रत दिली, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर एक महिन्याच्या आत सुनावणी घेण्याचे मान्य केले व त्यास अपिलार्थीने सहमती दर्शविली आहे, हे पाहता जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या उपरोक्त प्रकरणाशी संबंधीत दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन तदनंतर ७ दिवसाच्या आत आपले आदेश पारीत करावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या उपरोक्त प्रकरणाशी संबंधीत दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी, यासंदर्भात झालेला विलंब क्षमापीत करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत घेऊन तदनंतर ७ दिवसाच्या आत आपले आदेश पारीत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहंमद अन्वरुल्लाखान बरकतउल्लाखान, ९-४-४५५, कय्युम प्लॉट्स, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७५१

निर्णय दिनांक ११-११-२००८

१ श्री. अनिल प्रकाशराव पिरतवाड, अपिलार्थी
एन-११, बी-१७/२, टी. व्ही. सेंटर, हडको,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप संचालक (संशोधन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अनिल प्रकाशराव पिरतवाड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सखाराम भानुदास पुंगळे, जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दयानंद पंढरी जगताप, जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक (संशोधन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १८-०५-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याचे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय न दिल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. याच अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व अर्धवट माहिती दिल्याचे म्हटले आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, संबंधीत कार्यालयाने अंदाजे १००० हून जास्त लोकांना मन्नेरवारलू या जातीचे प्रमाणपत्र दिले असतांना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त ३४८ लोकांची यादी पुरविण्यात आली असून त्याच्यामध्ये वैधता प्रमाणपत्राचा कोठेही उल्लेख नाही. या सदर व्यक्ती कुठल्या आहेत त्याचाही यामध्ये उल्लेख नाही. मन्नेरवारलू ही जमात मागासवर्गीय जमातीपैकी असल्याने त्यांना ही माहिती या जमातीच्या अभ्यासाकरिता हवी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समितीने सन १९९७ ते दिनांक २१-०९-२००६ या कालावधीमध्ये ज्या व्यक्तींना मन्नेरवारलू या जमातीचे प्रमाणपत्र दिले आहे, आणि ज्यांच्या प्रमाणपत्राची वैधता तपासणी झाली आहे अशा व्यक्तींच्या नावांची यादी, वैधता प्रमाणपत्राच्या क्रमांकासह मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस एकूण ३४८ लोकांची माहिती दिली आहे, तथापि सदर माहितीवर

समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नसल्याचे आज सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी देखील मान्य केले आहे. आज रोजी झ ालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या माहितीप्रमाणे १००० हून जास्त लोकांना संबंधीत समितीने मन्नेरवारलू जमातीची प्रमाणपत्रे दिली आहेत. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अनुसूचित जमाती पडताळणी समिती, औरंगाबाद ही दिनांक १५-०३-२००१ रोजी स्थापन झाली असून दिनांक १५-०३-२००१ च्या पूर्वीची प्रकरणे नाशिक येथील अनुसूचित जमाती पडताळणी समितीकडे होती. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी का घेतली नाही या आयोगाच्या प्रश्नाला त्यांनी समर्पक उत्तर दिले आहे. त्यांचे म्हणण्याप्रमाणे संबंधीत अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडे त्यांच्या कार्यालयीन कर्मचा-याने सादर केले नसल्याने त्यांना अपिलार्थीच्या अपिलावर सुनावणी घेता आली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-१०-२००६ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०४-२००१ ते १८-०८-२००५ या कालावधीची माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने सन १९९७ ते दिनांक २१-०९-२००६ या कालावधीशी संबंधीत माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, सन १९९७ ते २००१ या कालावधीशी संबंधीत माहितीचा दिलेल्या माहितीमध्ये समावेश नाही, सबब ही माहिती अर्धवट ठरते. जर २००१ पूर्वीची माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा प्रथम अर्ज नाशिक येथील संबंधीत समितीकडे त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते, तथापि त्यांनी अशी कृती केल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही, तसेच सन २००५ ते २००६ या कालावधीमधील माहिती देखिल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २०-१०-२००६ च्या पत्राव्दारे दिली नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी हे जबाबदार आहेत. सबब अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याच्या दृष्टीने आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील सन १९९७ ते २००१ या कालावधीशी संबंधीत माहिती त्यांच्या प्राधिकरणाचा एक भाग असलेल्या नाशिक येथील कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन व तसेच त्यांच्या कार्यालयातील सन २००५ - २००६ या कालावधीतील माहिती एकत्रित करुन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. त्याचबरोबर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आज आयोगासमोर त्यांच्याकडे अंदाजे १००० लोकांना प्रमाणपत्रे दिली असल्याचे विधान केले आहे. तेव्हा त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या माहितीचा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ताळमेळ घालावा व या कामी त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पूर्णपणे सहकार्य द्यावे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदींचे पालन न करुन कोणताही निर्णय दिला नाही अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय न घेण्याची जन अपिलीय अधिकारी यांची कृती सर्वथा गैर आहे, त्यांनी अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी न घेण्यासाठी जे कारण सांगितले आहे ते आयोगास मान्य नाही. इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाप्रमाणे त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अपिलाची सुनावणी अधिनियमातील तरतुदीनुसार विहित कालावधीमध्ये घेऊन आपले निर्णय पारीत करावे असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिल्याने व अपिलार्थीपासून कोणतीही माहिती जाणीवपूर्वक दडवून ठेवल्याचे अथवा नाकारल्याचे निःसंशयपणे आढळून न आल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनिल प्रकाशराव पिरतवाड, एन-११, बी-१७/२, टी. व्ही. सेंटर, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक (संशोधन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७५२

निर्णय दिनांक ११-११-२००८

१ अॅड बडेकर ज्योती दिनकर, अपिलार्थी
क्रांती चौक, सोसायटी भिमनगर,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रशासकीय अधिकारी,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, तुळजापूर रोड, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, तुळजापूर रोड, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. सुरेश विठ्ठल उपळेकर, जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्रमोद भास्करराव पिंपळगांवकर, जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी अॅड बडेकर ज्योती दिनकर, ह्या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २८-०३-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने "मागविण्यात आलेली माहिती ही चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी असल्याने" राज्य माहिती आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी श्री. माळाळे एस. एस. विद्युत पंप परिचर, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद यांचे निलंबन व बडतर्फी केल्यासंदर्भात एकूण १४ मुद्दयांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांना श्री. माळाळे एस. एस. यांच्या निलंबनाबाबत एकूण १४ मुद्दयांवर दिनांक १९-०५-२००६ ते ३०-११-२००६ या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मागितलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क प्रतिपृष्ठ रुपये २ प्रमाणे त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व तदनंतर दिनांक ०३-०१-२००७ रोजी त्यांची मागणी केलेली १४ मुद्दयांवरील माहिती त्यांना पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०१-२००७ रोजीचे प्रथम अपील करुन माहिती अधिका-याने दिलेली माहिती खोटी, दिशाभूल करणारी व अपूर्ण दिल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देवून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी बरोबर माहिती दिल्याचे कळविले आहे. या पत्रामध्ये परिच्छेदनिहाय घडामोडी दिल्या आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या एकूण १४ मुद्दयांवरील माहितीपैकी अपिलार्थीस ५ मुद्दयांवरील माहिती (मुद्दा क्रमांक १, ७, ८, १३ व १४) पूर्णतः व मुद्दा क्रमांक ४ मधील अंशतः माहिती देय ठरते. उर्वरित आठही मुद्दयांवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा खुलासा अथवा एखाद्या विशिष्ट निर्णयाबाबतची कारणे विचारली आहेत, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय नाहीत. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या निर्णयाबाबत कारणे विचारणे त्यांचा खुलासा अथवा स्पष्टीकरण अपेक्षित असलेली माहिती विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आपल्या निर्णयाबद्दल कारणे, खुलासा व स्पष्टीकरण देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया अभिप्रेत नाहीत. त्यामुळे मूळात अपिलार्थीस एकूण ५ मुद्दयांवर पूर्णतः व एका मुद्यावर अंशतः माहिती देय ठरते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीवरुन ही माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांना अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणा-या माहितीचा मुद्दा उपस्थित केला होता तोच मुद्दा अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास पाठविलेल्या एका वेगळ्या पत्राव्दारे (अपिलार्थीचे पत्र दिनांक ११-११-२००८) उपस्थित केला आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी कशी आहे याचे कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी यामध्ये केलेले नाही. आज सुनावणीस देखील अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये अपील करण्याची कारणे या मुद्दयासमोर चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने श्री. सुधाकर माळाळे यांच्या बडतर्फीसंदर्भात त्यांनी वरिष्ठ कार्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या फोटो प्रती मागितल्या होत्या. परंतु त्यांना एकच निलंबन आदेश पृष्ठाची प्रत मिळाली आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे तर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस एकूण १३ पृष्ठांची माहिती दिली असल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या मुद्दयाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज उपस्थित नाहीत. या सर्व विसंगतीपूर्ण पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ ॲड बडेकर ज्योती दिनकर, क्रांती चौक, सोसायटी, भिमनगर, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, तुळजापूर रोड, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, तुळजापूर रोड, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७५३

निर्णय दिनांक ११-११-२००८

१ श्री. श्रीपाद जनार्दनराव कुलकर्णी, अपिलार्थी

नगरपरिषद शाळा क्रमांक ११ समोर, दत्तमंदीरजवळ, समता कॉलनी,

उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१, वैराग, तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१,

सोलापूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. व्यंकट जयवंतराव जाधव, जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१, वैराग, तालुका बार्शी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. प्रकाश विश्वासराव ठाकरे, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, सोलापूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुभाष बाबु पाटेकर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१, वैराग, तालुका बार्शी हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. श्रीपाद जनार्दनराव कुलकर्णी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २९-०१-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या निर्णयाविरुध्द व या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती त्यांना अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्याच्या कारणाने केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १७-०८-२००६ रोजीच्या अर्जामध्ये त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत ०१ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २००६ या कालावधीतील माहिती एकूण ४ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी प्रथम अर्जाव्दारे उपस्थित केलेल्या मुद्दयासंदर्भात खुलासा केल्याचे / माहिती दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-१०-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २०-१०-२००६ रोजी पारीत केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. अपिलार्थीचे अपील फेटाळून लावतांना त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर परिपूर्ण असल्याचे कारण नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी अपिलार्थी हे सुनावणीस गैरहजर आहेत त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती कशा प्रकारे चुकीची , दिशाभूल करणारी व अर्धवट आहे हे सिध्द होऊ शकत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या त्यांच्या दिनांक १७-०८-२००६ रोजीच्या अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४ मुद्दयावर माहिती मागितली असून यापैकी मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना देय होत नाही, कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षिले आहेत, जे माहिती अधिकार अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येशी सुसंगत नाहीत. उर्वरित ३ मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते, त्याचप्रमाणे ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २३-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली गेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या आदेशामध्ये, अपिलार्थीने उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांचा सविस्तर ऊहापोह केल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने ज्या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे त्या सर्व मुद्दयांवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्रमाणित करुन दिल्याचे आज आयोगासमोर सांगितले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पूर्ण माहिती मिळाली असल्याने व जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती दिशाभूल करणारी असल्याबाबत अपिलार्थीने आयोगासमोर कोणताही पुरावा सादर केला नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती कोणत्याही प्रकारे चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे आयोगास वाटत नाही, मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीबाबत काही शंका असल्यास याबाबत ते आयुक्त, जमाबंदी, पुणे यांच्याकडे तक्रार करु शकतात व आपल्या शंकेचे निरसन करु शकतात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. श्रीपाद जनार्दनराव कुलकर्णी, नगरपरिषद शाळा क्रमांक ११ समोर, दत्तमंदीर जवळ, समता कॉलनी, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१, वैराग, तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७५४

निर्णय दिनांक ११-११-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गजानन बी. पाटील,<br>एल-७५/३, छत्रपती शिवाजीनगर, हडको, एन-९, स्वामी समर्थ मदिराजवळ,<br>औरंगाबाद | | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन,<br>गडकरी चौक, नाशिक विभाग, नाशिक | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर आयुक्त तथा विशेष निबंधक, सहकारी संस्था, मध्यवर्ती इमारत,<br>पुणे | | प्रतिवादी |
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | विभागीय उप निबंधक सहकारी संस्था, नाशिक |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अपर निबंधक, सहकारी संस्था (आस्थापना) महाराष्ट्र राज्य, पुणे |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन बी. पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुनिल उध्दव बनसोडे, जन माहिती अधिकारी तथा विभागीय उप निबंधक सहकारी संस्था, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. चंद्रशेखर मधुकर साळवी, अपर निबंधक, सहकारी संस्था (आस्थापना) महाराष्ट्र राज्य, पुणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २९-०५-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर सुनावणी न घेतल्याने हे अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असे म्हटले आहे की, अधिनियमातील कलम ७ (१) चा विहित कालावधी संपल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी मागील दिनांक टाकून त्यांना उशीरा पत्र दिले, माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले. यास्तव या अर्जामध्ये त्यांनी अंतिमतः, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्यास जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याचे व विहित मुदतीत माहिती न देऊन माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व (२) नुसार शास्तीची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत सन १९९१ ते २००६ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयामध्ये विविध पदावर नियुक्ती केल्या गेलेल्या कर्मचा-यांच्या विषयी काही माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने एकूण ४

मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात घेऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देणे शक्य नसल्याचे नमूद करुन सदर माहिती तयार झाल्यानंतर अपिलार्थीस देण्याचे याच पत्रामध्ये त्यांनी निर्देशीत केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली अथवा अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. सुमारे एक वर्ष दहा महिन्याहून अधिक कालावधी व्यपगत होऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही व कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार न केल्याने अधिनियमातील कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई व्हावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती १५ वर्षाच्या कालावधीशी संबंधीत असल्याने सदर माहिती गोळा करण्यास त्यांना वेळ लागला. ही माहिती त्यांच्याकडे एप्रिल २००७ मध्ये तयार होती व त्यांनी दिनांक १७-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रुपये ३८ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयामध्ये भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, हे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. जन अपिलीय अधिकारी यांना त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी का घेतली नाही हे विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी सूचना दिली होती. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांच्या कार्यालयाकडील संबंधीत जावक नोंदवहीची सत्यप्रत आयोगास सादर केली आहे. त्यावरुन त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत आहे.

आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती तयार आहे. अपिलार्थीस ही माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ अन्वये विहीत केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी प्रथम प्रतिसाद दिनांक १८-०१-२००७ रोजी, ३० दिवसाच्या आत दिला असला तरी हा प्रतिसाद निश्चितपणे सकारात्मक नाही. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करण्यासाठी कालावधी लागणारा असून माहिती तयार होताच ती अपिलार्थीस पुरविण्यात येईल असे म्हटले आहे. या पत्रातील मजकूर मोघम स्वरुपाचा असून या पत्रावरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याची इच्छा आहे किंवा नाही याचा कोणताही बोध होत नाही. वस्तुतः माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकदा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) प्रमाणे प्रथमतः अपिलार्थीस ही माहिती देता येईल किंवा कसे याचा निर्णय घेऊन त्यानंतर अर्जदाराने मागितलेली माहिती अंदाजे किती पृष्ठांची आहे, ही माहिती पुरविण्यासाठीचा प्रतिपृष्ठ किती दर आहे आणि यानंतर शुल्काचा भरणा अपिलार्थीने कशा प्रकारे करावा याचे मार्गदर्शन अपिलार्थीस करणे आवश्यक आहे. तथापि या ठिकाणी अशा प्रकारची कोणतीही कृती जन माहिती अधिकारी यांनी केली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक १७-०४-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. अधिनियमातील विहित कालावधी कलम ७

(१) प्रमाणे आता व्यपगत झाला असल्याने अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य पुरविणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये व आज आयोगासमोर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून एक वर्ष दहा महिने इतका कालावधी ओलांडून गेल्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याचा युक्तिवाद केला आहे. यासंदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये अंदाजे ३ महिने इतका विलंब लावलेला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व तिची व्याप्ती व ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी केलेले प्रयत्न पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. मात्र त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जांवर अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक कारवाई करावी अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद                                        ( वि. बा. बोरगे )
दिनांक    ११-११-२००८                           राज्य माहिती आयुक्त
                                                खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन बी. पाटील, एल-७५/३, छत्रपती शिवाजीनगर, हडको, एन-९, स्वामी समर्थ मंदराजवळ, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय उप निबंधक सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन, गडकरी चौक, नाशिक - ०२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था (आस्थापना) , सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८०७

निर्णय दिनांक ११-११-२००८

१ श्री. सोनवणे संजय महादेवराव, राजे संभाजीनगर (प), तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद — प्रतिवादी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. एस. सी. येवलाकर, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुनिल विठ्ठलराव यादव, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सोनवणे संजय महादेवराव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०१-०९-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय प्राप्त झाला नाही, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये तुळजापूर येथील सर्व्हे नंबर २१५ मधील वृक्ष लावगडीसंदर्भात प्रकल्पाच्या कालावधीपासून ते दिनांक १४-०३-२००७ पर्यंतच्या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, सर्व्हे नंबर २१५मधून येडाई तुकाई प्रकल्पासाठी वन विभागास देण्यात आलेले क्षेत्र, सदर क्षेत्र सलग आहे की तुकड्यामध्ये आहे, तुकड्यात असल्यास त्याची चतु:सीमा व क्षेत्र व जमिनीत तुकडेनिहाय किती झाडे लावण्यात आली आहेत त्यांची संख्या या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस एकूण ३ मुद्दयांवर माहिती दिली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील "तुकड्यांचे क्षेत्र" या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीअन्वये दिनांक २३-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०५-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि यासंदर्भात कोणताही निर्णय संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, येडाई तुकाई हा प्रकल्प वन विभागामार्फत राबविला जातो. सर्व्हे नंबर २१५ तुळजापूर ही सरकारी जमीन म्हणून त्याची दप्तरी नोंद आहे. या सर्व्हे नंबरच्या ७/१२ च्या उता-यामध्ये वन विभागाच्या विचाराधीन प्रकल्पाकरिता कोणतीही जमीन दिल्याची नोंद नाही. तसेच अपिलार्थीने या जमिनीत तुकडेनिहाय किती झाडे लावण्यात आली अशी माहिती विचारली आहे तथापि ती माहिती त्यांच्याकडे नाही.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या ४ मुद्दयासंदर्भात माहिती मागविली होती, त्यापैकी एक मुद्दा वन विभागाशी संबंधीत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम माहितीसाठीचा अर्ज, अधिनियमातील कलम ६ (३) (१) सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत संबंधीत वन विभागाकडे पाठवावयास हवा होता, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केलेली नाही. त्याचा परिणाम अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळण्यास झाला. अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि त्यांनी देखील अपिलाची सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय पारीत केला नाही. थोडक्यात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली सार्वजनिक माहिती मिळण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणांशिवाय वंचित राहिल्याचे येथे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसामध्ये विनामूल्य पुरवावी व मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस याच १५ दिवसाच्या कालावधीमध्ये त्यांना विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी असे आढळून येते की, सर्व्हे नंबर २१५ ही सरकारी जमीन असून ती महसूल विभागाच्या ताब्यात आहे. महसूल विभागाच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर वन विभाग त्यांना जमिनीचे हस्तांतर झाले नसतांना देखील मोठमोठे प्रकल्प राबवित आहेत. सबब अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या येडाई तुकाई प्रकल्पासाठी वन विभागाने ज्या क्षेत्रामध्ये आपला प्रकल्प राबविला आहे, त्या क्षेत्राची मोजणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी तात्काळ करुन घेऊन सर्व्हे नंबर २१५ चा ७/१२ उतारा योग्यरित्या दुरुस्त करावा. असे त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (४) च्या तरतुदीनुसार सूचित करण्यात येत आहे. सदर कारवाई जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी हे आदेश निर्गमीत होताच जास्तीत जास्त ३० दिवसाच्या आत पूर्ण करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी सर्व्हे नंबर २१५ च्या ७/१२ च्या उता-यावर वन विभागाने ज्या क्षेत्रामध्ये काम केले आहे त्या क्षेत्राची यथायोग्य नोंद हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत घ्यावी.

औरंगाबाद
दिनांक ११-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सोनवणे संजय महादेवराव, राजे संभाजीनगर (९), तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८०८

निर्णय दिनांक ११-११-२००८

१ श्री. सतीश विठ्ठलराव सरडे, अपिलार्थी
जनावराच्या दवाखान्या शेजारी, हडको, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मुकबधीर विद्यालय, हंगरगा (तुळ) सूतगिरणीजवळ,
तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, रावसाहेब जगताप कर्णबधीर विद्यालय, हंगरगा (तुळ) तुळजापूर,
तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. धनाजी ज्ञानदेव पेठे, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, चिल्ड्रेन ॲण्ड वुमेन वेल्फेअर असो. ऑफ इंडिया तुळजापूर संचलित रावसाहेब जगताप कर्णबधीर विद्यालय, हंगरगा (तुळ) तुळजापूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सतीश विठ्ठलराव सरडे व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मुकबधीर विद्यालय, हंगरगा (तुळ) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २६-०९-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली, माहिती घेण्याचे प्रयोजन या कायद्यात नसतांना ते विचारले, चुकीचा पत्रव्यवहार केला, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिका-यांचे पत्ते देण्यात आले नाहीत, त्यांचा अपील अर्ज स्वीकारला नाही व नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागविली असता प्रत्यक्ष येऊन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ च्या तरतुदीनुसार त्यांच्या दिनांक २७-०७-२००७ च्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या हंगरगा येथील मुकबधीर विद्यालयासंदर्भात सन १९९० ते २००७ या १७ वर्षांची वेगवेगळ्या मुद्दयावर माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये कर्मचा-यांना आवश्यक असणारे प्रशिक्षण पूर्ण केलेली यादी व अपूर्ण यादी, एकूण कर्मचा-यांची संख्या, ते कधीपासून कार्यरत आहेत, त्यांच्या नियुक्तीच्या संचिकेची प्रत, कर्मचारी नियुक्तीसंदर्भात वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिराती, एकूण मुकबधीर व कर्णबधीर विद्यार्थी किती, त्यांची नांवे, एकूण विद्यार्थी संख्या त्यांची नावागावासहीत द्यावी, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्या कार्यालयाकडून गेल्या ३ वर्षामध्ये या शाळेची तपासणी केलेल्या तपासणी अहवालाच्या प्रती व कर्णबधीर विद्यार्थी किती आहेत व त्यांना आवश्यक असणारी यंत्रसामुग्री किती व कोणत्या वर्षी वाटप करण्यात आली, या मुद्दयांचा समावेश आहे. अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५० इतके स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे भरण्यास सूचित केले. या पत्रात अपिलार्थीस कोणत्या लेखाशीर्षाखाली या रकमेचा भरणा करावयाचा आहे याचे मार्गदर्शन केले असून या पत्राबरोबरच अपिलार्थीस माहिती देण्यापोटीच्या लागणा-या खर्चाचा तपशील त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते.

उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क नियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कळवूनही अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना माहिती पुरविण्यात आली नाही, तसेच अपिलार्थीने दिनांक २१-०८-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर निर्णय न घेण्याची कारणे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना विचारली असता त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये योग्य तो प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५० इतक्या रकमेचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मध्ये भरण्यास योग्यरित्या सूचविले आहे, मात्र सदर शुल्काचा भरणा केल्याचा कोणताही पुरावा अपिलार्थीने आज रोजी आयोगासमोर उपलब्ध करुन दिला नाही. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने शुल्काचा भरणा केलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून त्यांनी ती आज रोजी आयोगास दाखविली.

या घटनाक्रमाच्या पार्श्वभूमीवर असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यास, ते स्वतः जबाबदार आहेत, त्यांनी अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरल्याचा कोणताही पुरावा सादर केला नाही, तर जन अपिलीय अधिकारी यांना त्यांचे दिनांक २१-०८-२००७ रोजीचे अपील प्राप्त झाले नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत व अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे, हे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सतीश विठ्ठलराव सरडे, जनावराच्या दवाखान्या शेजारी, हाडको, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मुकबधीर विद्यालय, हंगरगा (तुळ) सूतगिरणीजवळ, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, रावसाहेब जगताप कर्णबधीर विद्यालय, हंगरगा (तुळ) तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८०९

निर्णय दिनांक  ११-११-२००८

१ श्री. प्रशांत शिवाजीराव इंगळे, अपिलार्थी

मु. पो. शुक्रवारपेठ, तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, तुळजापूर,

तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रशांत शिवाजीराव इंगळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. नंदेप्पा लक्ष्मण कोरे, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, तुळजापूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. ज्ञानेश्वर नामदेव पदमाळे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २६-०९-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी विहित मुदतीत न घेता व यासंदर्भातील कोणतेही आदेश पारीत करण्यात आले नाहीत, त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या माहिती अर्जाची अद्यापपर्यंत कोणतीही दखल न घेता माहिती देण्यात आली नाही व प्रथम अपिलीय अधिका-याने व्दितीय अपील कोणाकडे करावे हे त्यांना कळविले नाही. अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जामध्ये शेवटी संबंधितावर माहिती अधिकार अधिनियमाप्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे, व या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००४ ते २००७ या कालावधीतील कुन्सावळी, इटकळ, नंदगाव, सराटी व गुळहळी या पाझर तलावांच्या दुरुस्तीसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये ०१ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००७ या कालावधीत त्यांच्या कार्यालयामार्फत पाझर तलावाच्या दुरुस्तीचे एकूण किती टेंडर झाले, गुत्तेदाराचे नांव, पाझर तलावाची दुरुस्ती कोणकोणत्या शासकीय अधिका-याकडे सोपविली त्यांची नांवे, उपविभागातील शासकीय अधिकारी यांची यादी, उपविभागातील कर्मचारी कोण आहेत व किती दिवसापासून कामावर आहेत, उपविभागातील टॅंकर व रोलर लिलाव काढले काय, काढले असल्यास लिलावाची तारीख, लिलाव कोणी घेतला, लिलावाची सत्यप्रत, अतिरिक्त कर्मचा-यांची यादी व यासंदर्भात त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, उपविभागाअंतर्गत को. प. बंधारे किती इ

ााले आहेत व या बंधा-यावर किती गेट आहेत त्याची सत्यप्रत, या उपविभागातील अधिका-यांचे स्थानिक मुख्यालयाचे पत्ते या मुद्दयावरील माहितीचा समावेश आहे. सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६७५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्यास सूचित केले. सदर पत्राचा क्रमांक १५८/अ असा आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर पत्र त्यांना दिनांक १९-०५-२००७ रोजी पोस्टाने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर प्राप्त झाले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक ०४-०५-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०६-२००७ रोजी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २६-०६-२००७ रोजी पारीत करुन त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. या आदेशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. सदर आदेश अपिलार्थीस दिनांक २७-०६-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगास अवगत केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीमध्ये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये ६७५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती देण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर कळविला नाही, जे अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे कळविणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील या तरतुदीचा भंग केल्याने त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०४-२००७ रोजी पाठविलेले पत्र अवैध ठरत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०६-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास आदेशित करुनही आजपर्यंत अपिलार्थीस माहिती का पुरविली नाही याचे कारण तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. जे. बी. काकडे, ल. पा. (स्थानिक स्तर), उस्मानाबाद यांना विचारले असता त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली असून त्यावर अपिलार्थीस "जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी" असा त्यामध्ये उल्लेख केला असल्याचे आयोगास सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात हजर राहण्याचे सूचित करुन देखील अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर न झाल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही, असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे स्पष्ट केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयाच्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०६-२००७ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत अपिलार्थीस दिनांक २७-०६-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. सदर प्रत प्राप्त झाल्याबद्दल अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पोच सही दिलेली आहे. अपिलार्थीस देण्यात आलेल्या प्रतिबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी "कृपया उपरोक्त उपविभाग तुळजापूर यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन द्यावी ही विनंती" असे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील आदेशामध्ये कोठेही अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती घेऊन जावी असे सूचित केलेले नाही. मूळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागितली असतांना अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ती माहिती घेऊन जावी ही अपेक्षा जन माहिती अधिकारी यांनी करणे हे सर्वथा चुकीचे व गैर आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी सर्व माहिती तयार असल्याचे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेले दिनांक २५-०४-२००७ रोजीचे पत्र वरील परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे अवैध ठरत आहे. या पत्रावर त्यांनी जावक क्रमांक "१५८/अ" असा टाकलेला आहे. जावक रजिस्टरच्या नोंदवहीच्या प्रतीचे अवलोकन केले असता जावक क्रमांक १५८ व १५९ या मधील जागेमध्ये संबंधीत लिपिकाने १५८-अ या क्रमांकाने अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे दाखविले आहे. सदर माहिती अपिलार्थीस साध्या पोस्टाव्दारे दिनांक १५-०५-२००७ रोजी प्राप्त झाली. पाकिटावरील शिक्का अवाचनीय आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक २५-०४-२००७ रोजीच्या कथित पत्राबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केला असल्याने हे पत्र अवैध ठरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठीची विहित मुदत आता टळून गेली असल्याने जन माहिती अधिकारी यांना

अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये संबंधितांवर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुन देखील त्यांच्या आदेशाचा वेगळा अर्थ काढून संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावला आहे, हे या प्रकरणी सिध्द होत आहे. उपरोक्त प्रकरणी त्यांनी आपल्या या कृतीव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधी आपल्या मनातील अनादर व आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. सबब अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर विभाग, पुणे यांच्याकडे शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर विभाग, पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रशांत शिवाजीराव इंगळे, मु. पो. शुक्रवारपेठ, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उप विभाग, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, पुणे, बंगला क्रमांक १३, येरवडा, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७३७

निर्णय दिनांक १२-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ सौ. चंद्रभागा गंगाधर दहिवाळ,<br>रा.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, सेनगाव,<br>जि.हिंगोली. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, हिंगोली,<br>जि.हिंगोली. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १२.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. माधव नागोजी बोथीकर,अ.का. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सेनगाव जि.हिंगोली यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुभाष शिंदे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली जि.हिंगोली (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी सौ. चंद्रभागा गंगाधर दहिवाळ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०६.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने दि. ९.१.२००७ रोजीच्या एकाच अर्जावर दि. ७.४.२००७ व ५.६.२००७ रोजीच्या वेगवेगळया अर्जांद्वारे राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले सादर केली आहेत. यापैकी दि. ७.४.२००७ रोजीच्या द्वितीय अपील अर्जावर राज्य माहिती आयोगाने दि. १३.३.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय दिलेला आहे.

अपिलार्थीचे आजचे विचाराधीन अपील ज्या मूळ अर्जावर आधारित आहे, तो मूळ अर्ज व आयोगाने दि. १३.३.२००८ रोजी सुनावणी घेऊन आदेश दिलेल्या प्रकरणातील मूळ अर्ज हा एकच असल्याने आजच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने सुनावणी घेण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

अपिलार्थीचे विचाराधीन अपिलावर आयोगाने यापूर्वीच निर्णय घेतला असल्याने अपिलार्थीचे आजचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

३) अपील क्रमांक १७३७/२००७ , दि. ५.६.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. चंद्रभागा गंगाधर दहिवाळ,ऑडीटनगर, हनुमान मंदिराजवळ,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सेनगाव जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, हिंगोली, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७४०

निर्णय दिनांक १२-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भालचंद्र माधवराव बंडे,<br>रा.मुखेड, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत, जांब (बु. व खू.),<br>ता.मुखेड जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, मुखेड<br>जि.नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १२.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. विठ्ठल भागाराम कांबळे, (तत्कालीन) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,जांब (बू. व खू.) ता.मुखेड जि.नांदेड , श्री. केशव आनंदराव पवळे, (सध्या कार्यरत) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,जांब (बू. व खू.) ता.मुखेड जि.नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. गंगाधर लक्ष्मणराव रामोड, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जि.नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर

आहेत, तर अपिलार्थी श्री. भालचंद्र माधवराव बंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २१.३.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या विनंती अर्जास जन माहिती अधिकारी यांचेकडून, गट विकास अधिकारी व विभागीय आयुक्त यांनी आदेशित करुनही, त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, म्हणून त्यांनी सदरचे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवून, संबंधितांवर कायदेशीर, दंडात्मक कार्यवाही करण्याची, विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्याकडील दि. १६.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३ ते २००६ या कालावधीशी संबंधित, विविध योजनांतर्गत प्राप्त निधी, तो ज्या धनादेशाद्वारे प्राप्त झाला असेल त्याची माहिती, ग्रामपंचायतीच्या कॅशबुक व पासबुकच्या झ ेरॉक्स प्रती ही माहिती एका विशिष्ट नमुन्यात मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती साक्षांकित स्वरुपात व रजिस्टर्ड टपालाद्वारे अपेक्षित केली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे उपलब्ध

कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, तथापि त्यांनी ग्राम विकास अधिकारी यांना त्यांच्याकडील दि. २२.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना तीन दिवसांचे आत देण्याचे आदेशित केले. या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही प्रकारे अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने सकारात्मक कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या मते, अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १०.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस देण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती व अपिलार्थीस दिलेली कथित माहिती यामध्ये प्रचंड तफावत असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेली कथित माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपेक्षा पूर्णतः भिन्न अशी आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी  हे, त्यांना पूरेशी संधी देऊनही अपिलार्थीस त्यांनी माहिती पुरविल्यासंदर्भात कोणताही पुरावा आयोगासमोर सादर करुन शकले नाहीत, तसेच आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली कोणतीही माहिती दिली नसल्याचे सिध्द होत आहे.

अपिलार्थीच्या दि. १६.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जास कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे.

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या आपल्या या कृतिद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निश्चितपणे पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत आता व्यपगत झाल्याने, अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांना त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच [illegible] दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३)मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड यांना, या प्रकरणातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी या प्रकरणातील दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस

करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांकः १२.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भालचंद्र माधवराव बंडे,व्हाईट हाऊस टेलर्स, मेनरोड मुखेड, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जांब (बू. व खू.) ता.मुखेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७४१

निर्णय दिनांक १२-११-२००८

१ श्री. भालचंद्र माधवराव बंडे, : अपिलार्थी
रा.मुखेड, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मुखेड
जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १२.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. गंगाधर लक्ष्मणराव रामोड, जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जि.नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. बालाजी इराप्पा ताटीपामडे,कक्ष अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. भालचंद्र माधवराव बंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २१.३.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतली नाही . त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जाची कोणतीही दखल घेतली नाही, त्यामुळे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना मिळावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर कायदेशीर, दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश द्यावेत.

उपरोक्त प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना एकूण दोन टप्प्यात जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आली होती. अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.११.२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. व्ही. बी. कांबळे ग्राम विकास अधिकारी यांच्या कारकीर्दीत झालेल्या कामासंदर्भात, सन २००३-२००६ या कालावधीशी संबंधित माहिती एका विशिष्ट तक्त्यामध्ये मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. व्ही.बी.कांबळे, यांच्या कार्यभाराबाबत व दलीतवस्ती योजनेंतर्गत वेगवेगळया गावी त्यांनी घेतलेल्या कामाबाबतची माहिती व ग्रामपंचायतीच्या कॅशबुक व पासबुकच्या झेरॉक्स प्रतींच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून आले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १५.११.२००६ रोजीच्या अर्जास त्यांच्याकडील दि. ११.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना मागणी केलेली माहिती ग्राम पंचायत स्तरावर असल्याने ही माहिती ग्राम विकास अधिकारी यांना अपिलार्थीस

परस्पर देण्याचे सूचित केल्याचे, अपिलार्थीस कळविले. या पत्राची एक प्रत त्यांनी संबंधित ग्राम विकास अधिकारी यांना दिल्याचे दिसून येते. गट विकास अधिकारी यांच्या पत्रास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती पुरविली. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. २६.१२.२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.३.२००७ रोजी घेतलेल्या सुनावणीच्या वेळी, त्यांच्या समक्ष अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली व तसा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात करुन अपिलार्थीचे प्रकरण त्यांचे स्तरावर नस्तीबध्द केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर सुनावणी दि. २६.३.२००७ रोजी घेऊन अपिलार्थीस त्यांना अपेक्षित संपूर्ण माहिती देण्याची व्यवस्था केल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे यापूर्वीच दि. २१.३.२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली पूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने व अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोचसही दिली असल्याने तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर समक्ष अथवा त्यांच्या प्रतिनिधीमार्फत देखील उपस्थित नसल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे, असे आयोगास आढळून आले नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्जासंदर्भात अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये जो प्रतिसाद देणे अपेक्षित होते, तो, त्यांनी अपिलार्थीस न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे,

असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

२)जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भालचंद्र माधवराव बंडे,व्हाईट हाऊस टेलर्स, मेनरोड मुखेड, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७४२

निर्णय दिनांक १२-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भालचंद्र माधवराव बंडे,<br>रा.मुखेड, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत, बेटमोगरा,<br>ता.मुखेड जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, मुखेड<br>जि.नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १२.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. विठ्ठल भागाराम कांबळे, (तत्कालीन) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, बेटमोगरा ता.मुखेड जि.नांदेड , श्री. धर्मेकर धनाजी पिराजी, (सध्या कार्यरत) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बेटमोगरा ता.मुखेड जि.नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. गंगाधर लक्ष्मणराव रामोड, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, जि.नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर

आहेत, तर अपिलार्थी श्री. भालचंद्र माधवराव बंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २१.३.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बेटमोगरा, ता.मुखेड यांना विभागीय आयुक्त,औरंगाबाद व गट विकास अधिकारी, पं.स.मुखेड यांनी आदेशित करुनही, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून, त्यांना प्राप्त झाली नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही. या अपील अर्जामध्ये पुढे त्यांनी विनामूल्य माहितीची मागणी करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - विविध योजनांतर्गत प्राप्त झालेले धनादेश/निधीची माहिती, कॅशबुक व पासबुकच्या झेराक्स प्रती -अशी सन २००३ ते २००६ या कालावधीशी संबंधित माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये असे म्हटले आहे की, ग्रामसेवक हे मुख्यालयास सातत्याने गैरहजर असल्याने त्यांना हा अर्ज परत आला असून डाक विभागाची तशी नोंद या पत्रावर आहे. यानंतर अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १३.१२.२००६ रोजी प्रथम अपील करुन या अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची विनंती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केली. या अपील अर्जामध्ये देखील अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जाद्वारे केलेली माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. मात्र त्यांनी या प्रकरणी त्यांच्याकडील दि. १८.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांनी मागितलेली माहिती त्वरित देण्याचे संबंधित ग्रामसेवकाला आदेशित केले आहे, असे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांचे दि. १८.१२.२००६ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही, त्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही. या विधानापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगास तसे शपथपत्र सादर केले आहे. आता आयोगाच्या नोटीशीसोबत अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपिलाची प्रत त्यांना प्राप्त झ ााली असल्याने ते अपिलार्थीस आता तीस दिवसांचे आत विनामूल्य माहिती देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांचे दि. १८.१२.२००६ रोजीचे पत्र त्यांना मिळाले नसल्याचे जरी शपथपत्रात नमूद केले असले तरी, सदर बाब आयोगास संशयास्पद वाटते. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज व गट विकास अधिकारी, पं.स.मुखेड यांचे दि. १८.१२.२००६ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाले होते किंवा कसे याची स्वतः शहानिशा करावी व संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. याबाबतचा चौकशी अहवाल त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत सादर करावा.

जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता व जन माहिती अधिकारी यांनी दिलेली

माहिती पाहता, अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड जि.नांदेड यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांची निर्णयामधील मुद्यांसंदर्भात चौकशी करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भालचंद्र माधवराव बंडे,व्हाईट हाऊस टेलर्स, मेनरोड मुखेड, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, बेटमोगरा, ता.मुखेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले क्रमांक १७५५/२००७, १७५९/२००७ व १७६०/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७५५,१७५९ व १७६०

निर्णय दिनांक १२-११-२००८

१ श्री. सय्यद आसीफअली नुरअली, : अपिलार्थी
रा. गंगापूर जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः

१) अपील क्र. १७५५/२००७ जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

२) अपील क्र. १७५९/२००७ मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

३) अपील क्र. १७६०/२००७ शिक्षणाधिकारी (प्रा),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील तीन प्रकरणाची एकत्रित सुनावणी आज दि. १२.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी डॉ. रमेश मोरे,जन माहिती अधिकारी तथा जिल्हा

पशुसंवर्धन अधिकारी,जि.प.औरंगाबाद, श्री. आर.डी.मडके, जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.औरंगाबाद, श्री.हिवाळे एस.डी. कक्ष अधिकारी, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा) जि.प.औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अरुण ल.डुबे, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. सय्यद आसीफअली नुरअली (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून दिलेले त्यांचे दि. ५.११.२००८ रोजीचे शपथपत्र आयोगाचे कार्यालयात (दि.६.११.२००८ रोजी) दाखल केले असून, या शपथपत्रामध्ये अपिलार्थी यांनी त्यांचे अपील क्र. १७५५/२००७, १७५९/२००७ व १७६०/२००७ ही तीनही अपिले, अपिलार्थी यांना जिल्हा परिषदेने पदोन्नती दिल्याने व त्यांना आवश्यक असलेली माहिती बऱ्याच प्रमाणात प्राप्त झाल्याने त्यांची याबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याचे नमूद करुन खारीज करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थी यांनी त्यांची ही अपिले खारीज करण्याची विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीची वरील  तीनही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१)अपील क्रमांक १७५५/२००७, दि. २१.७.२००७ खारीज करण्यात येत आहेत.

२) अपील क्रमांक १७५९/२००७, दि. २१.७.२००७ खारीज करण्यात येत आहेत

३) अपील क्रमांक १७६०/२००७, दि.२१.७.२००७ खारीज करण्यात येत आहेत

**औरंगाबाद**
**दिनांकः १२.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद आसीफअली नुरअली, रा. जिल्हा परिषद, माध्यमिक शाळा, मांजरी ता.गंगापूर जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७५६

निर्णय दिनांक १२-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अमित शशिकांत पटवारी,<br>रा.जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी<br>संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १२.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अमित शशिकांत पटवारी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. ज्ञानोबा भाऊराव गालफाडे, जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सौ.जयश्री शिवाजी माने, सहायक निबंधक, सहकारी संस्था, जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०५.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज

रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांचेकडील दि. २३.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दि. ११.७.२००२ रोजी, जिल्हयातील १७८ सहकारी मजूर संस्थांच्या नोंदीसंदर्भातील केलेल्या तक्रारीच्या चौकशी अहवालाची व त्यावर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जालना यांनी केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत - मागितली होती. सदर माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ६.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या अहवालाची प्रत त्यांच्या कार्यालयात अभिलेख्यावर उपलब्ध नसल्याने, ती अपिलार्थीस देण्यास असमर्थता व्यक्त केली व त्याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांनी केलेल्या कार्यवाही अहवालाच्या प्रतीसंदर्भात, त्यांच्या जालना येथील कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रतिसादाने समाधान न झाल्याने व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.३.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याचदिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वीस दिवसांच्या आत चौकशी अहवालाची प्रत देण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे, अशा

अर्थाचे आदेश दिले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे या संदर्भात द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या अहवालामध्ये सहायक निबंधक, उपनिबंधक व सहनिबंधक यांच्यावर ठपका ठेवण्यात आला असल्याचे त्यांना अनौपचारिकरित्या माहित झाले असून या अहवालाची प्रत संबंधित जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, जालना, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद व संबंधित अधिकाऱ्यांनी हेतुपूर्वक गहाळ केली आहे. त्यांनी मागितलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास पुढे विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेला चौकशी अहवाल हा 'ड' प्रकारच्या अभिलेख्यामध्ये मोडत असून, हे अभिलेखे जतन करण्याचा कालावधी एक वर्षाचा असल्याने हा चौकशी अहवाल त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. २ संदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज दि. ६.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्याचे आयोगास सांगितले व सदर पत्र पाठविल्यानंतर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जालना यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार त्यांनी केला नसल्याचे आयोगास अवगत केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पहाणी करता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्या मते जर अपिलार्थीने मागणी केलेल्या चौकशी अहवालाचे अभिलेखे 'ड' प्रवर्गात मोडत असले तरी, ते अहवाल ज्या अभिलेख्यामध्ये होते, ते अभिलेखे

कधी नष्ट केले, याची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे असणे जरुरीचे आहे, या संबंधीचा कोणताही पुरावा ते आज रोजी आयोगास उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत.सबब त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर अहवाल नष्ट केल्याचा पुरावा अपिलार्थी यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत सादर करावा, सदर पुरावा उपलब्ध नसेल तर सदर अहवाल जतन करण्याची जबाबदारी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याची होती, त्या अधिकारी/कर्मचाऱ्यावर या प्रकरणी यथायोग्य प्रशासकीय अथवा फौजदारी कारवाई करण्याची कार्यवाही करावी.

अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र. २ संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,जालना यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र.२ च्या माहितीशी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीपैकी काही भाग प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हता.त्यामुळे उपरोक्त प्रकरणी त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) अन्वये अपिलार्थीचा विचाराधीन अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठविणे गरजेचे होते. तथापि अशी कृती करण्यासाठी त्यांनी एकूण तेरा दिवसांचा कालावधी घेतल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) चा भंग केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब सहकार आयुक्त, पुणे यांच्याकडे संबंधित जन माहिती

अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती, त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) सहकार आयुक्त, पुणे यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अमित शशिकांत पटवारी, "अक्षता", माणिकनगर, संभाजीनगर, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बी. जे. रोड, पुणे - ४११ ००१यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७५७

निर्णय दिनांक १२-११-२००८

१ श्री. सरदार हरजीतसिंग तिरथसिंग सहानी, रा.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारीः निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १२.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सरदार हरजीतसिंह तिरथसिंह सहानी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), सौ. हे.प्र.वांगीकर, जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्रीमती वर्षा ठाकूर, जन अपिलीय अधिकारी तथा प्र. निवासी उपजिल्हाधिकारी,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २७.६.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आजपर्यंत कोणतेही आदेश प्राप्त झाले नसल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. ९.५.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मा.लोकायुक्त, म.रा.यांच्या दि. ३१.०८.२००६ रोजीच्या पत्रासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या चौकशीची माहिती, व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता, त्यांचा हा अर्ज स्वीकृत करण्यासाठी कोणताही कर्मचारी उपलब्ध असल्याचे न आढळल्यावरुन त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे लागलीच दि. ११.५.२००७ रोजी प्रथम अपील केल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय पारित केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील गुंतागुंत लक्षात घेता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. ११.५.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर, या टप्प्यावर सुनावणी घेणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांच्या दि. ११.५.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. सदर निर्णय अपिलार्थीस मान्य नसतील तर, ते राज्य माहिती आयोगाकडे माहिती

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ११.५.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर, झालेला व होणारा संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच सुनावणी घेऊन, त्यासंबंधीचा आपला निर्णय तीस दिवसांच्या आत पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सरदार हरजीतसिंह तिरथसिंह सहानी, रा.५-१-५५/१, उस्मानपूरा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८४९

निर्णय दिनांक   १२-११-२००८

१ श्री. सुरेश विठ्ठलसिंग महाजन, : अपिलार्थी
रा. कन्नड जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, वर्ग-१,
पंचायत समिती, कन्नड
जि. औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १२.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सुरेश विठ्ठलसिंग महाजन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. बी. बी. गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा प्र. गट विकास अधिकारी, वर्ग-१,पंचायत समिती, कन्नड जि.औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), व श्री. अरुण ल.डुबे, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार दि. ३०.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर घेतलेल्या सुनावणीचे पत्र त्यांना दि. ५.१०.२००७ रोजी प्राप्त झाले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर दि. १.१०.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. या सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांचे पत्र त्यांना सुनावणी प्रस्तावित केलेल्या तारखेनंतर प्राप्त झाल्याने या सुनावणीस त्यांना हजर राहता आले नाही व त्यांचे म्हणणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मांडता आले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर घेतलेला निर्णय त्यांच्या गैरहजेरीत घेतलेला आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना माहिती तर पुरविली नाही, मात्र माहिती देण्याचे जाणूनबुजून टाळले आहे. या अपील अर्जामध्ये शेवटी त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - ग्राम पंचायत, नागद ता.कन्नड यांनी सन २००५-०६ व २००६-०७ या वर्षात शासकीय योजनांतर्गत उदा. १२ व्या वित्त आयोगाच्या निधीसंदर्भात - एकूण ४ मुद्यांवर माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. ११.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १.१०.२००७ रोजी घेऊन त्याच दिवशी म्हणजेच दि. १.१०.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस आठ दिवसांचे आत रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ७.१०.२००७ रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येते. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असता, सदर माहितीचे पाकीट पोस्टमनच्या, "घरी सूचना देऊनही संबंधित भेटत नाहीत.मुदत संपल्यामुळे परत." अशा अभिप्रायासह जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत आले. या संदर्भातील योग्य तो पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे. यावर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर पाकीट घेऊन पोस्टमन त्यांच्याकडे कधीही आला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर ते सतत संबंधित पोस्टमनच्या संपर्कात होते. तथापि सदर माहिती त्यांना प्राप्त झाली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे अनुमान काढण्यास हरकत नसावी. सदर माहितीचे, ती सीलबंद असल्याने, आयोगास अवलोकन करता आली नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमांतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २७.७.२००७ रोजी माहितीसाठीचा प्रथम  अर्ज केला असता या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार हा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांचे आत त्यावर आपला निर्णय अपिलार्थीस कळविणे अपेक्षित होते, तथापि अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ग्राम पंचायत स्तरावर असल्याने व ही माहिती

संबंधित पंचायत समितीच्या ग्रामसेवकाकडे असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविणे, अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार भाग होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कृती त्यांनी केल्याचे आढळून येत नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, संबंधित ग्रामसेवक यांनी अपिलार्थीकडे दि. १७.८.२००७ रोजी आवश्यक ती माहिती त्यांच्या कार्यालयातील लिपीकाकरवी पाठविली असता, ही माहिती अपिलार्थी यांनी स्वीकारली नाही. तथापि त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केला नाही. मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ते आता अपिलार्थीस दि.१४.११.२००८ रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या या वर्तनाबाबत त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जास प्रतिसाद देताना अशाप्रकारचा विलंब टाळावा, अशी त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. १४.११.२००८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत त्यांचे कार्यालयात अपिलार्थीस व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षित केली असल्याने अपिलार्थीस ही माहिती मिळविण्यासाठी जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १४.११.२००८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत व्यक्तिशः उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. १४.११.२००८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश विठ्ठलसिंग महाजन, रा. जवाहर कॉलनी, म्हाडाजवळ, हिवरखेडा रोड, कन्नड जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,वर्ग-१, पंचायत समिती, कन्नड जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८३५

निर्णय दिनांक १४-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर,<br>रा.परळी वैजनाथ जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>संशोधन विभाग,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>संशोधन विभाग,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: उपकुलसचिव (पीएच.डी.विभाग), डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

जन अपिलीय अधिकारी: संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि.१४.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. पर्वत गोवर्धन कासुरे, जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, (पी.एचडी विभाग),डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व डॉ. अे.जी.खान, जन अपिलीय अधिकारी तथा संचालक,(बी.सी.यु.डी.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०७.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपिलामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी दि. ०४.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले, या अपिलाची सुनावणी दि. ७.६.२००७ रोजी घेण्यात आली असता, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. ११.६.२००७ पर्यंत माहिती देण्याचे आदेशित केले, तथापि त्यांना याबाबत द्वितीय अपील करेपर्यंत कोणतीही माहिती देण्यात आली नसून, त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून टाळाटाळ केली जात असल्याने, त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई करावी.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी या गैरहजर आहेत. या प्रकरणात देखील अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या अपील क्र.१८३४/२००७ व १८३७ /२००७ क्रमांकाच्या अपिलांद्वारे ज्या मूळ माहितीची मागणी केली होती, तशाच प्रकारच्या माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.५.२००७ रोजीच्या प्रथम पत्राद्वारे प्रतिसाद देऊन काही माहिती पुरविल्याचे दिसून येते, तथापि त्यापूर्वीच अधिनियमाद्वारे माहिती देण्याची विहित केलेली मुदत पूर्ण झाल्याने अपिलार्थीने दि. ४.५.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ७.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. ११.६.२००७ पर्यंत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले. सदर आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ८.६.२००७ रोजी दिल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. आजरोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यांनी विचाराधीन प्रथम अपील अर्जासंदर्भात दि. ५.५.२००७ रोजी माहिती दिल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगास सांगत आहेत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ५.५.२००७ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण सहा मुद्यांपैकी मुद्दा क्र.१,२,४ व ५  या चार मुद्यांसंदर्भातील माहितीच्या प्रती अपिलार्थीस देण्यात येतील, असे जन माहिती अधिकारी यांनी फक्त आश्वासित केल्याचे दिसून येते, तर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील मुद्दा क्र. ३ द्वारे अपिलार्थीने विद्यापीठ,शासन व यु.जी.सी.च्या नियमांच्या सत्यप्रती मागितल्या असता या माहितीसंदर्भात, "संशोधन आणि मान्यता समिती पी.एचडी.करण्याबाबत मान्यता देते."अशा अर्थाची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येते. थोडक्यात, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण सहा मुद्यांपैकी चार मुद्यांमध्ये माहिती देण्याचे आश्वासन व एका मुद्याच्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची दिशाभूल केल्याचे येथे स्पष्ट होत आहे. अपिलार्थीस

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विचाराधीन अपिलातील प्रथम अर्जासंदर्भात खरोखरीच माहिती दिली आहे किंवा कसे, याबाबत आयोग साशंक आहे.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीच्या प्रथम अर्जाप्रती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेला अनादर व बेपर्वाई ही कुलगुरु,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेल्या बहुतांश अपिलावर सुनावणी घेताना विद्यापीठातील संबंधित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विहित मुदतीत व अचूक माहिती देत नाहीत, असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. याबाबत आयोगातर्फे संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचे प्रशिक्षण वर्ग घेण्याची देखील कुलगुरु यांना शिफारस करण्यात आली होती. तथापि आजही विद्यापीठाच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या मानसिकतेमध्ये कोणताही सकारात्मक बदल घडल्याचे आयोगास आढळून येत नाही. याबाबत या टप्प्यावर कुलगुरु यांनी लक्ष घालण्याची अपेक्षा आयोग व्यक्त करीत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या सहा मुद्यांपैकी चार मुद्यांवर माहिती देण्याचे आश्वासन देऊन व एका मुद्यावर दिशाभूल करणारे उत्तर देऊन जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जो प्रतिसाद दि. २६.४.२००७ रोजी अगर तत्पूर्वी द्यावयास हवा होता, त्याऐवजी त्यांनी अपिलार्थीस एकूण आठ दिवस इतक्या विलंबाने चुकीचा प्रतिसाद दिल्याचे आढळून येते. त्यांनी अपिलार्थीस अशाप्रकारच्या विलंबाने दिलेल्या चुकीच्या प्रतिसादाबद्दल, विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे आठ दिवसांच्या असमर्थनीय विलंबाबद्दल व चुकीच्या प्रतिसादाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे (आठ दिवसांसाठी) एकूण रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार)

इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

लेखाशीर्ष-**“००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार** (००७०-०१६-१) ”

सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी हे नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील, याची कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी खात्री करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, आजही अपिलार्थी, त्यांच्या दि. २०.३.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना देय असूनही ती प्राप्त होण्यापासून वंचित राहिलेले आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ अुठ दिवसांसाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल व चुकीच्या प्रतिसादाबद्दल जन माहिती अधिकारी यांना रुपये २०००/- (अक्षरी रुपये

दोन हजार ) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

4) कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी उपरोक्त आदेश क्र.३ प्रमाणे अनुपालन होईल,असे पहावे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १४.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, द्वारा ब्रुद्रुककर निवास, विद्यानगर,परळी वैजनाथ,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, (पी.एचडी विभाग),डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक,(बी.सी.यु.डी.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८३६

निर्णय दिनांक १४-११-२००८

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, : अपिलार्थी
रा.परळी वैजनाथ जि.बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास
मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: उप कुलसचिव (शैक्षणिक),
महाविद्यालये व विद्यापीठ विकास
मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब
आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १४.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी डॉ. अे.जी.खान, जन अपिलीय अधिकारी तथा संचालक,(बी.सी.यु.डी.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शैक्षणिक), महाविद्यालये व विद्यापीठ विकास

मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.११.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर, एकदाही सुनावणी न घेतल्याने, केल्याचे नमूद केले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २०.५.२००६ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय या त्रयस्थ पक्षासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. २०.७.२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा त्यासंबंधी पत्रव्यवहार केल्याचे या प्रकरणी आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या त्रयस्थ पक्षासंबंधातील माहितीचे स्वरुप व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या टप्प्यावर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २०.७.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झ ालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात

आपले निर्णय पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २०.७.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १४.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, द्वारा ब्रुद्रुककर निवास, विद्यानगर,परळी वैजनाथ,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शैक्षणिक), महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८३८

निर्णय दिनांक १४-११-२००८

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, : अपिलार्थी
रा.परळी वैजनाथ जि.बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
गणित विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
गणित विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि.१४.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी गणित विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) जन अपिलीय अधिकारी गणित विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०७.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या दि. २०.३.२००७ रोजीच्या अर्जास डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील गणित विभागाच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये दि. ४.५.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन, अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी न करता, या कायद्याची पायमल्ली केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील गणित विभागाच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०.३.२००७ रोजी गणित विभागाशी संबंधित एकूण आठ मुद्यावर माहिती मागविली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २०.३.२००७ रोजी प्राप्त झाल्याची पोचसही या अर्जावर आहे. यावरुन सदर अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी, आयोगाच्या कार्यालयातून दि. ६.११.२००८रोजी दूरध्वनीद्वारे श्री. कराळे, सहा.प्रबंधक,डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद यांना कळवूनही, संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सुनावणीस अनुपस्थित आहेत, तर अपिलार्थी यांनी सुनावणीस हजर राहू शकत नाही, अशा अर्थाचे पत्र फॅक्सद्वारे आयोगाचे कार्यालयात पाठविले

आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात काय कारवाई केली, हे कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळणे अशक्य आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम माहितीच्या व अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे अपिलार्थीचे म्हणणे ग्राहय धरण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या दि.२०.३.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन तसेच आज, आयोगाने लेखी व दूरध्वनीद्वारे पूर्वसूचना देऊनही सुनावणीस गैरहजर राहून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणेचा अभाव स्पष्ट केल्याचे सिध्द झाल्याने कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांकः १४.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, द्वारा ब्रुद्रुककर निवास, विद्यानगर,परळी वैजनाथ,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी गणित विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी गणित विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले क्रमांक १८३४/२००७ व १८३७/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८३४ व १८३७

निर्णय दिनांक १४-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर,<br>रा.परळी वैजनाथ जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>परीक्षा विभाग,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>परीक्षा विभाग,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद. | | |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः | सहा.कुलसचिव,<br>राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद. |
| जन अपिलीय अधिकारीः | संचालक,<br>महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद. |

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची सुनावणी आज दि.१४.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. विष्णू मारोती कऱ्हाळे, जन माहिती अधिकारी सहा.कुलसचिव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व श्री.विश्वंभर भगवानराव मोटे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच श्री. अशोक मंगेश चव्हाण, जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री.ए.जी.खान, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद हे हजर आहेत, तर अपिलार्थी सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०७.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील १८३४/२००७ व दि. ०४.०५.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील क्र. १८३७/२००७ ही दोन अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र. १८३४/२००७** :

या अपिल अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या दि. २०.०३.२००७ रोजीच्या प्रथम मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली नाही. त्यामुळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ४.५.२००७ रोजी प्रथम अपील केले, या अपिलाच्या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ६ बाबत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. या आदेशानंतर दि.

७.६.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये मुद्दा क्र. ३ व ५ ची माहिती दिली नाही. परीक्षा विभागास अधिकार नसताना दिलेल्या चुकीच्या प्रमाणपत्राबाबत सत्य लपविण्याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केला व विद्यापीठाने केलेल्या बेकायदेशीर कृतीवर पांघरुन घातले, सबब त्यांच्यावर अधिनियमानुसार दंडीत करुन शिस्तभंगाची कारवाई व्हावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. या विनंतीसह त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २०.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण ७ मुद्यावर काही माहिती मागविली होती. या माहितीमध्ये मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांनी, "सदर अभिप्रायास मा.कुलगुरु यांनी दिलेल्या मान्यतेची सत्यप्रत" व मुद्दा क्र. ५ द्वारे, "विद्यापीठ स्थापनेपासून आजपर्यंत परिक्षा विभागाने एम.एस्सी.गणित हे एम.एस्सी संख्याशास्त्राच्या समकक्ष आहेत व ते संख्याशास्त्र पीएच.डी. साठी मान्य आहे याबाबत किती उमेदवारांना असे समकक्षता प्रमाणपत्र दिले याबाबतच्या सर्व सत्यप्रती" या मुद्यांवर माहिती मागितली होती. ही माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ९.४.२००७ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस," आपले पत्र दि. २०.३.२००७ मधील मुद्दा क्र. १,२ व ३ च्या अनुषंगाने आपणास कार्यालयीन समकक्ष प्रमाणपत्र ४४८०२ दिनांक ३०.०१.२००७ ची सत्यप्रत मा.अधिष्ठाता यांच्याकडून घेतलेल्या अभिप्रायाची सत्यप्रत आणि सदर अभिप्रायास मा. कुलगुरु यांनी दिलेल्या मान्यतेची सत्यप्रत या पत्रासोबत जोडण्यात येत आहे. मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात कळविण्यात येते की, वरिल उल्लेखित समकक्ष प्रमाणपत्र क्र. ४४८०२ दिनांक ३०.१.२००७ रोजी एम.एस्सी.गणित हे एम.एस्सी. संख्याशास्त्र पीएच.डी. साठी मान्य आहे. याशिवाय याबाबत एकही समकक्ष प्रमाणपत्र दिलेले नाही" असे कळविले आहे. जन माहिती

अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ४.५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती मिळण्यापासून वंचित ठेवत असून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची विनंती केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात कोणत्याही प्रकारची सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांच्या अपिलासंदर्भात निर्णय दिलेला नाही. मात्र या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २२.५.२००७ रोजी पत्रान्वये असे कळविले आहे की, "आपल्या अपील अर्जासंबंधी आपण प्रत्यक्ष या कार्यालयात येऊन चर्चा केल्यास सुलभ होईल." जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २०.३.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी त्यांनी त्यांच्याकडील दि. ९.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर त्यांच्या या कार्यवाहीपृष्ठयर्थ सादर केलेल्या पुराव्याचे - जावक नोंदवहीचे निरीक्षण केले असता असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी दि. ९.४.२००७ रोजी पत्र पाठविल्याचे म्हटले असले तरी प्रत्यक्षतः ते पत्र त्यांच्याकडील ८५९-६०/२ या क्रमांकाने ते अपिलार्थीस दि. २१.४.२००७ रोजी स्पीड पोस्टाद्वारे पाठविले गेले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास प्रतिसाद म्हणून द्यावयाचे पत्र दि. ९.४.२००७ रोजी तयार झाले असता, ते दि.२१.४.२००७ पर्यंत अपिलार्थीस न पाठविण्याची जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित सहाय्यक यांची कृती सर्वथा गैर आहे, याची कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा

विद्यापीठ, औरंगाबाद, यांनी नोंद घ्यावी व येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील पत्रव्यवहार करताना संबंधित कर्मचारी/अधिकारी हे दक्ष राहतील, असे पहावे. अपिलार्थीस प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहीत कालावधी व्यपगत झाल्यानंतर प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये विद्यापीठाच्या दि. ७.६.२००७च्या पत्राचा उल्लेख केला आहे, तथापि हे पत्र जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यामध्ये उपलब्ध नाही. त्यांच्याकडे अपिलार्थीच्या या प्रकरणातील प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.५.२००७ रोजी पत्र दिल्यानंतरचा पत्रव्यवहार उपलब्ध आहे. या पत्रावर दि. १.६.२००७ अशी तारीख असून ते पत्र अपिलार्थीस दि. ७.६.२००७ रोजी मिळाले असावे, असे आयोगातर्फे अनुमान काढण्यात येऊन, हेच पत्र आज विचारात घेण्यात येत आहे. या पत्राचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५द्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे आढळून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे जन माहिती अधिकारी यांनी किती उमेदवारांना समकक्षता प्रमाणपत्र दिले, याबाबतच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. आजरोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, त्यांनी अशाप्रकारचे प्रमाणपत्र एकाच उमेदवाराला दिले असून, कु.व्ही.व्ही.देशपांडे नावाच्या उमेदवारास ते दिल्याचे सांगितले. तथापि कु. देशपांडे यांना समकक्षता प्रमाणपत्र दिल्याची सत्यप्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांत कोठेही आढळून येत नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ९.४.२००७ (दि.२१.४.२००७ रोजी पाठविलेले) रोजीच्या पत्राद्वारे दिलेली आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जामध्ये, परीक्षा विभागाने, त्यांना अधिकार नसताना दिलेले चुकीचे प्रमाणपत्राबाबत असा उल्लेख केला आहे, याबाबत अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या परीक्षा विभागाला समकक्षता प्रमाणपत्र देण्याचे अधिकार आहेत किंवा नाहीत, असल्यास ते कोणत्या मर्यादेपर्यंत आहेत, हे ठरविण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगाला नसल्याने अपिलार्थीच्या या अभिप्रायाबाबत राज्य माहिती आयोग कोणतेही भाष्य करु इच्छित नाही. वरील विषयी प्रथमतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित मुदतीत प्रतिसाद दिला नसून अपिलार्थीस त्यांनी अर्धवट माहिती पुरविली आहे, अर्थात ही माहिती पुरवताना त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे अथवा नाकारल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जावर समर्पक माहिती देण्याची दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी सदर माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरवतील याची दक्षता जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांनी घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

**अपील क्र. १८३७/२००७:**

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यांनी या प्रकरणी केलेल्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय

अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अथवा कोणताही निर्णय दिला नसल्याचे नमूद करुन आपल्या दि. २२.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीपासून वंचित ठेवले असल्याने त्यांनी अधिनियमानुसार जास्तीत जास्त दंड आकारुन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी त्यांनी आयोगास आपल्या या अपिल अर्जामध्ये अखेरीस विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दि. २२.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये एम.एस्सी. गणित समकक्ष एम.एस्सी संख्याशास्त्र ही समकक्षता पीएच.डी.संख्याशास्त्र नोंदणीसाठी करावयाच्या प्रक्रियेसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्याशी संबंधित असलेल्या मुद्दा क्र. १,३ व ६ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविली व अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील मुद्दा क्र. २,४,५,७ व ८ शी संबंधित माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्राधिकरणाचा एक भाग असलेल्या संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज पाठविला. संबंधित विभागाने अपिलार्थीस या मुद्यांवर माहिती दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,३ आणि ६ च्या संदर्भात दिलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती योग्य असल्याचे आयोगास आढळले. अपिलार्थीने त्यांच्या या अर्जातील मुद्दा क्र. २,४,५,७ व ८ द्वारे एम.एस्सी.गणित व एम.एस्सी. संख्याशास्त्र यांच्या

समकक्षतेविषयी चुकीच्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली होती. सदर प्राधिकरणाने अपिलार्थीचा हा अर्ज संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे पाठविला, तथापि संचालकांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २२.१.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जासंदर्भात कोणतीही माहिती दिली नसल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. त्यामुळे अपिलार्थी हे त्यांच्या दि. २२.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपासून वंचित राहिले आहेत,हे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमाद्वारे प्राप्त झालेल्या हक्कापासून संबंधित जन माहिती अधिकारी, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे उपरोक्त प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत असल्याने त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची कुलगुरु,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २२.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २,४,५,७ व ८ शी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र. १८३४/२००७ व १८३७/२००७ ही दोन्ही अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

**अपील क्रमांक १८३४/२००७:**

४) अपील क्रमांक १८३४/२००७ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

५) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी सदर माहिती अपिलार्थीस विहीत मुदतीत पुरवतील याची दक्षता जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांनी घ्यावी.

**अपील क्रमांक १८३७/२००७:**

१) अपील क्रमांक १८३७/२००७ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) संबंधित जन माहिती अधिकारी, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील अनुज्ञेय कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय

कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**

**दिनांकः १४.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, द्वारा ब्रुद्रुककर निवास, विद्यानगर,परळी वैजनाथ,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा सहा.कुलसचिव, राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ(बी.सी.यु.डी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. कुलगुरु,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८४६

निर्णय दिनांक   १४-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजाराम श्रीधर भोंडे,<br>रा.पैठण जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>शेवगाव, जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>रोजगार हमी योजना (कार्य) विभाग,<br>अहमदनगर, जिल्हा अहमदनगर | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १४.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. राजाराम श्रीधर भोंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. विनायक माणिकराव डोंगळीकर , तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग शेवगाव, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुरेश गोपाळराव देशपांडे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रोजगार हमी योजना (कार्य) विभाग, अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.०८.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील, अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती करुनही त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई केली नाही, म्हणून केल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दि. १८.८.२००७ रोजी माहिती मिळाल्याचे कबूल करुन त्यांना माहिती मिळविण्यापोटी लागलेला खर्च संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून वसूल करावा, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. २७.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - दि.१.१.२००६ ते २७.४.२००७ या कालावधीतील शेवगाव - राक्षी - चापडगावमार्गे गेवराई या रस्त्याच्या मजबुतीकरण, डांबरीकरण कामाचे अंदाजपत्रकाच्या प्रती, टेंडरच्या प्रती व ठेंकेदारास दिलेल्या बिलाच्या प्रती, ठेंकेदारास देण्यात आलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत - इ. माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८५१२/- कोषागारात जमा करुन,चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर शुल्क न भरता अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१)च्या तरतुदीअन्वये दि. १६.६.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय यांनी दि.५.७.२००७, १९.७.२००७ आणि ९.८.२००७ रोजी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ९.८.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत मोफत

माहिती देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र क्र.८१३ दि. १७.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पाठविली आहे. अपिलार्थी हे सदर माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे आयोगासमोर कबूल करत आहेत. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दि. १८.०७.२००७ रोजी सदर माहिती उशिराने प्राप्त झाल्याने, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २७.४.२००७ रोजीच्या अर्जास दि. २३.५.२००७ रोजी म्हणजेच अधिनियमातील विहित मुदतीमध्ये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु.८५१२/- भरण्याचे सूचित केले. तथापि हे शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही. सदर शुल्काचा भरणा न करण्याचे कारण अपिलार्थीस विचारले असता, त्यांना सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त इ ाले नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. तथापि सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याचा योग्य तो पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दि. १९.७.२००७ रोजीचे एक पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी शेवगाव ते गेवराई या रस्त्याच्या माहितीची त्यांना आवश्यकता नसल्याचे नमूद केले असून या प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे नाही व या संदर्भात कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. या पत्राबाबत अपिलार्थी यांना खुलासा विचारला असता, त्यांनी संबंधित ठेकेदाराने त्यांच्याकडून जबरदस्तीने ते लिहून घेतले असल्याचे आयोगास सांगितले.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विनामूल्य प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यास जन

माहिती अधिकारी यांनी नाकारल्याचे या घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने संबंधित ठेकेदाराने त्यांच्याकडून माहितीची आवश्यकता नाही, असे जे जबरदस्तीने पत्र लिहून घेतले त्यावर योग्य पुराव्याअभावी आयोगाचे काहीही भाष्य नाही. मात्र संबंधित जन माहिती/अपिलीय अधिकारी, यांना असे सूचित करण्यात येते की, कोणत्याही अर्जदाराने त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितल्यास अथवा अपील केल्यास त्यावर त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून अधिनियमातील तरतुदीनुसार वेळीच कार्यवाही करावी.

आज रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये त्यांना ठेकेदार व अधिकारी यांच्याकडून, माहिती मिळविण्यासाठी धमकावण्यात आल्याबद्दल व विलंबाने माहिती प्राप्त झाल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची विनंती केली. याबाबत अशा प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये, याची संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दक्षता घ्यावी, आवश्यकता वाटल्यास जिल्हा पोलीस अधीक्षक यांची मदत घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, तसेच अशा प्रकारच्या घटनाची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचेस्तरावर क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दि.२१.८.२००७ रोजीच्या अर्जावर व दि.२२.८.२००७ रोजी फॅक्सद्वारे पाठविलेल्या अर्जावर आवश्यक ती कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याचे आत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी अपिलार्थीच्या दि.२१.८.२००८ रोजीच्या तक्रारअर्जाची हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याचे आत चौकशी करुन, अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १४.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजाराम श्रीधर भोंडे,रा.बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी,पैठण जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग शेवगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रोहयो (कार्य) विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,नाशिक यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८४७

निर्णय दिनांक १४-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल,<br>औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नगर भूमापन अधिकारी,<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक,<br>भूमी अभिलेख, औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १४.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. वसंत सदाशिवराव निकम , (तत्कालीन) जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद व श्री.बन्सी गणपतराव बांगर (सध्या कार्यरत) जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सौ. विजया शंकरराव परणे,प्रमुख लिपीक, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.०६.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूर्वक माहिती दिली नाही,माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १.२.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीचा दि. १.२.२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १.३.२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती पुरविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १८.५.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.६.२००७, १२.६.२००७ व १८.६.२००७ रोजी घेऊन अपिलार्थीस नियमाप्रमाणे शुल्क आकारुन त्यांनी मागणी केलेल्या नकला व माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केल्याचे दिसून येते. सदर आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.६.२००७ रोजी पारित केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. १.२.२००७ रोजीचा, जो जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रत्यक्षतः दि.१.३.२००७ रोजी प्राप्त झाला, त्या अर्जाद्वारे एकूण ५ मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून औरंगाबाद शहरातील नगर भूमापन क्र. २०१५४ व २०१५४/१ च्या संदर्भात काही माहिती मागविल्याचे दिसून येते. या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ चा काही भाग वगळता उर्वरित सर्व मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण, कारणे अथवा खुलासे मागविल्याचे दिसून येते. जे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अर्जदाराने कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार खुलासे,स्पष्टीकरण मागणे व अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कृतीबद्दल स्पष्टीकरण, खुलासा देणे अथवा स्वतःचे वैयक्तिक मत अर्जदारास देणे, अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मधील काही भाग वगळता उर्वरित मुद्यांसंदर्भातील माहिती देय होत नाही.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून न.भू.क्र.२०१५४/१ या नकाशाची नक्कल व आदेशाची नक्कल यांच्या प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.१२.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सांगितले. त्यानंतर अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क रु.२३२/- दि. ११.२.२००८ रोजी पावती क्र.६५५७७२८

अन्वये अधीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयात भरल्यानंतर त्याचदिवशी अपिलार्थीस न.भू.क्र.२०१५४/१ च्या संबंधित आदेशाची प्रत प्राप्त झाली. अपिलार्थी यांनी आज रोजी आयोगासमोर आपल्या युक्तिवादामध्ये त्यांना न.भू.क्र.२०१५४/१ या स.नं. च्या नकाशाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे आयोगास सांगितले. नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील अभिलेख्यामध्ये सदर स.नं.ची नोंद मिळकत पत्रिकेच्या (पी.आर.कार्ड) स्वरुपात घेण्यात आली आहे. या पी.आर.कार्डचे अवलोकन केले असता, दि. ६.९.२००४ रोजी नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद यांनी या पी.आर.कार्डवर न.भू.क्र. २०१५४/१ ची नोंद घेतल्याचे दिसून येते. या प्रकरणी असे घडले आहे की, अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी त्यांच्या दि. २७.८.२००४ रोजीच्या आदेशान्वये नवीन नगर भूमापन पत्रिका उघडण्यात येऊन न.भू.क्र.२०१५४/१ ची मिळकत पत्रिकेवर (पी.आर.कार्ड) नोंद घेण्याबाबत तत्कालीन नगर भूमापन अधिकाऱ्यास सूचित केल्याचे दिसून येते. तथापि या आदेशामध्ये या मिळकतीचा नव्याने नकाशा तयार करण्याविषयी उल्लेख नसल्याने, तसा नकाशा आजपर्यंत तयार करण्यात आला नाही, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास सांगितले. त्यांच्या वरिष्ठांकडून अशाप्रकारचे आदेश प्राप्त झाल्याशिवाय त्यांना न.भू.क्र.२०१५४/१ चा नकाशा तयार करता येणार नाही, असेही त्यांनी आयोगास सांगितले. या ठिकाणी, नगर भूमापन अधिकारी कार्यालयाने सदर जागेचे पी.आर.कार्ड तयार केले आहे, तथापि नगर भूमापन कार्यालयात या पी.आर.कार्डाचा संबंधित नकाशा उपलब्ध नाही, अशाप्रकारची चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली असून त्यासाठी संबंधित विभागाचे अधिकारी जबाबदार आहेत. सबब जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख यांनी या प्रकरणी न.भू.क्र.२०१५४/१ च्या नकाशासंदर्भात प्रचलित नियमाप्रमाणे/कायद्याप्रमाणे योग्य तो निर्णय घेऊन अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत कळवावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.१.२.२००७ रोजीच्या अर्जास अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये दि. १५.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असल्याने, जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने त्यांच्या अर्जाद्वारे शास्ती लावण्याची अथवा त्यांच्यावर विभागीय चौकशी करण्याची विनंती, आयोग अमान्य करीत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे दि. १७.३.२००७ रोजी पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला आहे, तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना हे पत्र प्राप्त झाले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र पाठविल्याचा पुरावा आयोग ग्राहय धरत असून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचे पत्र प्राप्त झाले नाही, हा त्यांच्या युक्तिवादातील मुद्दा फेटाळून लावण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आठ पृष्ठांची माहिती देऊन त्यांच्याकडून रु.२३२/- इतके शुल्क माहितीपोटी आकारले असल्याचे आयोगास सांगितले. त्यांना देण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता सदर माहितीतील पृष्ठांसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिपृष्ठ रु.२/- याप्रमाणे दर आकारुन अपिलार्थीकडून शुल्क स्वीकारणे आवश्यक होते तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी शुल्काची रक्कम जास्त आकारल्याचे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून स्वीकारण्यात आलेले शुल्क रु.२३२/- या रकमेतून त्यांना प्रत्यक्ष देण्यात आलेल्या माहितीच्या पृष्ठांच्या शुल्काची प्रतिपृष्ठ रु. २/- या दराने रक्कम वजा करुन, उर्वरित रक्कम अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच चोवीस तासांच्या आत परत करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) अधीक्षक,भूमी अभिलेख यांनी या प्रकरणी न.भू.क्र.२०१५४/१ च्या नकाशासंदर्भात प्रचलित नियमाप्रमाणे/कायद्याप्रमाणे योग्य तो निर्णय घेऊन अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत कळवावे.

३) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस प्रत्यक्षात देण्यात आलेल्या माहितीच्या पृष्ठांसाठी प्रतिपृष्ठ रु.२/- प्रमाणे शुल्क आकारुन अपिलार्थीकडून स्वीकारलेल्या रकमेतील उर्वरित रक्कम त्यांना, हे आदेश निर्गमित होताच चोवीस तासांच्या आत अपिलार्थीस परत करावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः १४.११.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल,५-११-२०, पदमपूरा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१८४८

निर्णय दिनांक १४-११-२००८

१ श्री. चंद्रकांत निवृत्ती काळे, : अपिलार्थी
रा.माडज ता.उमरगा,जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती,उमरगा,
जि.उस्मानाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.),
जि.प.उस्मानाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. १४.११.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. अंकुश बाबाराव बिराजदार , जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उमरगा, जि.उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. रमेश देविदास जोशी, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा) जि.प.उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. चंद्रकांत निवृत्ती काळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०७.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये, अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.०७.२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे - ज्ञान प्रबोधिनी विद्यालय, हराळी,ता.लोहारा येथे घेण्यात आलेल्या शिक्षणसेवक प्रशिक्षणाकरिता मंजूर निधी व निधीच्या खर्चाची दि. ५.६.२००६ ते १०.६.२००६ या कालावधीशी संबंधित तपशील - व्यक्तिशः मागितला होता. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जिल्हा स्तरावरील असल्याने अपिलार्थीस, त्यांना हव्या असलेल्या माहितीसाठी शिक्षणाधिकारी, जि.प. उस्मानाबाद यांच्याकडे अर्ज करण्याचे सूचित केले व अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२०.१.२००७ रोजी प्रथम अपील करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीवर दि. २०.१.२००७ अशी तारीख नमूद केली आहे, तर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या

वेळी सादर केलेल्या त्यांच्याकडील प्रथम अपील अर्जाच्या प्रतीचे अवलोकन केले असता, सदर प्रथम अपील अर्जामध्ये तारीखेमध्ये खाडाखोड करुन ती दि.२०.३.२००७ लिहिली असल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हा अपील अर्ज प्रत्यक्षतः दि. २३.३.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.४.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थी सुनावणीच्या दिवशी अनुपस्थित असल्यामुळे व अपिलार्थीने दाखल केलेला प्रथम अपील अर्ज विहित वेळेत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल न केल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २७.४.२००७ रोजीच्या पत्रवजा आदेशान्वये अपिलार्थीचे हे अपील निकाली काढले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती सोबत आणली आहे. ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते, तथापि सदर माहिती अद्यापही अपिलार्थीस पुरविली नसल्याचे दिसून येते.सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः गट शिक्षणाधिकारी, पं.स.उमरगा, जि.उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अर्जाद्वारे जी माहिती मागितली होती, ती माहिती प्रत्यक्षतः गट शिक्षणाधिकारी यांच्या ताब्यात नसल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जाची प्रत, त्यांनी मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे आहे, म्हणजेच शिक्षणाधिकारी (प्रा) जि.प.उस्मानाबाद यांच्याकडे, अर्ज प्राप्त होताच पाच दिवसांच्या आत पाठवावयास हवी होती, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न करता, अपिलार्थीने मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी (प्रा.) यांच्या ताब्यात असल्याचे

अपिलार्थीस कळवून अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज निकाली काढला. त्यांची ही कृती सर्वथा गैर असून, या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांनी जर शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प. उस्मानाबाद यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अर्ज अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पाठविला असता, तर कदाचित अपिलार्थीस प्रथम व द्वितीय अपील करण्याची गरज राहिली नसती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस देय ठरत आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवण्यासाठी संबंधित गट शिक्षणाधिकारी हे जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे.सबब शिक्षणाधिकारी (प्रा) जि.प.उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची

शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांकः १४.११.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत निवृत्ती काळे,रा.माडज ता.उमरगा,जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उमरगा जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७६१

निर्णय दिनांक १५-११-२००८

१ श्री. भाऊसाहेब सुर्यभान रंधे, अपिलार्थी

रा. मुधलवाडी, पो. नारायणगांव, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

श्री. संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि. पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

श्री. संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि. पैठण, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भाऊसाहेब सुर्यभान रंधे, जन माहिती अधिकारी श्री. संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि. पैठण, जिल्हा औरंगाबाद व जन अपिलीय अधिकारी श्री. संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि. पैठण, जिल्हा औरंगाबाद हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २७-०७-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अधिनियमाव्दारे विहित मुदतीत मागणी केलेली माहिती मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे नमूद करुन संबंधितांवर अधिनियमातील कलम २० (१) व (२) नुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे श्री. संत एकनाथ सहकारी साखर कारखान्यासंबंधात सन २००७ या कालावधीतील एकूण १४ मुद्दयांवर काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा मूळ अर्ज खाजगी कुरिअरमार्फत पाठविल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

उपलब्ध कागदपत्रांची पाहणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १४ मुद्दयांपैकी १३ मुद्दयांवर प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित असलेली माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहे.

कलम २ (च)

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, उस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील

आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."

वरील व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येईल की, मूळात माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही कृतीबाबत, निर्णयाबाबत स्पष्टीकरण अथवा खुलासे अथवा कारणे विचारणे अभिप्रेत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अर्जदाराने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देण्यासंबंधी निर्णय घ्यावयाचा आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास उत्तरे देणे अशा प्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील एकूण १४ मुद्दयांपैकी मुद्दा क्रमांक १ वगळता उर्वरीत मुद्दयांची माहिती देय होत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कारखान्याच्या व्यवस्थापकीय संचालकांनी त्यांच्या सहीने शेतकी खात्याला दिलेल्या सुचनांची प्रमाणित प्रत मागितली आहे. अपिलार्थीची ही मागणी "माहिती" या शब्दाच्या वरील व्याख्येशी सुसंगत असल्याने व ही माहिती मागण्याचा अपिलार्थीस अधिनियमातील कलम ३ प्रमाणे हक्क असल्याने त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते. अधिनियमातील कलम ७ प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती देणे अनिवार्य आहे. अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे ही माहिती मागितली आहे त्या प्राधिकरणावर राज्यशासनाचे पूर्ण नियंत्रण असून वेळोवेळी अशा प्रकारच्या प्राधिकरणांना वेळोवेळी राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्यही केले जाते हे पाहता, संबंधीत सहकारी साखर कारखाना हे सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती देणे भाग आहे. सबब व्यवस्थापकीय संचालक, श्री. संत एकनाथ सहकारी साखर कारखाना, पैठण यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. आयुक्त, साखर, पुणे यांना असे सूचित करण्यात येते की, संबंधीत व्यवस्थापकीय संचालक हे अपिलार्थीस वर नमूद केलेली माहिती या मुदतीत देतील याची त्यांनी दक्षता घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या दिवशी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्व गैरहजर असल्याने मूळात संबंधीत साखर कारखान्याने त्यांच्या कारखान्यातर्फे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या आहेत किंवा कसे हे आयोगास अवगत न होऊ शकल्यामुळे, आयोग कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक यांना जन माहिती अधिकारी असे गृहीत धरुन हा आदेश देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. व्यवस्थापकीय संचालक, श्री. संत एकनाथ सहकारी साखर कारखाना, पैठण यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक १५-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भाऊसाहेब सुर्यभान रंधे, रा. मुधलवाडी, पो. नारायणगांव, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी श्री. संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि. पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी श्री. संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि. पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७६२

निर्णय दिनांक १५-११-२००८

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगारामगौड, अपिलार्थी
घर नं. ३-२-२५२, गंगाधाम, गवळीपुरा,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, तरोडा बु.
तालुका जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजेश खंडेराव देशमुख, जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तरोडा बु. तालुका नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुभाष गणपतराव जाधव, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. बत्तिन सायन्ना गंगारामगौड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २४-०४-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणत्याच प्रकारे माहिती अथवा अपिलावर निर्णय प्राप्त झाला नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये ग्रामविकास अधिकारी तथा जन माहिती अधिकारी मौजे तरोडा ग्रामपंचायत यांच्याकडे श्री. व्यंकटेश नरसया, ममाईवार, रा. सह्याद्रीनगर, घर क्रमांक २४ मध्ये त्यांचे भाडेकरु श्री. व्ही. रामचंद्ररेड्डी राजारेड्डी हे केव्हापासून राहतात व त्यांनी यासंदर्भात दाखल केलेल्या घराचे खरेदीपत्र व घरबांधकाम परवाना व श्री. व्यंकटेश नरसया हे केव्हापासून वरील घराचे मालमत्ता कर भरीत असतात याबाबत कर आकारणी रजिस्टरची प्रमाणित प्रत व त्या घरावर केव्हापासून आकारणी केली आहे त्याचा उतारा या माहितीची मागणी केली होती. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-१२-२००५ रोजी प्राप्त झाला, तथापि ही माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने ही माहिती देता येत नसल्याचे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत तरोडा यांनी अपिलार्थीस दिनांक २९-१२-२००५ रोजीच्या पत्राव्दारे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. हे अपील संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०३-०४-२००६ रोजी प्राप्त झाले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय पारित झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती श्री. व्यंकटेश नरसया ममाईवार या घरमालकासंदर्भात होती. तथापि या घरमालकाचे नांव त्यांच्याकडील कोणत्याही अभिलेख्यात उपलब्ध नव्हते. त्यांच्या अभिलेख्यावर ममाईकर निजामाबादकर या नावाचा संबंधीत मिळकत मालक म्हणून उल्लेख होता. तथापि ममाईवार निजामाबादकर व व्यंकटेश नरसया या दोन्ही नावाची एकच व्यक्ती असून श्री. व्यंकटेश नरसया यांनी तशा अर्थाचे ०८ जून २००१ रोजीचे एक शपथपत्र त्यांच्याकडे सादर केलेले आहे. या शपथपत्राची प्रत त्यांनी आयोगास दाखविली. केवळ अपिलार्थीने मागणी केलेल्या व्यक्तीचे नाव जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी वेगळे असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी थोडा उशीर झाला, असे त्यांनी आयोगास सांगितले. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०२-२००६ रोजी पोस्टाने पाठविली होती, तथापि सदर कथित माहितीचे पाकिट त्यांना पोस्टाकडून संबंधीत व्यक्ती त्या पत्त्यावर राहात नसल्याने परत आले. आज रोजी जन माहिती अधिकारी हे आयोगास पोस्टाकडून परत आलेले पाकीट तपासणीकरिता उपलब्ध करुन देऊ शकत नाहीत हे पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत (रजिस्टर्ड पोस्टाने) विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगारामगौड, घर नं. ३-२-२५२, गंगाधाम, गवळीपुरा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तरोडा बु. तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७६३

निर्णय दिनांक १५-११-२००८

१ श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, अपिलार्थी
शिंवगण निवास सत्ताने निवासच्या समोर,
बिदर रोड, उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा आगार प्रमुख (क) रा. प. उदगीर आगार, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, लातूर विभाग, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुभाष सोपानराव रनखांब, जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख (क) रा. प. उदगीर आगार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. रमेश किशनराव जाधव, जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, लातूर विभाग, लातूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८-११-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०६-२००६ च्या चालक वाहन कर्तव्यबुकाच्या १४ पानाच्या प्रती व १२ कर्मचा-यांच्या T २ A टी टू ए च्या जुलै २००१ ते जुलै २००६ पर्यंतच्या प्रती या माहितीसंदर्भात त्यांना प्राप्त झालेली माहिती अपुरी असल्याचे म्हणून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

उपरोक्त प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक १२-०७-२००६ रोजीच्या प्रथम मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून चालक वाहन कर्तव्यबुकाच्या व काही विशिष्ट कर्मचा-यांच्या T २ A च्या प्रती अपेक्षिल्या होत्या. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनांक १७-०६-२००६ व जुलै २००१ ते जुलै २००६ असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन रुपये ५००० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २५-०७-२००६ रोजी भरल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २४-०८-२००६ रोजी पुरविली गेली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या पत्रावर पोच सही आहे. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी

दिनांक १३-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना देऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर होते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १२-०७-२००६ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला असला तरी सदर प्रतिसाद चुकीचा आहे, कारण हे शुल्क निश्चित करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील एका कर्मचा-याच्या पूर्ण दिवसाच्या पगाराचा यामध्ये समावेश केला आहे. अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (एक) अन्वये आवश्यक असणा-या संभाव्य पृष्ठांची संख्या व माहिती देण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर अपिलार्थीस कळविला नाही, हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (एक) चा भंग केल्याचे स्पष्ट होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी यांनी दिनांक १०-०८-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले असता या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०७-२००७ रोजी म्हणजे नऊ महिने इतका कालावधी व्यपगत झाल्यानंतर सुनावणी घेऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केल्याचे स्पष्ट होत आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपुरी माहिती मिळाल्याचे प्रतिपादन केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये एकूण २ मुद्दयांचा समावेश होता. त्यापैकी अपिलार्थीस फक्त एका मुद्दयावरील माहिती प्राप्त झाली असून अद्याप जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १७-०६-२००६ च्या चालक-वाहक कर्तव्यबुकाच्या १४ पानांच्या प्रती त्यांना प्राप्त झाल्या नाहीत, असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांचे यावर असे म्हणणे आहे की, कोणत्याही एस. टी. आगारामध्ये चालक-वाहक कर्तव्य बुक प्रत्येक दिवशी अनौपचारीकरित्या तयार करण्यात येते. चालक-वाहक कर्तव्य बुक हे अधिकृत शासकीय अभिलेख नाही, केवळ कामाच्या सोईकरिता त्यांनी केलेले ते एक तात्पूरत्या स्वरुपाचे कच्चे टिपण असते. या कर्तव्य बुकावरुन T २ A या शिर्षाचे अधिकृत अभिलेख ते तयार करतात. अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक १ व्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये समाविष्ट आहे. अपिलार्थीने मागणी केलेले अभिलेख हे अधिकृत अभिलेख नसल्याने केवळ कामाच्या सोईकरिता केलेले कच्चे टिपण असल्याने व ते सध्या उपलब्ध नसल्याने ते अपिलार्थीस देता येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्ष उपलब्ध असलेली माहितीच त्यांनी अर्जदारास द्यावी असे अपेक्षित आहे. आपले कर्तव्य पार पाडत असतांना जन माहिती अधिकारी यांनी कामाच्या सोईकरिता केलेले कच्चे टिपण अधिकृत अभिलेख या प्रवर्गात मोडत नाही व ते सध्याचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाहीत हे पाहता, ते आता जन माहिती अधिकारी अपिलार्थीस उपलब्ध करुन देऊ शकणार नाहीत हे उघड आहे. कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिकृत अभिलेखे मागणे हे सर्वसाधारणपणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे, त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ची माहिती आता त्यांना उपलब्ध होऊ शकणार नाही, मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क चुकीच्या पध्दतीने आकारुन अधिनियमातील कलम ७ (३) (एक) चा भंग केला असल्याने व परिणामी ते अवैध ठरत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे भरलेले शुल्क रुपये ५००० त्यांना आता अपिलार्थीस परत करावे लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून घेतलेले सदर शुल्क रुपये ५००० त्यांना ३ दिवसाच्या आत परत करण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे त्यांच्याकडून घेतलेले रुपये ५००० इतके शुल्क हे आदेश निर्गमीत होताच त्यांना ३ दिवसाच्या आत परत करावे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सर्वांचा युक्तिवाद संपल्यानंतर आयोगाकडे केलेले चालक-वाहक कर्तव्यबुक हे तात्पूरते रेकॉर्ड असल्याचे विधान खोटे असल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर सांगितले. यासंदर्भात प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन

महामंडळ, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणाची विशेषतः अपिलार्थीच्या म्हणण्यामधील सत्यासत्यतेची त्यांनी त्यांच्या स्तरावर सखोल चौकशी करुन, या प्रकरणी योग्य ते निर्णय हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत घ्यावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ५००० इतके त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, शिंवगण निवास सत्ताने निवासच्या समोर, बिदर रोड, उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख (क) रा. प. उदगीर आगार, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८४१

निर्णय दिनांक १५-११-२००८

१ श्री. मोहंमद अन्वरुल्लाखान बरकतउल्लाखान, अपिलार्थी

९-४-४५५, कय्युम प्लॉट्स,

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,

विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता,

विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहंमद अन्वरुल्लाखान बरकतउल्लाखान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. राजेंद्र नवनीतदास जरीवाल, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. हेमंत संपतराव पगारे, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५-०६-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या पत्र क्रमांक ७७२, दिनांक निरंक च्या आदेशाव्दारे दिलेल्या निर्णयाने व्यथित होऊन केल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या अपिलाची सुनावणी त्यांच्या कार्यालयात दिनांक ११-०४-२००७ रोजी घेण्यात आली. या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या संदर्भात माहिती मागण्याचे अधिकार शासनास देखील नाहीत असे उद्‌गार काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या त्यावेळच्या वर्तनाने ते स्तंभित झाले. जन अपिलीय अधिकारी यांनी आपले कर्तव्य निःपक्षपातीपणे पार पाडले नसल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांच्या दिनांक ३१-०५-२००६ ते २१-११-२००६ या कालावधीतील टूर डायरीसंदर्भात एकूण ७ मुद्दयांवर रजिस्टर्ड पोस्टाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीचा दिनांक ०१-०२-२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्षात दिनांक ०३-०२-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीपोटीच्या एकूण ३५ रुपये शुल्क इतक्या रकमेची मागणी अपिलार्थीस केली. अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०१-०३-२००७ रोजी भरल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०३-२००७ रोजी त्यांनी मागणी केलेली माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक १६-०३-२००७ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ११-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ११-०४-२००७ रोजी पारीत करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपुरी असून ही माहिती त्यांना उशिरा मिळाली आहे. ही माहिती अपुरी कशी आहे असे अपिलार्थीस विचारले असता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधीक्षक अभियंता यांची निरीक्षण टिपणी पुरविली नसल्याने त्यांना ही माहिती अपुरी वाटत असल्याचे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीने ज्या कालावधीमधील माहितीची मागणी केली होती त्या कालावधीमध्ये कोणतीही निरीक्षण टिपणी काढलेली नाही, मात्र त्यांनी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ या पदाचा अतिरिक्त कार्यभार असतांना एक ऑब्झरवेशन मेमो काढला होता. असा मेमो अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ यांनी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांच्या अतिरिक्त पदभाराअन्वये काढला असल्याने सदर ऑब्झरवेशन मेमो हा अपिलार्थीचा माहितीचा विषय होऊ शकत नाही. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये असेही स्पष्ट केले की, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये कोणत्याही रस्त्याची अथवा बांधकामाची पाहणी केल्यानंतर त्या बांधकामाची निरीक्षण टिपणी जारी करणे हे संबंधितावर बंधनकारक नाही. त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी उपलब्ध होती ती त्यांनी दिलेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात त्यांनी अशी माहिती दिली की, कोणत्याही डाकबंगल्यात अधिकारी थांबले असता पैसे भरल्याची नोंद ते संबंधीत डाकबुकाच्या रजिस्टरवर करतात व आवश्यक ते देयक संबंधीत बंगल्याच्या चौकीदाराकडे अदा करतात.

वरील घटनाक्रम व दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांच्या दिनांक ३१-०५-२००६ ते २१-११-२००६ या कालावधीतील मासिक दौ-याची माहिती मिळण्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे, कारण या माहितीमध्ये अधीक्षक अभियंता यांनी दौरा केलेल्या निरीक्षण टिपण्याचा त्यामध्ये आंतरभाव नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, प्रत्येक दौ-याच्या वेळी संबंधीत अधिका-याने निरीक्षण टिपणी दौरा काढण्याचे बंधन त्यांच्यावर नाही व उपरोक्त कालावधीत संबंधीत अधीक्षक अभियंता यांनी कोणताही निरीक्षण टिपणी दौरा केला नाही, त्यामुळे ती अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद प्रत्यक्षातील प्रचलीत वस्तुस्थितीवर आधारीत असल्याने तो आयोग मान्य करत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणाही अर्जदाराने त्यांच्याकडे मागणी केलेली सार्वजनिक माहिती अर्जदारास एका विशिष्ट मुदतीमध्ये व त्यांच्याकडे ज्या स्वरुपात मागणी केलेली माहि‍ती उपलब्ध आहे त्या स्वरुपात व तेवढीच माहिती देणे अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रमाणे त्यांच्याकडील व उपलब्ध माहिती पुरविली आहे. अपिलार्थीची या प्रकरणी अपेक्षा अशी दिसते की, अधीक्षक अभियंता यांनी दौरा करुनही त्यामध्ये कोणतीही निरीक्षण टिपणी जारी केली नाही. सदर बाब पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाची असून अधीक्षक अभियंता यांच्या या कालावधीतील दैनंदिनीबाबत अपिलार्थीस काही शंका अथवा तक्रार असेल तर त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिका-याकडे या प्रकरणी तक्रार करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सदर माहिती ही सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व्दारे विश्रामगृहातील देयकाच्या पावतीची मागणी केलेली आहे, ही देयकाची पावती अर्थात संबंधीत अधीक्षक अभियंता यांच्याकडे असणे अपेक्षित आहे, तथापि त्यांनी अशा प्रकारची पावती जपून

ठेवली नसल्याचे त्यांच्या दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या पत्रामध्ये म्हटले आहे. अधीक्षक अभियंता यांनी विश्रामगृह वापरल्यापोटी उपरोक्त कालावधीमध्ये जे काही भाडे शासकीय विश्रामगृहाकरिता भरले आहे त्याच्या उपविभागातील काऊंटर फाईल अथवा कॅशबुकवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस ३५ रुपये शुल्क भरण्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले आहे. या पत्रामध्ये त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) अन्वये आवश्यक असलेला हिशोब दिला नसल्याने हे पत्र अवैध ठरत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ३५ इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ३५ त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०१-०३-२००७ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतरही अपिलार्थीस एकूण ७ दिवसाच्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ३५ त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमान्वये यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहंमद अन्वरुल्लाखान बरकतउल्लाखान, ९-४-४५५, कय्युम प्लॉट्स, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८४३

निर्णय दिनांक १५-११-२००८

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, अपिलार्थी
माणिकनगर, माणिक चौक,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, उस्मानाबाद,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद,
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. कृष्णकांत नागोराव चिकुर्ते, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुनिल विठ्ठलराव यादव, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १५-०१-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या अपिलावर कोणतेही आदेश पारीत केले नसल्याचे नमूद केले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०९-२००६ रोजीच्या प्रथम अर्जव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे डिसेंबर २००५ ते सप्टेंबर २००६ या कालावधीतील उस्मानाबाद तालुक्याशी संबंधीत केरोसीन वितरण व जन माहिती अधिकारी यांच्याकडील संगणकातील माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली व काही माहितीसंदर्भात शिधापत्रिका तपासणी मोहीम चालू आहे, काम पूर्ण झाल्यानंतर माहिती देण्यात येईल असे कळविले. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली अर्धघाऊक केरोसीन विक्रेते श्री. बलदवा ॲण्ड कंपनी येडशी यांच्यासंदर्भातील माहिती देतांना अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे हे अपिलार्थीने त्यांची संचिका तपासणी करुन पहावी असे अपिलार्थीस सुचविले. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-१२-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १३-१२-२००६ रोजी पारीत केले. या आदेशाव्दारे

त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०१-२००७ रोजी विनामूल्य माहिती दिली, तथापि ही माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये (ज्याची नोंदणी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दिनांक १५-०१-२००७ रोजी झाली) राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पूर्णतः माहिती पुरविली असून सदर माहिती दिनांक १५-०१-२००७ रोजी विनामूल्य प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची राज्य माहिती आयोगाकडून अपेक्षा व्यक्त केली. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती, तिचे स्वरुप व माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी सुरु होण्याचा कालावधी लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती अथवा त्यातील कोणताही भाग देण्याचे त्यांनी नाकारलेले नाही हे पाहता, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करणे आयोग उचित समजत नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती न दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विनामूल्य प्राप्त झाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १५-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८४४

निर्णय दिनांक १५-११-२००८

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, अपिलार्थी
माणिकनगर, माणिक चौक,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप आयुक्त (पुरवठा),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर विभागीय आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. दिलीप जमादार, जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (पुरवठा), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्रीमती प्रगती रामचंद्र चोंडेकर, नायब तहसीलदार, जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०५-०१-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणतेही आदेश दिले नाहीत असे नमूद करुन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००४ ते ऑगस्ट २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जिल्हा पुरवठा अधिका-यांचे अहवाल व संगणकातील डाटासंदर्भात विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती. या माहितीपैकी काही माहिती त्यांच्या कार्यालयाशी व काही माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत होती. सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०८-२००६ रोजीच्या आपल्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये १९५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. सदर पत्रानुसार अपिलार्थीने दिनांक २२-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक २२-०९-२००६ रोजी पुरविली. उपरोक्त प्रकरणी प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-११-२००६ व १५-११-२००६ रोजी सुनावणी घेऊन या अपिलावर दिनांक १५-०१-२००७ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या अर्जातील परिच्छेद ५ व ७ मधील माहिती अधिनियमातील कलम ७ उपकलम ६ प्रमाणे म्हणजेच विनामूल्य देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपावेतो मिळालेली माहिती अपूर्ण असून, त्यांना त्यांनी मूळ अर्जाव्दारे नमूद केल्याप्रमाणे परिपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप विस्तृत असल्यामुळे त्यांना माहिती देण्यासाठी थोडा वेळ लागला, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००७ व १८-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३९१ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात न केल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली सर्व माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूलतः अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात होती. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांच्या दिनांक १५-०१-२००७ रोजीच्या आदेशाव्दारे सूचित केले होते, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क भरण्याची अपेक्षा ठेवली. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे सर्व माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. अपिलार्थीस माहिती देण्याचा अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत माहिती अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद

दिनांक १५-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (पुरवठा), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८००

निर्णय दिनांक १७-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शिरीष भास्कर साठ्ये,<br>२, "दर्पण", कॉलेज रोड,<br>नाशिक | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपायुक्त (अतिक्रमण),<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका,<br>नाशिक | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शिरीष भास्कर साठ्ये (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (अतिक्रमण), नाशिक महानगरपालिका, नाशिक व जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २२-०६-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपिलामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये कोणतीही माहिती दिली नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०५-२००६ रोजीच्या आदेशान्वये आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजतागायगत कोणतीही माहिती मिळाली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्लॉट क्रमांक ०१ क्षेत्र ९५० चौरस मिटर, सर्व्हे नंबर ६१५/२/३ वर झालेले अतिक्रमणे काढण्याबाबत एकूण ४ मुद्दयांवर माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या, या अर्जामध्ये -- त्यांनी अतिक्रमणे काढण्यासंदर्भात दिनांक २९-१२-१९९७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावर केलेली कारवाई, १९९७ ते २००६ या कालावधीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या टी. पी. रोडवरील अतिक्रमणाची सद्यस्थिती व महानगरपालिकेने दिनांक १९-१०-२००३ रोजी दैनिक सकाळ व इतर वर्तमानपत्रामध्ये अनधिकृत बांधकाम काढून घेण्याबाबत जाहीर नोटीशीव्दारे प्रगटन प्रसिध्द केले होते, त्या संदर्भाने आयुक्त यांच्या निवासस्थानासमोरील विभागाची यादीची झेरॉक्स व मुद्दा क्रमांक ४ व्दारे महानगरपालिकेने दिनांक २८-०४-२००४ रोजी भाभानगर येथील जी झोपडपट्टी कोणाच्या आदेशाने आदेशाने व कोणत्या धोरणात्मक निर्णयाने हटविली त्या आदेशाच्या झेरॉक्स प्रती -- या मुद्दयांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये दिनांक ०२-०५-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक २६-०५-२००६ रोजी पारीत केले. या आदेशान्वये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत यथायोग्य उत्तर देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर असून जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे लेखी म्हणणे, आयोगाकडे आजतागायत आयोगाने सूचना देऊनही सादर केलेले नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ च्या तरतुदीनुसार त्यांच्या मालकीचा भूखंड सर्व्हे नंबर ६१५/२/३ मधील फिक्स्ड प्लॉट क्रमांक १ च्या संदर्भात मागितलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असून, अधिनियमातील कलम ३ नुसार ही माहिती मिळणे हा अपिलार्थीचा हक्क आहे तर अधिनियमातील कलम ७ प्रमाणे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार अनिवार्य आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही, एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०५-२००६ रोजीच्या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास कोणतेही उत्तर दिले नाही, हे पाहता उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी उपेक्षा केल्याचे दिसून येत आहे. सदर माहिती अपिलार्थीस देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांची कोणती अडचण आहे हे सांगण्यासाठी आज ते आयोगासमोरील सुनावणीस उपस्थित नाहीत, मात्र आयोगाकडील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर, कधीही, कुठल्याही प्रकारची सकारात्मक कारवाई केलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास प्रतिसाद न देऊन, किंबहूना त्यांच्या प्रथम अर्जाची उपेक्षा करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच अधिनियमातील विहित तरतुदीनुसार १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी जन माहिती अधिकारी अपिलार्थीस वरील मुदतीत माहिती देतील असे पहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच त्यांना १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिरीष भास्कर साठ्ये, २, "दर्पण", कॉलेज रोड, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (अतिक्रमण), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८०१

निर्णय दिनांक १७-११-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. फिरोज बादशहा,<br>अध्यक्ष अ. भा. माध्यमिक शिक्षक संघ,<br>६६, गुरुवार वार्ड, वावीकर गल्ली, मालेगाव,<br>जिल्हा नाशिक | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, झुं. प. काकाणी विद्यालय, मालेगाव, जिल्हा नाशिक | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा चेअरमन/सेक्रेटरी, मालेगाव एज्युकेशन सोसायटी, मालेगाव, जिल्हा नाशिक | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. फिरोज बादशहा, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, झुं. प. काकाणी विद्यालय, मालेगाव व जन अपिलीय अधिकारी तथा चेअरमन/ सेक्रेटरी, मालेगाव एज्युकेशन सोसायटी, मालेगाव हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २८-०३-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील विहित केलेल्या प्रपत्रात केले नसून त्यांनी मुख्य राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे दिनांक १४-०३-२००७ रोजी एका साध्या कागदपत्रावर केलेला अर्ज असून या कागदावर वीस रुपये किंमतीचा कोर्ट फी स्टॅम्प चिकटविलेला आहे. या अर्जामध्ये त्यांनी मुख्याध्यापक व चेअरमन/सेक्रेटरी, मालेगाव एज्युकेशन सोसायटी, मालेगांव यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीचे समाधानकारक उत्तर न मिळाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्याचे म्हटले आहे. या अर्जामध्ये त्यांनी अखेरीस अशी विनंती केली आहे की, आपल्या स्तरावर किंवा उपसंचालक शिक्षण, नाशिक यांच्या स्तरावर सुनावणीपत्र माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांना त्वरीत देण्याचे करावे. अपिलार्थीने केलेली ही विनंती जरी स्पष्ट नसली तरी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १९-०५-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी केलेल्या दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी अपेक्षित असल्याचे दिसून येते.

शिक्षण संचालनालय, पुणे यांनी त्यांच्याकडील क्रमांक संकीर्ण/केमाअ/२००७/ ६३५२७/ १५/क (८)६०३७, दिनांक २६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे शालेय शिक्षण विभागाकडील माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या प्रथम अपिलावर निर्णय घेण्याकरिता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये (आयोगाकडील नोंदणी दिनांक २८-०३-२००७) मुख्य राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे केलेली विनंती आयोग मान्य करीत असून शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३०

दिवसाच्या आत घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय पारीत करावा. सदर आदेश अपिलार्थीस मान्य नसल्यास अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये ते राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांनी या अपील प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय पारीत करावा.

औरंगाबाद

दिनांक १७-११-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. फिरोज बादशहा, अध्यक्ष अ. भा. माध्यमिक शिक्षक संघ, ६६, गुरुवार वार्ड, वावीकर गल्ली, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, झुं. प. काकाणी विद्यालय, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा चेअरमन/सेक्रेटरी, मालेगाव एज्युकेशन सोसायटी, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८०२

निर्णय दिनांक  १७-११-२००८

१  श्री. मोमीन अ. हमीद मो. हुसेन,  अपिलार्थी

घर नं. ९१९, नागड दरवाजा, मौलाना आजाद रोड, येवला, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१  जन माहिती अधिकारी

तथा अध्यक्ष, मौलाना मोहम्मद अली जोहर एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर

सोसायटी, येवला, नागड दरवाजा रोड, येवला, तालुका येवला, जिल्हा नाशिक

२  जन अपिलीय अधिकारी  प्रतिवादी

तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,

नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. माणिकराव महादू गावंडे, अधीक्षक, जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. मोमीन अ. हमीद मो. हुसेन व जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, मौलाना मोहम्मद अली जोहर एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, येवला हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २४-०१-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना योग्य न्याय मिळाला नसल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे नमूद करुन, या अपील अर्जासोबत त्यांनी आपला माहितीसाठीचा मूळ अर्ज जोडला आहे यावरुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे अध्यक्ष, मौलाना मोहम्मद अली जोहर एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, येवला यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत सन २००० ते २००६ या कालावधीमधील माहितीची मागणी टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास संबंधीत संस्थेच्या अध्यक्षांनी दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन या पत्राव्दारे अपिलार्थीस असे कळविले की, माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा त्यांच्या संस्थेला लागू नाही. संस्थेच्या अध्यक्षांकडून प्राप्त झालेल्या या उत्तरावर समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक १६-१०-२००६ रोजी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये प्रथम अपील केले. या अपिलावर सहाय्यक धर्मदाय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक ०९-११-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १४-११-२००६ रोजी पारीत केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. हे अपील निकाली काढतांना सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी असे भाष्य केले आहे की, महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५ प्रमाणे खाजगी संस्थेला दंड करण्याची तरतूद नसल्याने ते खाजगी संस्थेला दंड करु शकत नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अध्यक्ष, मौलाना मोहम्मद अली जोहर एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, येवला यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा त्यांच्या संस्थेला लागू नसल्याचे अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. संस्थेच्या अध्यक्षांचे हे गृहीतक राज्य माहिती आयोग अमान्य करत आहे. मौलाना मोहम्मद अली जोहर एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, येवला ही धर्मादाय आयुक्त, नाशिक यांच्याकडे नोंदणी झालेली नोंदणीकृत संस्था आहे. सदर संस्थेच्या अनेक शाळा असून या शाळांना राज्यशासनाकडून अनुदान प्राप्त होत असते असे अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी आयोगास अवगत करुन दिले आहे. राज्यशासनाकडून वित्तीय सहाय्य प्राप्त होत असल्याने सदर संस्था अधिनियमातील कलम २ (ज) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहे, तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (त्र) अन्वये "माहितीचा अधिकार" या शब्दाच्या व्याख्येचे स्पष्टीकरण लक्षात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा संबंधीत संस्थेला लागू होतो असे दिसून येईल. सदर संस्था धर्मादाय आयुक्त, नाशिक यांच्या नियंत्रणात आहे. संस्थेची कागदपत्रे, संस्थेच्या खर्चाची तपासणी, संस्थेच्या घटनेमधील बदल इत्यादीबाबत त्यांच्यावर धर्मादाय आयुक्तांचे नियंत्रण असते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही धर्मदाय आयुक्त यांना प्राप्त होऊ शकते. धर्मादाय आयुक्तांना ही माहिती प्राप्त झाल्यानंतर तिला सार्वजनिक माहितीचे स्वरुप प्राप्त होते. अशा प्रकारची माहिती मागण्याचा सर्व नागरिकांना अधिनियमातील कलम ३ प्रमाणे अधिकार असल्याने संबंधीत संस्थेच्या अध्यक्षांची अपिलार्थीस माहिती नाकारण्याची कृती सर्वथा चुकीची असल्याचे दिसून येते. संबंधीत संस्थेने त्यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होत नसल्याचे गृहीत धरल्याने आतापर्यंत त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका निश्‍चितपणे केलेल्या नसतील, असे आयोगास वाटते. धर्मादाय आयुक्तांच्या प्रतिनिधींना देखील याची काही कल्पना नाही असे त्यांनी सुनावणीचे वेळी आयोगास अवगत केले.

संस्थेच्या अध्यक्षांनी माहिती न दिल्याने अपिलार्थीने सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने प्रथमतः संबंधित संस्थेच्या अध्यक्षांकडे माहिती मागविली आहे. सदर संस्थेने त्यांच्या अध्यक्षांना जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहे किंवा कसे हे त्यांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे अपिलार्थीस जर या संबंधीत शिक्षण संस्थेकडील माहिती अपेक्षित होती तर त्यांनी प्रथमतः अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाशिक यांच्याकडे संबंधीत संस्थेविषयी माहिती मागणे उचित ठरले असते. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या मूळ अपील अर्जाचा कोणताही विचार न करता आपले दिनांक १४-११-२००६ रोजीचे आदेश पारित केलेले आहेत. कारण अपिलार्थीने सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाची पाहणी करता या अर्जामध्ये अपिलार्थीने सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांना दंड करण्याची विनंती केली नव्हती असे दिसून येते.

अपिलार्थीने संस्थेच्या अध्यक्षांकडे मागितलेल्या माहितीमध्ये - संस्थेची माहिती, संस्थेतील पदाधिका-यांची नांवे व त्यांचा कालावधी, संस्थेने २००० पासून घेतलेल्या ठरावाच्या नकला व संस्थेच्या अजेंड्याच्या नकला प्रती -- या मुद्दयांचा समावेश होता. याबाबत अपिलार्थीने त्यांच्या पहिल्या मुद्दयाव्दारे "संस्थेची माहिती" एवढीच माहिती मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीची सदर मागणी त्यांनी मोघम स्वरुपात केली असल्याने अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती देय होऊ शकत नाही, मात्र अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस संबंधीत संस्थेकडून / जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते. आयोगासमोर उपस्थित असलेले सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी यांना ही माहिती संबंधीत संस्थेकडून त्यांना असलेल्या अधिकारामुळे तपासणीसाठी उपलब्ध होऊ शकेल, त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध होऊन, संबंधीत शिक्षण संस्थेच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी आयोग असे आदेश देत आहे की, अधीक्षक, सहाय्यक धर्मदाय आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी मौलाना मोहम्मद अली जोहर एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, येवला या शिक्षण संस्थेकडून अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त करुन घेऊन ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. संबंधीत शिक्षण संस्थेवर शिक्षण उपसंचालक, नाशिक यांचे शिक्षणाधिका-यामार्फत प्रशासकीय नियंत्रण असल्याने त्यांना असे सूचित करण्यात येते की, संबंधीत संस्था जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत करील याची खातरजमा त्यांनी स्वतः करुन घ्यावी. संबंधीत संस्थेने या

आदेशाचे पालन न केल्यास त्यांच्यावर माध्यमिक शाळा संहिता किंवा यासंदर्भात इतर प्रचलीत तरतुदीनुसार संबंधीत शिक्षण संस्थेवर कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ वगळून उर्वरित मुद्दयावरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. शिक्षण उपसंचालक, नाशिक यांनी मौलाना मोहम्मद अली जोहर एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, येवला ही संस्था त्यांच्या कार्यालयाकरिता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत करील हे पहावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोमीन अ. हमीद मो. हुसेन, घर नं. ९१९, नागड दरवाजा, मौलाना आजाद रोड, येवला, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, मौलाना मोहम्मद अली जोहर एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, येवला, नागड दरवाजा रोड, येवला, तालुका येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण उपसंचालक, जनरल पोस्ट ऑफिस शेजारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८०३

निर्णय दिनांक १७-११-२००८

१ श्री. चंद्रकांत जिभाऊ शेलार, अपिलार्थी
मु. पो. तळेगाव, तालुका इगतपुरी,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय महसूल आयुक्त, पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिति, वेल्हे, जिल्हा पुणे |
| | जन अपिलीय अधिकारी | : | गट विकास अधिकारी, पंचायत समिति, वेल्हे, जिल्हा पुणे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. बबन कुंडलिक दहिफळे, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वेल्हे, जिल्हा पुणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. करंजे चंद्रकांत नामदेव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वेल्हे, जिल्हा पुणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. चंद्रकांत जिभाऊ शेलार हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २०-०४-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने "पुणे जिल्हा परिषदेकडून प्राथमिक शिक्षक म्हणून सेवा केल्याचा दाखला मिळण्याबाबत" हा माहितीचा विषय दर्शविला असून या अर्जासोबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक २३-०९-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाची प्रत जोडली आहे. सदर अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने त्यांनी पुणे जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक शिक्षक या पदावर केलेल्या दिनांक ०७-०६-१९९४ ते १०-०८-१९९७ या कालावधीतील सेवेचा दाखला मिळण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केला होता. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केलेल्या दिनांक २३-०९-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींचा वापर वैयक्तीक गा-हाणे सोडविण्यासाठी करुन घेण्याचे ठरविल्याचे दिसते. त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या वर्णनाचे अवलोकन करता अपिलार्थीस दिनांक ०७-०६-१९९४ ते १०-०८-१९९७ या

कालावधीतील त्यांनी माध्यमिक शिक्षक म्हणून काम केलेल्या सेवेचा दाखला आवश्यक होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जावर पुणे जिल्हा परिषद, विभागीय आयुक्त कार्यालय व अपिलार्थी यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार झाल्याचे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी वेल्हे पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी ज्यांची या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे ते आयोगासमोर सुनावणीसाठी हजर आहेत. त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेले त्यांचे सेवा प्रमाणपत्र, दिनांक ०७-०६-१९९४ ते १०-०८-१९९७ या कालावधीमध्ये त्यांनी केलेल्या सेवेच्या प्रमाणपत्राचा दाखला अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस पोस्टाने पाठविला आहे व अपिलार्थीचे सेवापुस्तक तयार करण्याचे काम त्यांच्या स्तरावर चालू असून सदर कारवाई १५ डिसेंबर २००८ च्या अखेरपर्यंत पूर्ण होईल हे पाहता, असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या पत्राने पुरविली आहे. याबाबत अपिलार्थीने त्यांचे आक्षेप आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नोंदविले आहेत. या प्रकरणी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्यामध्ये झालेल्या पत्रव्यहाराचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०९-२००६ रोजीच्या अर्जाची उपेक्षा करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली असल्याचे सिध्द होत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना आयोगातर्फे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली गेली असल्याचे जन माहिती अधिकारी आयोगास सांगत आहेत परंतु अपिलार्थीची पोच जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता उपलब्ध नाही हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी ही माहिती परत, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पाठवावी व अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याची पोच पावती घेऊन ती आपल्या अभिलेख्यावर जपून ठेवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य, रजिष्टर पोष्टाने पाठवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत जिभाऊ शेलार, मु. पो. तळेगाव, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वेल्हे, जिल्हा पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वेल्हे, जिल्हा पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८०४

निर्णय दिनांक १७-११-२००८

१ श्री. राजेश रमणिकलाल शहा, अपिलार्थी

२ वर्धमान कॉम्प्लेक्स वसंतवाडी, जीपीओ जवळ, मालेगांव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नगर भूमापन अधिकारी,

मालेगाव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक भूमी अभिलेख, नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. सुरेश पर्बत वेताळ, जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, मालेगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. महेश किशन राजगुरु, शिरस्तेदार, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. राजेश रमणिकलाल शहा हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २१-०२-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीच्या या व्दितीय अपील अर्जावर अपिलार्थीने कोणत्याही तारखेचा उल्लेख केला नसल्याने सदर अपील अर्ज राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयास ज्या दिनांकास प्राप्त झाला, तोच अपिलार्थीच्या अपिलाचा दिनांक म्हणून मानण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. रमणिकलाल भागचंद शहा यांनी दिनांक ०५-१२-२००२ रोजी शनिवार वार्ड, मालेगांव सिटी सर्व्हे नंबर २० बाबत पोटहिश्श्यासाठी केलेल्या अर्जाच्या सर्टिफाईड प्रतीची व्यक्तिशः मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०९-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आढळ होत नसल्याचे नमूद करुन, या पत्राव्दारे अपिलार्थीकडे आपली दिलगीरी व्यक्त केली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे ऑक्टोबर २००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये देखील फक्त महिना व साल एवढाच उल्लेख केला असून निश्चितपणे कोणत्या तारखेला त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले हे नमूद केलेले नाही. अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीने मागितलेली माहिती नगर भूमापन अधिकारी, मालेगाव यांच्या कार्यालयातून घेण्यासाठी सूचित केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हे त्यांच्याकडे अपिलार्थीचा ऑक्टोबर २००६ रोजीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झ ााला नसल्याचे सांगत आहेत. त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थीने याच माहितीच्या मागणीकरिता जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, नाशिक यांच्या कार्यालयात दिनांक ०५-१०-२००६ रोजी अर्ज केला असता यासंदर्भात त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती मालेगांव येथील कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेण्यास सूचित केले. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला कथित प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झालेला नाही. आता सदर अपील अर्जाची प्रत त्यांना आयोगाच्या सुनावणीच्या नोटीशीबरोबर प्राप्त झाली आहे. सदर प्रत प्राप्त झाल्याचे जन अपिलीय अधिकारी हे कबूल करत आहेत. या प्रकरणी या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आवश्यक आहे असे आयोगास वाटत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व होणारा संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत अपील सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व होणारा संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेश रमणिकलाल शहा, २ वर्धमान कॉम्प्लेक्स वसंतवाडी, जीपीओ जवळ, मालेगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८०५

निर्णय दिनांक १७-११-२००८

१ श्री. अन्सारी मो. गुफरान मो. युसूफ, अपिलार्थी

७३६, अन्सार रोड, मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, टी. आर. हायस्कूल ॲण्ड ज्यू. कॉलेज, दाभाडी, तालुका

मालेगाव,

जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सचिव, कर्म. भाऊसाहेब हिरे शिक्षण संस्था, दाभाडी, तालुका मालेगाव,

जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अन्सारी मो. गुफरान मो. युसूफ, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, टी. आर. हायस्कूल ॲण्ड ज्यू. कॉलेज, दाभाडी, तालुका मालेगाव व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कर्म. भाऊसाहेब हिरे शिक्षण संस्था, दाभाडी, तालुका मालेगाव हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २७-०२-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांचा माहितीसाठीचा अर्ज मुख्याध्यापक, टी. आर. हायस्कूल ॲण्ड ज्यू. कॉलेज, दाभाडी, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक यांनी दिनांक २७-०१-२००७ रोजी न स्विकारता तो परत केला तर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या अपिलाचे रजिस्टर्ड पत्र परत पाठविले त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

अपिलार्थीने या अर्जासोबत प्रपत्र अ व प्रपत्र ब ची प्रत जोडली आहे, त्याचप्रमाणे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० नुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-२००६ व २००६-२००७ या शैक्षणिक वर्षात रिक्त झालेल्या पदासंदर्भात एकूण ८ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीमध्ये -- त्यांच्या शाळेमध्ये सन २००५-२००६ व २००६-२००७ या वर्षात किती जागा रिक्त झाल्या त्याची कारणे, रिक्त झालेल्या जागा भरण्याकरिता वर्तमानपत्रात देण्यात आलेल्या जाहिरातीची प्रत, सदर जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जांची पत्त्यासह यादी, मुलाखतीसाठी उपस्थित उमेदवारांची पत्राची छायांकीत प्रत, पदे भरण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडून घेण्यात आलेल्या परवानगीची प्रत -- इत्यादी माहितीचा समावेश होता. अपिलार्थीने आयोगास फक्त त्यांच्या मूळ अर्जाची व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून परत आलेल्या पाकिटाची झेरॉक्स प्रत पाठविली आहे. आज रोजी युक्तिवादासाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थीने ज्या जन माहिती अधिका-याकडे माहिती मागितली आहे त्यांची जन माहिती

अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे काय, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधीत आहे ते सार्वजनिक प्राधिकरण आहे काय, याची उत्तरे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन शोधून काढता येत नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ज्या शाळेच्या मुख्याध्यापकाकडे माहितीची मागणी केली आहे त्या शाळेची शिक्षणाधिकारी यांनी तपासणी केल्याचे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ८ वरुन दिसून येते. त्यांच्या अर्जाव्दारे शाळेवर शिक्षणाधिकारी म्हणजेच पर्यायाने शासनाचे नियंत्रण असल्याचे दिसून येते व त्यामुळे ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहे. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ नुसार संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागण्याचा हक्क आहे तर अधिनियमातील कलम ७ नुसार संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिका-याला अपिलार्थीस माहिती देणे अधिनियमातील तरतुदीनुसार अनिवार्य आहे, हे पाहता प्राचार्य टी. आर. हायस्कूल ॲण्ड ज्यू. कॉलेज, दाभाडी, तालुका मालेगाव, यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व संबंधीत संस्थेचे सचिव यांच्याकडून अपिलार्थीचा त्यांनी माहितीसाठी केलेला अर्ज व अपील अर्ज विनातामीली परत आला आहे. संबंधीतांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणारे प्रत्येक पत्र स्वीकृत करुन त्यातील प्रत्येक अर्जावर व अपील अर्जावर त्यांनी येथून पुढे सकारात्मक कारवाई करावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याबाबत कोणताही उल्लेख केला नसल्यामुळे त्यांचा माहितीसाठीचा अर्ज अपूर्ण ठरतो.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच त्यांना ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-११-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अन्सारी मो. गुफरान मो. युसूफ, ७३६, अन्सार रोड, मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, टी. आर. हायस्कूल ॲण्ड ज्यू. कॉलेज, दाभाडी, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कर्म. भाऊसाहेब हिरे शिक्षण संस्था, दाभाडी, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८०६

निर्णय दिनांक १७-११-२००८

१ श्री. भाऊलाल माणकलाल नहार, अपिलार्थी
श्री. स्वामी समर्थ कॉलनी, चांदवड,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा चेअरमन, विश्वस्त मंडळ, श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, चांदवड,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भाऊलाल माणकलाल नहार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. दिलीप गणपत वणवे, जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, विश्वस्त मंडळ, श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, चांदवड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मा. म. गावंडे, अधीक्षक, जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १७-११-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले. या पत्रामध्ये अपिलार्थीने आज रोजी विचाराधीन असलेले त्यांचे अपील क्रमांक १८०६/२००७ हे मागे घेत असल्याचे म्हटले आहे. खुद्द अपिलार्थीच आता त्यांचे अपील मागे घेत असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १८०६/२००७, दिनांक २०-१०-२००६ निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक १७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भाऊलाल माणकलाल नहार,श्री. स्वामी समर्थ कॉलनी, चांदवड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, विश्वस्त मंडळ, श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, चांदवड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१८१०

निर्णय दिनांक १७-११-२००८

१ श्री. विभोर दिलीप बारला, अपिलार्थी
१५, मुक्ती, ९, समर्थनगर,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, (MSFC),
"संदिप" को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. हॉटेल राजदूतसमोर, त्रिंबक रोड,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, युनायटेड इंडिया बिल्डींग, पहिला माळा, सर
फिरोजशहा मेहता मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

त्रयस्थ पक्ष : पॅकवेल कंपनी सिन्नर, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-११-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विभोर दिलीप बारला, जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, नाशिक, जन अपिलीय अधिकारी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २२-१२-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात केले आहे. अपिलार्थी यांच्या मते जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविलेली माहिती ही चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. आपल्या या विधानाचे समर्थन करतांना त्यांनी या व्दितीय अपील अर्जामध्ये असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत होती. त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात होती. सदर माहिती प्राप्त झाल्याने व्यापक जनहित साध्य होऊ शकते. त्यांना सदर माहिती अधिनियमातील कलम "४ (१) (c) व ४ (१) (d) " प्रमाणे देय ठरते, सदर माहिती विधान मंडळाला नाकारली जाऊ शकत नसल्याने ही माहिती अपिलार्थीस देय ठरते. त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिका-यास ही माहिती गोपनीय म्हणून दिलेली नाही तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहिती देतांना त्रयस्थ पक्षाचा होकार मागविणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षासंदर्भातील माहिती त्रयस्थ पक्षाने घेतलेल्या हरकतीमुळे नाकारली आहे. त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागविली आहे तो त्रयस्थ पक्ष महाराष्ट्र वित्तीय महामंडळाचे कसूरदार आहे. सदर त्रयस्थ पक्षाकडून महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाला येणे असून, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने संबंधीत त्रयस्थ पक्षाविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये संबंधीत त्रयस्थ पक्षाने त्यांची मशिनरी महाराष्ट्र वित्तीय महामंडळाची परवानगीशिवाय कारखान्यातून हलविल्यामुळे तक्रार दाखल केली आहे. अशा त-हेने सार्वजनिक मालमत्तेचा अपहार त्रयस्थ

पक्षाने केला असल्यामुळे व हा अपहार उघड  झाल्याने व्यापक जनहित साध्य होत असल्याने ही माहिती त्यांना मिळावी, असे त्यांनी या अपील अर्जामध्ये म्हटले आहे. त्यांनी आपल्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जामध्ये संबंधीत त्रयस्थ पक्षाने जी मशिनरी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या परवानगीशिवाय हलविली त्यांची यादी मागविली असता केवळ त्रयस्थ पक्षाने हरकत घेतली म्हणून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे नाकारले आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना यासंदर्भात प्राप्त झालेली माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे विधान केले आहे. आज रोजी आयोगासमोर अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष यापैकी कोणीही हजर नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष पॅकवेल कंपनी, सिन्नर यांच्याबाबत एकूण २० मुद्दयांवर माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने, संबंधीत त्रयस्थ पक्षाचा होकार प्राप्त करुन घेऊन नंतर ती माहिती अपिलार्थीस पुरविण्यात येईल असे त्यांना या पत्राव्दारे आश्वासीत केले. जन माहिती अधिकारी यांच्या मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-१०-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, मात्र यासंदर्भात अपिलार्थीस दिनांक १८-१२-२००६ रोजीचे पत्र देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४६ इतके त्यांना भरण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २०-१२-२००६ रोजी त्यांना आवश्यक असणा-या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४६ इतके जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरुन त्यांनी देऊ केलेली माहिती स्वीकृत केली, तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण २० मुद्दयांपैकी १० मुद्दयांवर माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नाकारले आहे.

आज रोजी आयोगासमोर युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "के" अंशतः, मुद्दा क्रमांक "एल", "एन" व "टी", ही माहिती अपिलार्थीस देय होऊ शकत नाही, कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्दयाव्दारे मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्दयांवर त्यांच्या कृतीबद्दल खुलासा अथवा स्पष्टीकरण अपेक्षित असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीतील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कोणत्याही कृतीची कारणे, खुलासे अथवा स्पष्टीकरण द्यावयाचे नसून त्यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस द्यावयाची आहे. उर्वरित मुद्दयांचा विचार केला असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्या संबंधाने माहिती मागितली होती, केवळ  त्या त्रयस्थ पक्षाने हरकत घेतल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नाकारली आहे. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे जर संबंधीत त्रयस्थ पक्ष, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा थकबाकीदार असेल व त्यांनी वित्तीय महामंडळाच्या परवानगीशिवाय त्यांची मशिनरी अवैधरित्या एमआयडीसीच्या जागेमधून हलविली असेल तर त्यांची कृती बेकायदेशीर ठरते. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने यासंदर्भात सिन्नर पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे आहे की एकदा सार्वजनिक प्राधिकरणाने पोलीसात तक्रार दाखल केल्यानंतर त्या तक्रारीस आपोआपच सार्वजनिक माहितीचे स्वरुप प्राप्त होते. त्रयस्थ पक्षाने जरी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या कर्जाच्या रकमेची परतफेड केली नसली व त्यांच्या दृष्टीने हा केवळ थकबाकीदार असला तरीही ही माहिती अपिलार्थीस देण्यास काही हरकत नाही, असे आयोगाचे मत आहे, कारण त्रयस्थ पक्षाच्या अशा प्रकारच्या गैरकृतीमुळे राज्य शासनाच्या अंगीकृत

व्यवसायाचे वित्तीय महामंडळ हे तोट्यात येऊ शकते, वित्तिय महामंडळास शासनाकडून काही भाग भांडवल पुरविले गेले आहे हे भाग भांडवल जनतेकडून शासनाने कररुपाने घेतलेल्या निधीचा एक भाग असल्याने, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड केल्यास सर्वसामान्यांना त्यांनी शासनाकडे भरलेल्या कराचा कशा प्रकारे विनियोग होत आहे याची कल्पना येऊन त्याव्दारे व्यापक जनहित साध्य होईल, असे आयोगास वाटते. अपिलार्थीच्या मते विधान मंडळाला सार्वजनिक प्राधिकरण जी माहिती देण्याचे नाकारु शकत नाही ती माहिती त्यांनी अर्जदारास द्यावी. यामध्ये हे महत्वाचे आहे की, संबंधीत त्रयस्थ पक्षाने ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडून कर्ज घेऊन त्याची परतफेड केली नाही ते महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ हे राज्य शासनाच्या अंगीकृत व्यवसायासंदर्भातील सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे त्यांच्याकडील माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असते, राज्य विधान मंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समितीसमोर अशा प्रकारची प्रकरणे नियमीतपणे चर्चेस येत असतात व त्यावर व्यापक प्रमाणात साधकबाधक चर्चा होत असते, या चर्चेचे निष्कर्ष व शिफारसी अहवाल रुपाने प्रसिध्द होऊन ते विधी मंडळाच्या पटलावर सादर केले जातात हे पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निश्चितपणे सार्वजनिक स्वरुपाची आहे याची अयोगास खात्री झाली आहे. उपरोक्त वरील सर्व बाबी पाहता आयोग या निष्कर्षाप्रत आला आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांना देय असलेली जी माहिती जन माहिती अधिका-याने केवळ त्रयस्थ पक्षाने परवानगी न दिल्याने नाकारली आहे ती माहिती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (१) मधील परंतुक पाहता त्यांना, वर म्हटल्याप्रमाणे व्यापक जनहित साध्य होणार आहे अशी आयोगाची खात्री पटल्याने आता देणे योग्य राहिल.

सबब या विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली त्रयस्थ पक्षासंदर्भातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद न देऊन देखिल अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४६ इतके आकारले आहे. तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अनुज्ञेय कालावधी व्यपगत झाला असल्याने, त्यांना अपिलार्थीकडून घेतलेले शुल्क परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना सदर शुल्क त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत परत करण्याचे सूचित करण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही असद्हेतूने माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय असलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४६ त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-११-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विभोर दिलीप बारला, १५, मुक्ती, ९, समर्थनगर, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, (MSFC), "संदिप" को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. हॉटेल राजदूतसमोर, त्रिंबक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, युनायटेड इंडिया बिल्डींग, पहिला माळा, सर फिरोजशहा मेहता मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.